

# अर्धमागधी - प्राकृत

इयत्ता बारावी











# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# अर्धमागधी - प्राकृत

## इयत्ता बारावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - 411004

U5F9Z6

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

© प्रथमावृत्ती : २०२०
पहिले पुनर्मुद्रण : २०२२

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४.**
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**संयोजक :**
**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**चित्रकार :**
श्री. यशवंत देशमुख

**मुखपृष्ठ :**
श्री. यशवंत देशमुख

**निर्मिती :**
श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र पांडलोस्कर, सहायक निर्मिती अधिकारी

**अक्षरजुळणी :**
बलदेव कंप्युटर्स, मुंबई
भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**कागद :**
७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश :**

**मुद्रक :**

**अर्धमागधी-प्राकृत भाषा तज्ज्ञ समिती**

श्री. बाळासाहेब भानुदास भगरे (अध्यक्ष)
श्रीमती वनमाला बाळासाहेब भगरे
श्रीमती सरोज श्रीपाल पाटील
श्रीमती उज्ज्वला प्रदिप मगदूम
श्रीमती सुनंदा अशोक चौगुले
श्रीमती अरुणा अरविंद पाटील
श्री. सदाशिव कमकेरी
श्री. महावीर पाटील
श्रीमती सविता अनिल वायळ
(सदस्य - सचिव)

**: प्रकाशक :**
**श्री. विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## पइण्णा

भारहो मम देसो अत्थि। सव्वे भारह–वासिणो मम बंधवा संति।

मज्झ मम देसम्मि पेम्मं अत्थि। मज्झ देसंसि विज्जमाणाणं समिध्दाणं विविहयाए विभूसियाणं च परंपराणं मे अहिमाणो अत्थि। तेसिं परंपराणं रक्खगो होउं समत्थो होज्ज अहं निच्चं पयत्तं करिस्सामि।

अहं मज्झ पालगाणं गुरुयणाणं जेट्ठगाणं च सम्माणं करिस्सामि, पच्चेगेण सध्दिं सुयणत्तणेण य आयरिस्सामि।

मम देसे, मम देस–बंधवाणं च मह निट्ठा–रक्खणस्स अहं पइण्णं करेमि। तेसिं कल्लाणे समिध्दीए य मज्झ सोक्खं समाविट्ठं होइ।

# प्रस्तावना

अर्धमागधी-प्राकृत ही एक प्राचीन भारतीय बोलीभाषा होय. या बोलीभाषेत भगवान महावीरांनी आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान सांगितले. शिवाय आपल्या शिष्य-प्रशिष्यांनाही या प्राकृत भाषेतूनच धर्मोपदेश करण्यास सांगितला. त्यामुळे या प्राकृत भाषेचा विकास होत जाऊन ही भाषा भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचली.

या भाषेतच सम्राट अशोकांनी आपले शिलालेख कोरून घेतले. शिवाय सम्राट अशोक, सम्राट खारवेल, सातवाहन आदी राजांनीही प्राकृत भाषेला राजदरबाराची भाषा म्हणून सन्मानित केले. त्यामुळे या भाषेत विविध प्रकारचे साहित्य लिहिलेले दिसून येते. या साहित्याच्या अध्ययनाने प्राचीन भारतीय समाजाचा, तसेच संस्कृतीचा, रूढी परंपरेचा, राजकीय, भौगोलिक, सांस्कृतिक इत्यादी बाबींचा परिचय होण्यास मदत होते. याशिवाय भाषाशास्त्रीयदृष्ट्याही प्राकृत भाषा महत्त्वपूर्ण असल्याने आधुनिक भारतीय भाषांच्या उत्पत्तीच्या अभ्यासासाठी ही भाषा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार जून २०२० पासून इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आलेले आहे. या पाठ्यपुस्तकामध्ये प्रत्येक पाठाच्या प्रारंभी प्रस्तावना, पाठाचा उद्देश, कठीण शब्दार्थ, पाठाच्या मजकूरास अनुरूप चित्रे, कृती इत्यादी दिलेल्या आहेत. शिवाय परिशिष्टामध्ये वर्णबदल, काळ, विभक्ती, सर्वनाम इत्यादींचा संक्षिप्त परिचय, कृदन्त परिचय, प्रयोग, समास इत्यादींचा समावेश केलेला आहे. तसेच लेखन कौशल्य या घटकात अपठित उतारे, प्राकृत भाषेत अनुवाद, निबंध लेखन यांचाही परिचय करून दिलेला आहे. त्यामुळे प्राकृत भाषेचे अध्ययन करताना विद्यार्थ्यांमध्ये प्राकृत भाषेविषयी गोडी निर्माण होत राहील.

अर्धमागधी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमातून हे पाठ्यपुस्तक तयार झाले आहे. हे पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागातील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पाठ्यपुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. त्यांच्या आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे.

अर्धमागधी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य, समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मन:पूर्वक आभारी आहे. या पाठ्यपुस्तकाचे विद्यार्थी, शिक्षक व पालक स्वागत करतील, अशी आशा आहे. या पाठ्यपुस्तकाबरोबर अभ्यासाला पूरक असे दृकश्राव्य साहित्य आपल्याला पहिल्या पानावर असलेल्या Q.R. Code च्या माध्यमातून उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांनी त्याचा अध्ययनासाठी उपयोग करून घ्यावा.

**(विवेक गोसावी)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२०
भारतीय सौर दिनांक : २ फाल्गुन, १९४१

# अर्धमागधी-प्राकृत

## भाषाविषयक क्षमता

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांमध्ये अर्धमागधी-प्राकृत भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | • अर्धमागधी-प्राकृत साहित्यातील भाव, संदर्भ आणि अर्थ समजून घेता येणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत साहित्यातील विविध प्रकारच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात, अवरोह इत्यादींची जाणीव होणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून चिकित्सक विचारांसह त्यामध्ये सहभागी होता येणे.<br>• त्या त्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या बोलीभाषा ऐकून त्या त्या भाषांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| भाषण | • अर्धमागधी-प्राकृत भाषेतील उच्चारवैशिष्ट्यांनुसार योग्य गाथांचे पठण आणि संभाषण करता येणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषा माध्यमात अध्ययनकृतींना व विषयाला अनुसरून अनुभव कथन करण्याची क्षमता येणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत चर्चा आणि संभाषण करता येणे. |
| वाचन | • विरामचिन्हांनुसार अर्थपूर्ण प्रकट वाचन करण्याची क्षमता येणे.<br>• विविध साहित्यप्रकार समजावून घेऊन वाचन करून त्याचा आस्वाद घेणे.<br>• संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'ई' साहित्याचे वाचन करून त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करता येणे. |
| लेखन | • लेखन करताना शुद्धलेखनांच्या नियमांचे पालन करता येणे.<br>• भाषा नियमांना अनुसरून संवाद, वर्णन, लघुपरिच्छेद लिहिता येणे.<br>• माध्यम भाषेतील भाषा नियमांना अनुसरून अनुवाद करता येणे. |
| अध्ययन कौशल्य | • कोणत्याही संदर्भासाठी शब्दकोश पाहता येण्याची क्षमता येणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत शब्दजाल निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत कथापूर्ती करता येणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत अनुवाद करता येणे.<br>• संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा अभ्यासासाठी वापर करण्याची क्षमता येणे. |
| भाषाभ्यास | • इयत्ता दहावी आणि इयत्ता अकरावीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत सरळ संवाद करणे.<br>• एक ते शंभर आणि त्यापुढील आवश्यक अंक (क्रम) जाणून घेणे. |

# शिक्षकांसाठी

अर्धमागधी-प्राकृत इयत्ता बारावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी संबंधित पाठ, कविता, कृती व आशयानुरूप चित्रे यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या भाषाविषयक क्षमतांचा विचार करून विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमता विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील कृतींबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावेत.

क्षमता क्षेत्रातील भाषाभ्यास या शीर्षकाखाली दिलेल्या सर्व व्याकरण घटकांची उजळणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घेणे अपेक्षित आहे. शिक्षकांनी स्वतः या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात.

शिक्षकांनी स्वतःच्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी, त्याचबरोबर अशा विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांनाही संधी मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचे अर्थ पाठाच्या शेवटी दिलेले आहेत. शिक्षकांनी आवश्यकतेनुसार पाठातील इतर शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा, तसेच विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून शब्दकोश पाहण्यासाठी प्रेरित करावे.

अर्धमागधी-प्राकृत इयत्ता बारावीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.

# अणुक्कमणिया


| अनु. क्र. | विषय घटक | पान क्रं. |
|---|---|---|
| 1 | सुगम-पाइयं (अ) संभासण-कोसल्ल-घटकं<br>(ब) पाइय-वक्करयणा | 1<br>2 |
| | **गज्ज-विभागो** | |
| 1 | अविवेकस्स परिणामं | 5 |
| 2 | भाणुदासस्स गव्वहरणं | 10 |
| 3 | आयार-धम्मस्स महत्तं | 13 |
| 4 | पुण्ण-कम्मस्स फलं | 17 |
| 5 | सउन्दलाए णिव्वुदीं | 21 |
| 6 | नम्मया-सुंदरीए चउरत्तणं | 26 |
| | **पज्ज-विभागो** | |
| 1 | सुहासियाइं | 31 |
| 2 | कम्म-फलं | 34 |
| 3 | खंडपाणाए चउरत्तणं | 37 |
| 4 | विणयस्स माहप्पं | 41 |
| 5 | कलह-णिवारणं | 46 |
| 6 | उदयण-वासवदत्ता-प्पेमकहा | 51 |
| | **परिसिट्ठं**<br>(अ) वागरण-विभागो | |
| 1 | काळ, विभक्ती, सर्वनाम इत्यादींचा संक्षिप्त परिचय | 57 |
| 2 | प्राकृत कृदन्त | 59 |
| 3 | प्रयोग | 63 |
| 4 | समास | 66 |
| | (ब) लेहण-कोसल्लं | |
| 1 | अपठित उतारे | 72 |
| 2 | प्राकृत भाषेत अनुवाद | 75 |
| 3 | निबंध लेखन | 78 |
| | (क) अर्धमागधी-प्राकृत काव्यसाहित्य परिचय | |
| 1 | प्राकृत काव्यसाहित्य परिचय | 81 |
| 2 | खंडकाव्य | 85 |
| 3 | मुक्तक काव्य | 87 |

# सुगम-पाइयं

## (अ) संभासण-कोसल्ल-घटकं

प्रत्येक भाषेत संभाषणाला अत्यंत महत्त्व असते. ज्या व्यक्तीने संभाषण कौशल्य आत्मसात केलेले आहे त्या व्यक्तीचा इतरांच्यावर एक वेगळाच प्रभाव पडतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीने संभाषण कौशल्य प्राप्त केलेच पाहिजे.

संभाषण कौशल्य प्राप्त करण्यासाठी नाम, सर्वनाम, काळ, विभक्ती इत्यादींचे प्रत्यय आणि शब्दसंग्रह याचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक असते. ते ज्ञान नसेल तर आपण इतरांशी संभाषण करूच शकत नाही.

इयत्ता अकरावीच्या वर्गात नाम, सर्वनाम, काळ, अर्थ, विभक्ती प्रत्यय आणि धातूंचे (मूळ क्रियांचे) विविध प्रकार इत्यादींचा सविस्तर परिचय करून घेतलेला आहे. त्याच्या आधारे आपण प्राकृत भाषेत लहान-लहान वाक्ये कशी केली जातात ते पाहू. त्यामुळे आपले लेखन आणि संभाषण कौशल्य विकसित होण्यास मदत होणार आहे.

सुलभ प्राकृत या भागामध्ये प्रथम आपण नाम आणि सर्वनामांनी युक्त अशी वाक्ये कशी तयार केली जातात ते पाहू.

मराठी भाषेतील सर्वनामे आणि प्राकृत भाषेतील तुलनात्मक सर्वनामे खालीलप्रमाणे दिलेली आहेत.

### सर्वनामे

| | मराठी- | | प्राकृत |
|---|---|---|---|
| (i) | मी | → | अहं, हं |
| (ii) | आम्ही | → | वयं, अम्हे |
| (iii) | तू | → | तुमं, तुं |
| (iv) | तुम्ही | → | तुम्हे, तुब्भे |
| (v) | तो | → | सो |
| (vi) | ती | → | सा |
| (vii) | ते | → | तं |
| (viii) | ते | → | ते |
| (ix) | त्या | → | ताओ, तीओ |
| (x) | ती | → | ताणि |

| | मराठी- | | प्राकृत |
|---|---|---|---|
| (i) | माझा, माझी, माझे | → | मम |
| (ii) | तुझा, तुझी, तुझे | → | तव |
| (iii) | आमचा, आमची, आमचे | → | अम्हाण, अम्हाणं |
| (iv) | तुमचा, ची, चे | → | तुम्हाण, तुम्हाणं |
| (v) | हा | → | एसो, इमो |
| (vi) | ही | → | एसा, इमा |
| (vii) | हे | → | एस, एए |
| (viii) | याचा | → | एयस्स, इमस्स |
| (ix) | हिचा | → | एयाए, इमाए |

### प्रश्नार्थक शब्द पुढीलप्रमाणे

किं → काय

कहिं → कोठे

केरिसं → कशाप्रकारे

केण → कोणी


के → कोण, कोणते (नपुंसकलिंगी)

को → कोण (पुल्लिंग)


का → कोण (स्त्रीलिंग)

## (ब) पाइय-वक्करयणा


(i) अहं गोविंदो।
(ii) मिलिंद, अहं तव पिया।
(iii) मिलिंद, अहं कमला।
(iv) मिलिंद, अहं तव माया।
(v) मिलिंद, एसा ललिया।
(vi) मिलिंद, एसा तव भगिणी।




(i) भो माला! अहं भरहो।
(ii) अहं तव बंधुस्स मित्तो।
(iii) सो मम वग्गम्मि पढइ।
(iv) माला, तुमं किं पढसि?
(v) भरह, अहं कहा पढामि।
(vi) माला, अहं वि कहा पढामि।



(i) अहं कमला।
(ii) अहं तव माया।
(iii) भरह, तुमं मम भाऊ।
(iv) लिला, एसो मम भाऊ।
(v) माला, अम्हे वागरणं पढामो।
(vi) माला, तुमं वि वागरणं पढसि।



(i) अहं नेत्तेहिं पासामि।
(ii) तुमं हत्थेण लिहसि।
(iii) अहं लेहणीए लेहं लिहामि।
(iv) सउंदला जलेण रुक्खे सिंचइ।
(v) अहं माया-पिया-गुरूस्स य आणा मण्णेमि।
(vi) अम्हाणं माया-पिया मंदीरं गच्छन्ति।




(i) को एसो?
(ii) एसा कमला।
(iii) एसा मम पियामहिं।
(iv) इमो पुत्तो, इमाए मायाए अत्थि।
(v) भो राम! अहं तुमं नमामि।
(vi) इमेसु फलेसु सुयंधो अत्थि।




मिलिंदो : ⟶ माला, को एसो ?
माला : ⟶ एसो मम पिया।
मिलिंदो : ⟶ तुमं कहिं वससि ?
माला : ⟶ अहं वाणारसी-नयरीए वसामि।
मिलिंदो : ⟶ रामो, तुमं किं पढसि ?
रामो : ⟶ अहं कव्वं पढामि।



रामो : ⟶ को एसो रूक्खो ?
माला : ⟶ इमो अंबरूक्खो।
रामो : ⟶ एयस्स के विसेसो ?
माला : ⟶ एयस्स आयारो परिमंडलो।
एयस्स छाया सीयला।
एयस्स फलाइं अईव महुराइं।



मिलिंदो : ⟶ को एसो ?
लया : ⟶ एसो बइल्लो।
मिलिंदो : ⟶ केरिसं एयस्स सरीरं ?
लया : ⟶ एयस्स सरीरं थूलं।
मिलिंदो : ⟶ के एयस्स विसेसा ?
लया : ⟶ एयस्स सिंगाइं दीहाइं वंकाइं य। एयस्स वण्णं धवलं अत्थि।
एयस्स खुरा कढिणं अत्थि। एयस्स उयरं दीहं अत्थि।



## तुलनात्मक वाक्यरचना तक्ता

| साधा वर्तमानकाळ | साधा भूतकाळ | साधा भविष्यकाळ | आज्ञार्थ |
|---|---|---|---|
| (i) अहं नमामि | (i) अहं नमित्था। | (i) अहं नमिस्सामि। | (i) अहं नमामु। |
| (ii) वयं पढामो। | (ii) वयं पढिंसु। | (ii) वयं पढिस्सामो। | (ii) वयं पढामो। |
| (iii) तुमं पाससि। | (iii) तुमं पासित्था। | (iii) तुमं पासिस्ससि। | (iii) तुमं पाससु। |
| (iv) तुम्हे (तुब्भे) णच्चह। | (iv) तुम्हे (तुब्भे) णच्चिंसु। | (iv) तुम्हे (तुब्भे) णच्चिस्सह। | (iv) तुम्हे (तुब्भे) णच्चह। |
| (v) सो पिबइ। | (v) सो पिबित्था। | (v) सो पिबिस्सइ। | (v) सो पिबउ। |
| (vi) सा गाइ। | (vi) सा गाइत्था। | (vi) सा गाइस्सइ। | (vi) सा गाउ। |
| (vii) तं गच्छइ। | (vii) तं गच्छित्था। | (vii) तं गच्छिस्सइ। | (vii) तं गच्छउ। |
| (viii) ते गच्छन्ति। | (viii) ते गच्छिंसु। | (viii) ते गच्छिस्सन्ति। | (viii) ते गच्छन्तु। |
| (ix) ता करेन्ति। | (ix) ता करिंसु। | (ix) ता करिस्सन्ति। | (ix) ता करेन्तु (करन्तु)। |
| (x) ताणि सुणन्ति। | (x) ताणि सुणिंसु। | (x) ताणि सुणिस्सन्ति। | (x) ताणि सुणन्तु। |

## अपूर्ण क्रियांचा तुलनात्मक वाक्यरचना तक्ता

| अपूर्ण वर्तमानकाळ | अपूर्ण भूतकाळ | अपूर्ण भविष्यकाळ |
|---|---|---|
| **नियम :** | **नियम :** | **नियम :** |
| (1) कर्ता पुल्लिंग असेल तर धातूला 'न्त' किंवा 'माण' प्रत्यय जोडून अपूर्ण वर्तमानकाळाचे रूप तयार केले जाते. | (1) भूतकाळातील अपूर्ण क्रिया दर्शविण्यासाठी धातूला 'इअ' किंवा 'अ' प्रत्यय जोडून रूप तयार केले जाते. | (1) धातूला 'स्सन्त' आणि 'स्समाण' प्रत्यय जोडून अपूर्ण भविष्यकाळाचे रूप तयार केले जाते. |
| (2) कर्ता नपुंसकलिंगी असेल तर धातूला अनुस्वार 'न्त' देऊन रूप तयार केले जाते. | (2) पुल्लिंग ⟶ इओ | (2) पुल्लिंग ⟶ न्तो, माणो |
| (3) कर्ता स्त्रीलिंगी असेल तर 'न्त' चा इकार करून स्त्रीलिंग रूप तयार केले जाते. | (3) स्त्रीलिंग ⟶ इई<br>(4) नपुंसकलिंग ⟶ इअं | (3) स्त्रीलिंग ⟶ न्ती, माणी<br>(4) नपुंसकलिंग ⟶ न्तं, माणं |
| (i) अहं नमन्तो (नममाणो)। | (i) अहं नमिओ। | (i) अहं नमिस्सन्तो (नमिस्समाणो)। |
| (ii) वयं पढन्तो (पढमाणो)। | (ii) वयं पढिओ। | (ii) वयं पढिस्सन्तो (पढिस्समाणो)। |
| (iii) तुमं पासन्तो (पासमाणो)। | (iii) तुमं पासिओ। | (iii) तुमं पासिस्सन्तो (पासिस्समाणो)। |
| (iv) तुम्हे णच्चन्तो (णच्चमाणो)। | (iv) तुम्हे णच्चिओ। | (iv) तुम्हे णच्चिस्सन्तो (णच्चिस्समाणो) |
| (v) सो पिबन्तो (पिबमाणो)। | (v) सो पिबिओ। | (v) सो पिबिस्सन्तो (पिबिस्समाणो)। |
| (vi) सा गायन्ती (गायमाणी)। | (vi) सा गाइई। | (vi) सा गाइस्सन्ती (गाइस्समाणी)। |
| (vii) तं गच्छन्तं (गच्छमाणं)। | (vii) तं गच्छिअं। | (vii) तं गच्छिस्सन्तं (गच्छिस्समाण)। |
| (viii) ते गच्छन्तो (गच्छमाणो)। | (viii) ते गच्छिओ। | (viii) ते गच्छिस्सन्तो (गच्छिस्समाणो)। |
| (ix) ता करेन्ती (करेमाणी)। | (ix) ता करिओ (करिई)। | (ix) ता करिस्सन्ति (करिस्समाणी)। |
| (x) ताणि सुणन्तं (सुणमाणं)। | (x) ताणि सुणिअं। | (x) ताणि सुणिस्सन्तं (सुणिस्समाणं)। |

# गज्ज-विभागो

# १. अविवेकस्स परिणामं

जीवन आनंदमय आहे की दुःखमय हे ज्याच्या त्याच्या विचारांवर आणि आचारांवर अवलंबून असते. अज्ञानाने आणि अविचारी आचरणाने मनाचा समतोल बिघडल्याने टोकाची भूमिका घेणाऱ्यांची संख्या समाजात अधिक असलेली दिसून येते. त्यामुळे जीवनामध्ये ताणतणाव निर्माण होतात.

आपल्या सभोवतालची परिस्थिती विचारात घेऊन आचरण केल्याने अनेक प्रकारचे अनर्थ टळण्यास मदत होते. शिवाय आपले जीवन सर्व सुखाचे निवासस्थान होण्यासही मदत होते; परंतु जे लोक अज्ञानाने, अविवेकाने आचरण करतात ते लोक स्वतःचे आणि इतरांचेही जीवन दुःखमय कसे करतात, ते या पाठातील चंडसोमाच्या उदाहरणातून स्पष्ट केलेले आहे. विद्यार्थ्यांनी ते लक्षात घेऊन आपल्यामध्ये असलेले अज्ञान, अविवेक, संशयी वृत्ती इत्यादींचा त्याग करून विवेकी विचाराने आचरण करून आपले व इतरांचेही जीवन सुखी, आनंदी करण्याचा प्रयत्न करावा असा या पाठाचा उद्देश आहे.

सदर पाठ हा आचार्य उद्योतनसूरींनी लिहिलेल्या 'कुवलयमाला-कहा' या प्राकृत कथाग्रंथातून घेतलेला आहे. या ग्रंथात कुवलयमाला आणि कुवलयचंद्र यांच्या प्रेमाची कथा दिलेली आहे व त्या कथेतून मानवी जीवनास योग्य अशा तत्त्वांचे प्रबोधन केलेले आहे.

रगडा नाम संणिवेसो। तत्थ सुसम्मदेवो नाम एगो गिहवइ वसइ। तस्स भद्दसम्मो णाम पुत्तो। सो य बालत्तणे चंडो, चवलो, गव्विओ, णिट्ठुरो, अभद्द-वयणो, अणवराहिणो अण्ण-डिंभे परिवाडयंतो परिभमइ। तस्स तारिस्सं सहावं दट्ठूण अण्ण-डिंभे तस्स चंडसोमो त्ति णामेण संबोहइ।

अण्णया तस्स माया-पियेण निय-कुल-समाण गुण-सील, माण-विहव बंभण कुलाए कण्णाए सह तस्स पाणिग्गहणं कया। तयणंतर तस्स माया-पिया तस्सेव उवरिं कुटुंबभारं णिक्खिऊण तित्थयत्ता-णिमित्तं णिग्गया।

एगम्मि दिणे तम्मि रगडा गामे एक्क णड-पेडयं संपत्ता। राईए पढम-जामे जोग्गो त्ति कलिऊण णडपेडेहिं गीय-मुरय-सद्दं आरंभन्ति। तं महुर सद्दं सुणिऊण सव्व गामउडा णाडयं पेच्छणत्थं गच्छिउं पयत्ता। तं दट्ठूण चंडसोमो चिंतिउं आढत्तो।

'अहं वि णाडयं पेच्छणत्थं गच्छामि। किंतु जइ णाडयं पेच्छणत्थं वच्चामि ता एसा मे जायाए कहं रक्खामि? ता णडो ण दट्ठव्वो। तीए वि णेज्जा ता ण जुत्तं होइ। तम्मि ठाणे बहुलं जुवाणाण णयणेहिं सा कवलियं होइ। मम भाया वि तं णडं दट्ठुं गओ त्ति। ता किं कायव्वं? सो चिंतेइ- 'मम भारियाए सिरिसोमाए भगिणीए गिहे ठविऊण णडं दट्ठुं वच्चामि' त्ति चिंतिऊण निय-भारियाए समं गओ सिरिसोमाए भगिणीए गिहे सा ठवइ।

किंचिए वेलाए सिरिसोमा भणिया नंदिणी, 'हला नंदिणी! अम्हे वि णडं पेच्छउं गच्छामो। तओ नंदिणी भणइ, 'हला सिरिसोमा! किं ण जाणसि णिय - भाउणो सहावं जेण एवं भणसि। णाहं अत्तणो जीवएण णिव्विणा। तुमं पुण जं जाणसि तं कुणसु' त्ति भणिऊण सा ठिया तत्थ। सिरिसोमा गया तं णडं दट्ठुउं ति।

इओ य णडं पेच्छमाणस्स तस्स चंडसोमस्स पिट्ठीए एक्क-जुवाण-मिहुणगं मंतेउं आढत्तं। भणियं च जुवाणेण, 'सुंदरि! तुमं निच्चं मम सुमिणे दीससि, हियए वससि, सव्व दिसासु घोलसि। किंतु अज्ज पच्चक्खं दिट्ठसि। ता अज्ज तुज्झ संगमजलेण मम मणोरहं पुण्णं होइ तं करेसु।' एयं मंतिज्जमाण वयणं सुयं च चंडसोमेण आसण्ण-संठिएण। दिण्णं च णेण कण्णं।

तम्मि वेलाए सा तरूणीए भणइ, 'हे बालय! अहं पि जाणामि तुमं पियंवओ, दढ-सोहिओ, कयण्णु परं मम पई चंडो सि। सो एत्थ कहिं पि णडं पेच्छइ।' चंडसद्दं सोऊण चिंतियं चंडसोमेण, 'णूणं एसा सा दुरायारा मम भारिया अत्थि, अहं इह आगयं जाणिऊण इमिणा केण वि विडेण सह मंतयंती। किंतु तेण ममं ण पेच्छइ। ता पुणो वि सुणेमि किं इमाणं दुरायारा बोल्लन्ति।'

तओ पडिभणियं जुवाणेण, 'सुंदरि, तव पइ चंडो सोमो व्व, इंदो जमो व्व होइ ता वि तुं अज्ज महं मिलियव्वं। अण्णहा तुज्झ पुरिस-वहस्स पावं लग्गइ।' तओ सा तरूणीए भणियं, 'जइ एवं तुह णिच्छओ ता जाव मम पई इह कहिं पि णडं पेच्छइ ताव अहं णिय-गेहं गच्छामि। तुमं पि मम मग्गालग्गेण तत्थ आगंतव्वा' त्ति भणिऊण सा णिग्गया।

तं सुणिऊण चंडसोमेण चिंतियं, 'रे रे! सा च्चिय एसा दुरायारा मम भारिया जेण भणियं इमीए, 'चंडो मह



पइ त्ति। अण्णं 'इह चेय पेच्छणए सा कहिं पि समागओ त्ति ण तीए एत्थ अहं दिट्ठो' त्ति। सो चिंतइ, 'पेच्छ, मम भारिया दुरायारा दुस्सीला य। तओ से सीसं अवस्सं छिंदामि त्ति चिंततो समुट्ठिओ।

महाकोह-धमधमायमाणो हियओ णियय-घराहुत्तं गंतूण घर-फलिहस्स पट्ठिभाए कोंटी-पहार-सज्जो अच्छिउं समाढत्तो।

इओ य उक्खेडे पेच्छणाए तस्स भाया भइणी य घर-फलिहय-दुवारेण पविसमाणा दिट्ठा कोह-वसएण-अंधेण जुत्तं चंडसोमेण पहओ कोंटीए भाया भइणी वि य। ते य दुवे वि णिवडिया धरणिवट्ठे। तओ कोहवस-चंडसोमो बोल्लइ, 'किर, एसो पुरिसो, एसा वि सा मम दुरायारी भारिया'।

तं सुणिऊण जग्गइ तस्स णंदिणी भारिया। तं दट्ठूण ससंभमाए णंदिणीए भणियं, 'हा, हा दुरायार! किं एयं तए करियं। णियय बहिणी-भाया च घाइया तुमं।' तं च वयणं सोऊण ससंभणेण णिरूविया जाव पेच्छइ ताव णिय भइणी-भाया च दिट्ठियं। तओ संजाय-गरूय-पच्छायावेण चिंतियं तेण-

**'हा, हा! मए अकज्जं कह णु कयं पाव-कोव-वसएणं।**
**मिच्छा-वियप्प-कप्पिय जाया अलिया-अवरोहण'।।**

**अलिय** – खोटे, असत्य
**संणिवेसो** – गाव, वाडी, वस्ती
**गिहवइ** – गृहपती
**चंडो** – भयंकर
**चवलो** – चपल
**गव्विओ** – गर्विष्ठ
**णिट्ठुरो** – निष्ठुर
**अभद्दवयणो** – अभद्र वचनी, वाईट बोलणारा
**अणवराहिणो** – अपराधरहित
**डिंभे** – मुले
**परिवाडयंतो** – मारत, मारहाण करत
**तारिसं** – त्या प्रकारचा
**संबोहइ** – संबोधने
**अण्णया** – एकदा
**विहव** – वैभव
**जाया** – पत्नी
**कण्णाए** – कन्येशी
**णिक्खिऊण** – टाकून, देऊन
**णड–पेडयं** – नटांचा समूह
**संपत्ता** – पोहोचणे, येणे
**राईए** – रात्री
**जामे** – प्रहर, वेळ
**मुरय** – मृदंग
**सद्द** – शब्द
**गामउडा** – गावकरी, लोकांचा समूह
**णाडयं** – नाटक
**पयत्ता** – प्रवृत्त होणे
**आढत्तो** – आरंभ करणे
**तव** – तुझा
**इंदो** – इंद्र
**जमो** – यम
**व्व** – प्रमाणे, समान, सारखा
**णिच्छओ** – निश्चय
**णियय, णिय** – स्वतःच्या
**धमधमायमाण** – धगधगत असताना
**घराहुत्तं** – घराच्या दिशेने, घराकडे
**फलिहस्स** – फळीच्या, दरवाजाच्या
**मिच्छा** – मिथ्यत्व खोटे
**अवरोहणं** – अपराध, आरोप
**वच्चामि** – जातो
**जायाए** – पत्नीस
**कहं** – कसे
**णेज्जा** – नेणे
**बहुलं** – पुष्कळ
**कवलियं** – खाणे, ग्रासणे
**कायव्वं** – करावे
**हला** – सखी
**वियप्प** – विकल्प, विचाराने
**अत्तणो** – स्वतःच्या
**णिव्विणा** – विरक्त होणे
**ठिया** – थांबणे, राहाणे
**इओ** – इकडे
**मिहुणगं** – जोडी
**मंतेउं** – चर्चा करताना
**सुमिणे** – स्वप्नात
**हियए** – हृदयात
**घोलसि** – दिसणे, भास होणे
**सुयं** – ऐकणे

**आसण्ण** – जवळ
**संठिएण** – थांबणे, राहणे
**णूणं** – खरोखर
**इह** – येथे
**इमिणा** – हिने, ही
**विडेण** – परपुरुषांशी, दुराचारी पुरुषांशी
**पडिभणियं** – उत्तर देणे
**पिट्ठिभाए** – पाठीमागे
**कोंटी** – शस्त्र, हत्यार
**अच्छिउं** – राहणे, थांबणे
**उक्खेडे** – संपणे, उपटून टाकणे
**पहओ** – प्रहार, आघात केला
**णिवडिया** – पडला
**किर** – खरोखर
**ससंभमाए** – गोंधळलेल्या अवस्थेत
**घाइया** – घात केलास, मारलेस
**संजाया** – होणे, झाला

## कृती

**1. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(i) भद्रसोमाचा स्वभाव कसा होता?
(ii) भद्रसोमास चंडसोम असे नाव का देण्यात आले?
(iii) भद्रसोमास नाटक पाहण्याची इच्छा का झाली?
(iv) चंडसोमाने आपल्या पत्नीस नाटक पाहण्यासाठी का नेले नाही?
(v) चंडसोमाने आपल्या पत्नीस कोठे व का ठेवले?
(vi) सिरिसोमा कोण होती?
(vii) सिरिसोमाने नंदिनीस कोणती विनंती केली?
(viii) नंदिनी नाटक पाहण्यास का गेली नाही?

**2. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(i) 'अहं वि णाडयं पेच्छणत्थं गच्छामि'।
(ii) 'किं ण जाणसि णिय-भाउणो सहावं'।
(iii) 'सुंदरि! तुम निच्चं मम सुमिणे दीससि'।
(iv) 'णूणं एसा सा दुरायरा मम भारिया अत्थि'।
(v) 'तुज्झ पुरिस-वधस्स पावं लग्गइ'।
(vi) 'हा, हा दुरायारं! किं एयं तए करियं'।

**3. रिकाम्या जागा भरा.**

(i) जइ णाडयं पेच्छणत्थं वच्चामि ता एसा मे ------- रक्खामि।
(ii) ------- णडं पेच्छिउं गच्छामो।
(iii) हे बालय, अहं पि ------- पियंवओ।
(iv) जइ एवं तुह ------- ता तुमं पि मम ------- तत्थं आगंतव्वा।
(v) णिय बहिणी भाया य -------।

**4. खालील शब्दांसाठी पाठातील प्राकृत शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (i) | पत्नी | → |
| (ii) | यम | → |
| (iii) | हृदय | → |
| (iv) | खरोखर | → |
| (v) | पाठीमागून | → |
| (vi) | प्रिय बोलणारा | → |
| (vii) | चर्चा करताना | → |
| (viii) | जवळ | → |

## 5. कोण ते लिहा.

(i) बहिण–भावाचा वध करणारा –

(ii) चंडसोमाची पत्नी –

(iii) नाटक पाहण्याची इच्छा करणारा –

(iv) तुझा पती चंड असो की सोम; इंद्र असो की यम म्हणणारा –

(v) हे, हे! दुराचारा! तू हे काय केलेस म्हणणारी –

## 6. खालील वाक्यांची प्राकृत भाषेत कृती करा.

(i) मीही नाटक पाहण्यासाठी जातो.

(ii) माझ्या पत्नीस बहिणीच्या घरी ठेवतो.

(iii) आपल्या भावाचा स्वभाव जाणत नाहीस काय?

(iv) सुंदरी! तू मला स्वप्नातही दिसतेस.

(v) खरोखर, हाच तो पुरुष आणि हीच ती दुराचारी पत्नी.

## 7. उपक्रम :

क्रोधाचे आणि संशयी स्वभावाचे दुष्परिणाम या विषयावर दहा ते पंधरा ओळीत माहिती लिहा.


# २. भाणुदासस्स गव्वहरणं

अहंकार हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या नाशास कारणीभूत होतो. अहंकारी व्यक्तीचे आचरण अविनयी असते. त्यामुळे ती व्यक्ती कितीही विद्वान असली, तरी त्याच्या विद्वत्तेचा उपयोग कोणालाही होत नाही.

भानुदास नावाचा एक अत्यंत विद्वान पंडित होता. त्याला त्याच्या विद्वत्तेचा खूप गर्व झाला होता. तेव्हा त्याच्या विद्वत्तेचा गर्व नष्ट करण्याचे सरस्वती देवीने ठरविले. वृद्ध स्त्रीचे रूप घेऊन सरस्वती देवीने भानुदासाचे गर्वहरण कसे केले, याचे अत्यंत सुंदर चित्रण प्रस्तुत पाठात केले आहे.

तेव्हा विद्यार्थ्यांनीही प्राप्त केलेल्या ज्ञानाचा अहंकार न धरता ते ज्ञान स्वतःच्या व इतरांच्या विकासासाठी कसे उपयुक्त होईल यासाठी प्रयत्नशील राहावे, हे प्रस्तुत पाठातून स्पष्ट केले आहे.

भाणुदासो नामस्स एगो पंडिओ अत्थि। सो विविह कला-विज्जा संपण्णो अत्थि। तेण सो अच्चंतं गव्विओ होइ। अन्नया सो अण्णं गामं गच्छंतो पवासम्मि तण्हाए तसं होइ। तम्मि वेलाए कहिं अंतराए एगा वुड्ढ-इत्थि कूवाए जलं भरइ। तीए समीवं गच्छिऊण सो भणइ, 'भो माया! अहं तण्हाए बहुलं वाउलं होमि। ता ममं थोवं जलं देहि। तेण तुमं पुण्णं लब्भइ।'



**वुड्ढइत्थी** – 'बालय! अहं तुमं ण जाणामि। किवाए पढमं तुमं परिचयं देसु।'

**भाणुदासो** – अहं एगो पवासी अत्थि।

**वुड्ढइत्थी** – 'वच्छ! केवलं दुवे च्चिय पवासी सन्ति। एगो चंदो, बीओ य सूरिओ। एए दुवे वि रत्तिए दिणे पवासं करेन्ति।

**भाणुदासो** – अम्मो! अहं अतिथी। सव्वठाणे लोगा अतिथीं जलं देन्ति। तओ ममं जलं देसु।

**वुड्ढइत्थी** – 'रे वच्छ! इमे लोए दुवे च्चिय अतिथी आसि। एगं धणं, बीओ य तारुण्णं। एए दुवे वि दीह-कालं ण वसन्ति। तओ सच्चं कहेसु तुमं को अत्थि?'

**भाणुदासो** – 'अम्मा! अहं सहणसीलो। एण्हिं ता ममं जलं देसु।'

**वुड्ढइत्थी** – 'अरे, पुत्त! दुवे चिय सहणसीला सन्ति। एगा धरणीमाया, बीओ य रूक्खो। धरणीमाया पुण्णवंत-अपुण्णवंत य लोगाणं वि भारं सहेइ। जे लोग रूक्खोवरि पहरन्ति ताणं वि सो महुरं महुरं फलं पुप्फं च देइ।

**भाणुदासो** – (वुड्ढ-महिलाए तं वयणं सुणिऊण भणइ) 'अंबा! अहं निब्बंधं जाणिऊण देसु ममं उदगं।'

**वुड्ढइत्थी** – 'रे पुत्त! णहिं, णहिं तुमं निब्बंधं वि न

होसि। इह लोए दुवे चिय निब्बंधं। एगो नहं, बीओ केसं।' ताणं सययं खुड्डइ तओ वि ते णिच्चं वड्ढन्ति। (एवं पयारे सा वुड्ढइत्थीए चउरजुत्तं वयणं सुणिऊण भाणुदासो ससंभमं पडइ। अईव वाउलं होऊण भणइ)


**भाणुदासो** – 'भो माया! अहं मुक्खो अत्थि। एण्हिं ता मम उदगं देहि।'

**वुड्ढइत्थी** – 'रे बालय! एए पुहवीए दुवे चिय मूढा अत्थि। एगो राया, सो निबुद्धो होऊण वि सव्वोवरिं रज्जं करेइ। बीओ पंडिअ-जणा, जे रन्नाए रंजणत्थं असच्च-घडणा वि सच्चं ति सिद्धं करणत्थं पयत्तं करेन्ति।

**भाणुदासो** – तं वुड्ढाए वयणं सुणिऊण भाणुदासो मोणं धारणं करेइ। तीए वुड्ढाए चरणं निय मत्थयं ठविऊण अईव वाउलं होऊण विण्णवइ, 'अम्मो, ममं णिरं देसु।'

**वुड्ढइत्थी** – 'उट्ठसु वच्छ! उट्ठसु।'
(एवं भिण्णं रवं सुणिऊण विम्हिय-मणेण भाणुदासो उवरिं पासइ ताव तस्स वुड्ढइत्थिए ठाणे पच्चक्खं सरस्सइदेवी दिट्ठइ। विलक्खिओ सो अईव विणएण तं सरस्सइदेवीं वंदणं करेइ।)

**वुड्ढइत्थी** – 'भो भाणुदास-वच्छे! विज्जाए णाणस्स वुड्ढीं होइ। अहंकारेण सव्वणासं चिय होइ। तुमं तुज्झ णाणस्स गव्वं होइ। अहंकारेण मणुस्सं जसं, सम्माणं, कित्ती ण लब्भइ।' 'विज्जा विणएण सोहइ' तओ जइ तुमं जसं-कित्ति-सम्माणं इच्छसि ता तुज्झ हियए गव्वं मुंचसु। एयं पडिबोहणत्थं मए वुड्ढइत्थीए रूवं घेइ।'



## शब्दार्थ

**अन्नया** – एकदा
**पवास** – प्रवास
**वुड्ढ-इत्थी** – वृद्ध स्त्री
**वाउलं** – व्याकूळ
**रूक्ख** – वृक्ष
**मुक्ख** – मूर्ख
**वयणं** – बोलणे
**विम्हिय** – विस्मय, आश्चर्य
**विलक्खिओ** – आश्चर्यचकित झालेला
**मुंच** – सोडणे, त्यागणे
**महुर** – गोड
**पुप्फ** – फुले
**खुड्ड** – तोडणे
**वि** – सुद्धा
**ससंभमं** – संभ्रमित होणे
**उयय** – पाणी
**निब्बधं** – निर्बुद्ध, हट्टी
**रन्ना** – राजा
**पच्चक्खं** – प्रत्यक्ष
**हियय** – हृदय
**पडिबोह** – प्रतिबोध

**1. खालील आकृती पूर्ण करा. (कोण ते लिहा)**

1) विद्वत्तेचा गर्व करणारा → ☐

2) पाण्यासाठी याचना करणारा → ☐

3) केवळ दोनच प्रवासी → 1) ☐ 2) ☐

4) भानुदासास प्रतिबोधित करणारी → ☐

**2. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) धरती आणि वृक्ष | अ) अतिथी |
| 2) चंद्र आणि सूर्य | ब) मूर्ख |
| 3) नख आणि केस | क) प्रवासी |
| 4) धन आणि तारुण्य | ड) हट्टी |
| 5) राजा आणि पंडित | इ) सहनशील |

**3. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | धणं | दव्वं | कव्वं | → |
| 2) | अक्ख | रूक्ख | दुम | → |
| 3) | पुहवी | धरणी | वसदी | → |
| 4) | गव्व | सव्व | अहंकार | → |
| 5) | सुरय | भारय | वासरमणी | → |

**4. भानुदासाच्या गर्वहरणाचा प्रसंग सविस्तर लिहा.**

❋❋❋

# ३. आयार-धम्मस्स महत्तं

समाजात केवळ उपदेश देणारे अनेक लोक आहेत; परंतु उपदेशाप्रमाणे आचरण करणारे लोक फारच कमी असतात. कारण एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देणारे लोक अधिक आहेत, तर काही लोक धार्मिक आचार-विचारांवर व्यर्थ बडबड करत असतात. त्यांच्याकडून एकाही धार्मिक आचार-विचाराचे पालन होत नाही. त्यामुळे ते लोक स्वतःचा विकास कसा करणार?


परंतु जे लोक आपल्यापेक्षा श्रेष्ठ व्यक्तीकडून धर्मोपदेश किंवा हितकर वचन ऐकून त्याचा प्रत्यक्ष आचरणात उपयोग करतात त्यांनाच जीवनामध्ये यश प्राप्त होते; परंतु जे लोक गुरुजनांच्या हितकर उपदेशाकडे दुर्लक्ष करतात. त्यांना जीवनात यश कसे प्राप्त होणार?

जीवनात यश प्राप्त करावयाचे असेल, तर पाठातील तिसऱ्या पुतळ्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी गुरूंचा हितकर उपदेश आत्मसात केला पाहिजे. तरच विद्यार्थ्यांना जीवनात श्रेष्ठत्व प्राप्त होईल.

तसेच या पाठातील तीन पुतळ्यांच्या परीक्षणातून कालिदासाचे बौद्धिक श्रेष्ठत्वही स्पष्ट होते. विद्यार्थ्यांनीही कालिदासाप्रमाणे बुद्धिचातुर्य प्राप्त करून आपले श्रेष्ठत्व स्पष्ट केले पाहिजे असेही या पाठातून स्पष्ट केले आहे.

सदर पाठ हा आचार्य विजय-कस्तूर-सूरींनी लिहिलेल्या 'पाइय-विण्णाण-कहा' भाग-1 मधून घेतलेला असून त्यातून आचरणाचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे.

भोय-नरिंद-सहाए एगया को वि वइएसिओ आगओ। तया तीए सहाए कालिदासाइणो अणेगे विउसा संति। सो वइएसिओ नरिंदं पणमिऊण कहेइ, 'भो नरिंद! अणेग-विउस-वरं अलंकियं तव सहाए नच्चा पुत्तलिगा-तिग-मुल्ल-करणत्थं तुम्ह समीवे हं आगओ म्हि।' एवं कहिऊण सो तं पुत्तलिया रन्नस्स करे अप्पिऊण कहेइ, 'जइ सिरिमंताणं विउस-वरा एयासिं उइयं मुल्लं करिस्संति, तया अन्न-नर-वर-सहासु मए लब्भा जे विजयंकित-लक्ख चंदगा ते दायव्वा, अन्नहा अहं विजयंकिय-सुवण्ण-चंदगं एगं गिण्हिस्सं।'



तओ रन्ना पुत्तलीओ मुल्ल-करणत्थं विउस-हत्थेसु अप्पियाओ। को वि विउसो कहेइ, 'पुत्तलिगा-गय-सुवण्णस्स परिक्खं निहसेण भो मणिगारा! तुम्हे कुणेह परिक्खा।' तेण ताण पुत्तलिगा तुलाए आरोविऊण मुल्लं अंकेह। तया सो वइसेओ ईसिं हसिऊण कहेइ, 'एरिस-प्पयारेण मुल्ल-निरुवगा जयम्मि बहवे लोगा संति। एस्स सच्चं मुल्लं जं सिया, तं नाउं भोय-नरिंद-सभाए समागओ म्हि।'

एवं सोच्चा पंडिया पुत्तलिगाओ करे गहिऊण सम्मं निरुविंति, किंतु पुत्तलिगा-तिगस्स रहस्सं नाउं न तीरंति। तया कुद्धो नरिंदो वएइ, 'एयाए महईए परिसाए कोवि एयासिं मुल्लं काउं ण समत्थो? धि, द्धि तुम्हाणं।'

तयणंतरं सो राया कालिदासो पंडिओ बोल्लाविऊण कहेइ- 'दिण-त्तएण-आवस्सं एयं मुल्लं कहेसु' त्ति। कालिदासो तं पुत्तलिगा गहिऊण घरम्मि गओ। सो ताओ पुणो पुणो निरिक्खेइ। तया तेण ताणं पुत्तलीणं कण्णेसु छिद्दाइं पासेइ, पासित्ता तेसु छिद्देसु तणुगं सलागं पक्खिवेइ। एवं सव्वाओ सलागा-पक्खिऊण निरुविय तासि मुल्लं पि अंकेइ।

ति-दिण-अंते कालिदासो नरिंद-सहाए गंतूण ताणं पुत्तलिगा निवस्स पुरओ कमेण ठवेइ। तेण नरिंदं वुत्तं, 'भो नरिंद! एसा पढमाए पुत्तलिगाए मुल्लं एगं कवड्डियामेत्तं अत्थि। बीआए एगं रुवगं मुल्लं। तइआए मुल्लं एगं लक्ख-रुवगं अत्थि। तं पुत्तलिगाए मुल्लं सुणिऊण सव्वे सहाजणा अच्छेरं जायं। तओ वइएसिएण कहियं - 'एएण सच्चं मुल्लं कहेइ। अहं वि एयं चिय अणुमयं देमि।'

राइणा कालिदासो पुट्ठो, 'एआसिं पुत्तलिगा वण्ण रूवाणं समाण-पमाणं अत्थि तओ वि कहं विसमं मुल्लं कहियं' त्ति? कालिदासो कहेइ, 'भो नरिंद! एए पढम-पुत्तलिगाए मुल्लं कवड्डिमेत्तं अत्थि। जओ इमीए कण्ण-च्छिद्दे सलागा पक्खिविया, तओ सा सलागा बीअ-कन्न-च्छिद्दाओ बाहिरं निग्गया।' तओ सा एवं उवएसेइ, 'जयम्मि धम्म-सोयारा ति-विहा-पयारा अत्थि। पढमो सोयारो एरिसो होइ। जो अप्पहिय-कारग-वयणं सुणिऊण अवर-कण्णाओ निस्सारेइ, न य तयणुसारेण पयट्टेइ। सो सोयारो पढम पुत्तलिगा-सरिसो होइ। तेण तस्स किं पि मुल्लं नत्थि। अओ मए पढम-सोयारा-सम-पढम-पुत्तलियाए मुल्लं कवडिया-मेत्तं कहियं।'

बीअ-पुत्तलियाए कण्णे पक्खित्ता सलागा मुहेण निग्गया। सा पुत्तलियाए एवं कहेइ, 'जयम्मि के वि सोयारा एयारिसा हुंति। जे अप्प-हियगरं वयणं सुणंति, किंतु तं वयणं अन्नं च उवएसंति, किंतु सयं न आयरन्ति। एरिसा सोयारा बीय-पुत्तलिगा-सरिसा नायव्वा। तेण बीय-पुत्तलिगाए मुल्लं मए रूवगं एगं कहियं।'

तइय-पुत्तलियाए कण्णे पक्खित्ता सलागा बाहिरं न निग्गया, सा हियए ओइण्णा। सा एवं उवदेसइ, 'केवि भव्व-जीवा इमं सरिच्छा हवंति। जे उ परलोग-हियगर-वयणं उवउत्ता सम्मं सुणेइ, धम्म-कज्जेसु जह-सत्तिं पवट्टंते। एरिसा सोयारा तइय-पुत्तलिगाए मुल्लं लक्ख-रूवगं त्ति जाणावियं।'

एवं पयारं कालिदासस्स वयणं सोच्चा भोय-राया अन्ने वि य पंडिया संतुट्ठा। सो वइएसिओ तं चंदग-लक्खं नरिंदग्गओ ठवेइ। राया तं सव्व-धणं कालिदासस्स अप्पेइ।

## शब्दार्थ

**वइएसिय (वैदेशिक)** – परदेशी व्यक्ती
**विउस** – विद्‌वान
**नच्चा** – जाणून
**नाउं** – जाणण्यासाठी
**पुत्तलिगा** – पुतळी
**उइय** – योग्य (उचित)
**ईसिं** – थोडेसे, किंचित
**अंकेह** – निश्चित केले
**सिया** – असलेले
**सोच्चा** – ऐकून
**वुत्तं** – बोलले, म्हटले
**अवर** – दुसऱ्या
**पराइय (पराजित)** – पराभूत
**पवट्ट** – प्रवृत्त होणे

**निहस (निकष)** – कसोटीचा दगड

**अओ** – म्हणून, त्यामुळे

**नायव्वा** – जाणावे

**लक्खचंदग** – चांदीचे एक लक्ष रुपये, चांदीचे पदक

**निरूव** – निरखून बघणे

**सुहुमदिट्ठी** – बारकाईने पाहण्याची नजर

**तणुगा (तनुका)** – बारीक

**सलागा (शलाका)** – काडी, तार

**पक्खिवेइ** – टाकले, फेकले

**कवड्डिया** – कवडी

**धम्मसोयारा** – धर्म श्रोते

**अप्पहियगर** – स्वतःच्या फायद्याचे

**ओइण्णा (अवतीर्णा)** – उतरलेली

**करे** – हातात

**वएइ** – बोलणे

**तीरंति** – समर्थ, शक्य होते

**त्तएण** – तीन

**पुरओ** – पुढे

**पुट्ठो** – विचारले

## कृती

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(i) कालिदासाने तीन पुतळ्यांचे मूल्य कसे ठरविले?

(ii) या पाठातील तीन पुतळीवरून कोणते तीन प्रकारचे श्रोते सूचित केले आहेत?


**2. कारणे लिहा.**

(i) पहिल्या पुतळीचे मूल्य कवडीमूल्य आहे. कारण –

(ii) भोजराजा क्रोधिष्ठ झाला. कारण –

(iii) तिसऱ्या पुतळीचे मूल्य लक्ष रुपये आहे. कारण –

**3. आकृती पूर्ण करा.**




**4. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(i) 'एया महईए परिसाए कोवि एयासि मुल्लं काउं न समत्थो? धिद्धि तुम्हाणं।'

(ii) 'दिणत्तएण–आवस्सं एयं मुल्लं कहेसु।'

(iii) 'एएण सच्चं मुल्लं कहेइ।'

(iv) 'एआसि पुत्तलिगा वण्ण रूवाणं समाण–पमाणं अत्थि तओ वि कहं विसमं मुल्लं कहियं त्ति?'

**5. अर्धमागधी–प्राकृत भाषेत रूपांतर करा.**

(i) शलाका – ________

(ii) सभा – ________

(iii) सुवर्ण – ________

(iv) लक्षचंद्रक – ________

(v) उचित – ________

(vi) श्रोता – ________

**6. योग्य ते पर्याय शोधून वाक्ये पुन्हा लिहा.**

(i) दिण–त्तएण–आवस्सं एयं मुल्लं -----। (कहेसु / कहेह / कहेइ)

(ii) एएण सच्चं मुल्लं -----।
(कहेइ / कहेसि / कहेमि)

(iii) पंडिया पुत्तलिगाओ करे ----- सम्मं निरुविंति। (गहिऊण / गहिउं / गहिमि)

(iv) कालीदासो तं पुत्तलिगा गहिऊण ----- गओ। (घरम्मि / घरसि / घरेइ)

**7. पुढील समासांचा विग्रह करून नावे द्या.**

(i) पुत्तलिगामुल्लं

(ii) चंदगलक्खं

(iii) जहसत्तिं

(iv) भव्वजीवा

❋❋❋

# ४. पुण्ण-कम्मस्स फलं

आयुष्यभर वाईट कर्म करणाऱ्या व्यक्तीच्या हातून अजाणतेपणे एखादे शुभ कर्म किंवा पुण्यकर्म घडले तर तेवढ्याशा शुभकर्मामुळेही त्या व्यक्तीचे आयुष्य पूर्णपणे कसे बदलून जाते, ते या पाठात पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे.

या पाठात तीन प्रकारच्या व्यक्तींची व्यक्तिचित्रणे आलेली आहेत. पहिले व्यक्तिमत्त्व चोरीसारखे वाईट कर्म करून संपत्तीचा संग्रह करणारा मंडिकचोर. दुसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे चोरीसारख्या वाईट कार्यात आपल्या चोर भावास मदत करणारी त्याची चोर भगिनी आणि तिसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे जनतेला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून सतत दक्ष असलेला मूलदेव राजा.

जनतेला त्रास होऊ नये म्हणून कष्ट घेणाऱ्या राज्यकर्त्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चाललेली आहे; परंतु या पाठातील मूलदेव राजा मात्र स्वतःचा जीव धोक्यात घालून अत्यंत धैर्याने व संयमाने जनतेला लुटणाऱ्या चोरांचा शोध तर घेतोच शिवाय चोरांनी चोरलेली संपत्तीही जनतेला परत करतो. चोरीसारखे अशुभ कर्म करणाऱ्या भावास सहकार्य करणाऱ्या चोर भगिनीच्या हातून अजाणतेपणे एकास जीवदान देण्याचे एक पुण्यकर्म घडते. त्या कर्माचे फळ म्हणून तिला राजाची राणी होण्याचे भाग्य लाभते. म्हणून प्रत्येकाने समाजाला व इतरांना घातक ठरणारे वाईट कर्म न करता समाजाला लाभदायक कर्म करावे. त्यामुळे त्या व्यक्तीस श्रेष्ठत्व कसे प्राप्त होते, ते या पाठातून चोर भगिनीच्या उदाहरणातून स्पष्ट केलेले आहे.

आ. देवेंद्रगणींनी लिहिलेल्या 'सुखबोध-लघुवृत्ती' (अ.4 पान 94-95) मधून ही कथा घेतलेली असून चांगल्या कर्माचे चांगले फळ कसे प्राप्त होते ते येथे स्पष्ट केले आहे.

वेण्णायडे नयरे मंडिओ नाम तुण्णाओ अत्थि। सो निच्चं परदव्वस्स हरणं करेइ। सो दुट्ठ-गंडो मि त्ति जणे पगासंतो जाणु-देसे निच्चमेव अद्दव-लेव-लित्तेण बद्ध-वण-पट्टं करिऊण रायमग्गे तुण्णाग-सिप्पं उवजीवइ। चक्कमंतो वि य दंडधरिएण पाएणं किलिमंतो कहं वि चक्कमइ रत्तिं च खत्तं खणिऊण दव्वजायं घेत्तूण नयर-सन्निहीए उज्जाणग-देसे भूमिघरं तत्थ निक्खिवइ।


तम्मि भूमिघरम्मि से भगिणी कन्नगा चिट्ठइ। तस्स भूमिघरस्स मज्झे एगो कूवो। जं च पुरिसे सो चोरो दव्वेण पलोभेउं दव्वं गेण्हविउं आणेइ। तओ तस्स भगिणी तं पुरिसं कूव-समीवे पुव्वत्थ-आसणे निवेसेउं पाय-सोय-लक्खेण पाए गेण्हिऊण तम्मि कूवए पक्खिवइ। तेण सो पुरिसो विवज्जइ।

एवं कोइ कालो वच्चइ किंतु नयरं मुसंतस्स चोरग्गाहा न सक्केंति तं गेण्हिउं, तओ नयरे बहुरवो जाओ। तत्थ मूलदेवो राया। कहिओ य तस्स पउरेहिं तक्कर-वइयरो जहा, 'एत्थ नयरे पभूय-कालो मुसंतस्स वट्टइ, 'कस्स वि तक्करस्स, न य तीरइ'। केण वि गेण्हिउं, ता करेउ किं पि उवाय'। ताहे सो अन्नं नयर-रक्खियं ठवेइ। सो वि न सक्कइ चोरं गेण्हिउं।

एगया मूलदेवो सयं नील-पडं पाउणिऊण रत्तिं निग्गओ। मूलदेवो अणज्जंतो एगाए साहाए निसण्णो अच्छइ, जाव सो मंडिय-चोरो समीवं आगंतु भणइ, 'को एत्थ अत्थि'? मूलदेवेण भणियं, 'अहं कप्पडिओ' त्ति, तेण भणइ, 'मणुण्णं करेमि'। मूलदेवो उट्ठिऊण तस्स मग्गाओ गच्छइ।

मंडिय-चोरेण एगम्मि सेट्ठिस्स घरे खत्तं कयं। अंतं गच्छिऊण बहुलं दव्वं बाहिं कड्ढेइ। तं दव्वं मूलदेवस्स मत्थयं उवरिं ठविऊण नयरस्स बाहिरियं गच्छिउं पयट्ठा। मूलदेवो पुरओ चलइ। चोरो असिं कड्ढिऊण पिट्ठिओ

गच्छइ संपत्ता भूमिगिहं। मंडिओ चोरो तं दव्वं निय-गिह-अंगणे निहिउं आरद्धो। तेण निय भगिणीं भणिया, 'एयस्स पाहुणयस्स पाय-सोयं देहि'।



तओ तीए मूलदेवं कूवतडे सन्निविट्ठे आसणे निवेसिओ। पाय-सोयत्थं जाव 'पाओ गहिओ कूवे छुहामि' त्ति ताव मूलदेवस्स अईव सुउमारा-पायं दिट्ठिऊण सा चिंतेइ, 'एएण पुव्वं कोवि काले रज्जसुहं अणुभवइ किंतु संपयं कम्म-दोसेण विहलिय-अंगो होइ'। तीए हियए तस्स कए अणुकंपा जाया। तओ तीए मूलदेवस्स पायतले-सण्णिओ करिऊण 'इयाओ सिग्घं नस्सह त्ति मा मरिज्जिहिसिं' ति। तीए सण्णिएण सो वि पलाओ।

तयणंतरं सा भगिणी उच्चसरेण भणइ, 'सो पलाइओ, पलाइओ' त्ति। तं सुणिऊण मंडिओ चोरो असिं कड्ढिऊण तस्स मग्गे ओलग्गो। तं चोरस्स समीवं आगच्छंतं दिट्ठिऊण मूलदेवो रायपहे मंदीरे सिवपडिमा-अंतरिओ ठिओ। चोरो तत्थ गच्छिऊण तं सिव-लिंग 'एसो च्चिय सो पुरिसो' त्ति नाऊण निय-असिणा दढ-पहारेण सिव-लिंगस्स दुवे भागा करिऊण पडिनियत्तो। तस्स भएण मूलदेवो रत्तीए तत्थेव वसिऊण पहायाए गओ रायभवणे।

बीय-दिणे मूलदेवेण निय रायपुरिसेहिं सद्दाविओ मंडिओ चोरो। तओ मंडियचोरेण चिंतियं जहा, 'रत्तिए सो पुरिसो नूणं न मारिओ अवस्सं च सो राया भविस्सइ' त्ति। रायपुरिसेहिं वि सो आणिओ रायसहाए तओ अब्भुट्ठाणेण सम्माणियं राइणा। आसणे निवेसाविओ। सुहं च अभासिऊण राइणा भणइ, 'तव भगिणिं मम देहि' त्ति। मंडिएण तं पडिवन्ना। मूलदेवराइणा तस्स भगिणीए समं विवाहं कया।

कइवए दिणेसु गएसु मूलदेवो राइणा मंडिओ भणियं, 'दव्वेण कज्जं'ति। तओ मंडिएण सुबहुं दव्वं दिन्नं। कइवए दिणेण मंडिअ-चोरस्स सम्माणिऊण पुणो वि दव्वं मग्गिओ तेण पुणो वि बहुलं दव्वं दिन्नं।

एएण पयारेण राइणा मंडिओ चोराओ समीवाओ सव्व-दव्वं गिण्हियं। राइणा मंडिय-चोर भगिणीए पुच्छिया 'तव बंधुस्स पासे केत्तियं दव्वं अत्थि'। तीए भणियं, 'एत्तियं चेव दव्वं अत्थि?' तओ नयरीए-सव्वाण-लोगाण सद्दाविऊण पुव्वा-वेइय-लेखाणुसारेण सव्व-दव्वं दाावविऊण मंडिओ चोरो सूलाए आरोविऊण मच्चूदंडं देइ।

(सुखबोधालघुवृत्ती अ. 4, पान 94-95)

## शब्दार्थ

**अद्दाव** – द्रवरहित, कोरडा

**अंतरावणे** – मार्गावरील दुकान

**अब्भुट्ठाए** – ऊठून उभे राहणे

**असिं असिण्णा** – तलवार

**आसणे** – पाठ, आसन

**आभासिऊण** – विचारपूस, चौकशी करून

**ओलग्गिउं** – सेवा करणे, पाठीमागून जाणे

**उवजीवइ** – उपजीविका जगणे

**कंक** – एकप्रकारचे तीक्ष्ण हत्यार

**कप्पडिओ** – भिकारी

**किलिम्मंतो** – क्लेशाने, कष्टाने

**खत्तं–खयं** – भिंत, भूभाग खोदून, छिद्र, भगदाड पाडणे

**गंडो** – एकप्रकारचा गुडघ्याचा रोग

**चक्कमइ** –, **चक्कमंतो** – अडखळत, लंगडत चालणे

**चोरग्गाहा** – चोराला पकडणारे सेवक

**चिट्ठइ** – राहतो

**छुहामि** – स्पर्श करतो, धक्का मारतो

**तक्कर** – तक्रार करणारा, चोर

**तुण्णाग** – तुणणारा, कपडे शिवणारा

**तडे** – काठावर, कडेला

**निक्खिवइ** – पाहिले

**निवेसाविओ** –, **निवेसिओ** – बसविले

**निहणिउं** – पुरून ठेवून

**नूणं** – खरोखर

**णेण** – त्याने

**पउरेहिं** – लोकांनी

**पगासेंतो** – प्रकट करणे

**पड** – कापड, पट

**पयट्टा** – प्रवृत्त होणे

**पाउणिऊण** – पांघरूण, लपेटून, गुंडाळून

**पायसोय** – पाय धुणे

**पुव्वत्थं** – पूर्वीच, अगोदर

**अंतरिओ, अंतं** – आत, मध्ये

**अणज्जंतो** – ओळखले जाणार नाही

**अच्छइ** – बसला, थांबला

**पडिनियत्तो** – परत जाणे

**मणुण्णं** – मन आनंदी करणे, इच्छा पूर्ण करणे

**मुसंतस्स** – फसविणे, लुटणे

**बहुरवो** – पुष्कळ, गोंधळ

**वइयरो** – वृत्तांत, बातमी

**वणपट्टं** – जखम बांधणे, मलमपट्टी बांधणे

**वट्टइ** – होइ

**विहलियंगो** – विकलांगी, व्याकूळ

**संपत्त** – पोहोचले

**सण्णिओ** – संकेत, इशारा केला

**संलत्तो** – चर्चा केली, विचारले

**सन्निविट्ठे** – जवळ ठेवलेले, जवळ असलेले

**सन्निहिए** – सान्निध्यात, जवळ असणे

**सद्दाविओ** – बोलावले

## कृती

**1. कोण ते लिहा.**

1) वेन्नातट नगरीत शिलाई व्यवसाय करणारा. [ ]

2) वेन्नातट नगरीतील लोकांना लुटणारा. [ ]

3) चोरीच्या कामात मदत करणारी. [ ]

4) चोरास पकडण्यासाठी स्वतः प्रयत्न करणारा. [ ]

5) मूलदेव राजास जीवदान देणारी. [ ]

6) चोराच्या बहिणीशी विवाह करणारा. [ ]

**2. योग्य पर्यायाची निवड करा.**

1) मंडिओ निच्चं परदव्वं -------।
(हरह, हरामि, हरेइ)

2) मंडिय-चोरेण ------- घरे खत्तं कयं।
(सेट्ठी, सेट्ठीस्स, सेट्ठिहिं)

3) एयस्स ------- पाय-सोयं देहि।
(पाहुणयस्स, पाहुणो, पाहुणाउ)

4) इयाओ सिग्घं नस्सह त्ति -------
मरिज्जिहिसि ति। (सा, मा, सो)

5) तव भगिणिं मम ------- त्ति।
(देइ, देमि, देहि)

**3. खालील शब्द अर्धमागधी-प्राकृत भाषेत लिहा.**

1) नागरिक ⟶ ▭

2) शिंपी ⟶ ▭

3) विहीर ⟶ ▭

4) गुडघा ⟶ ▭

5) प्रतिमा ⟶ ▭

6) बहिण ⟶ ▭

**4. अर्धमागधी-प्राकृत भाषेतील समानार्थी शब्द लिहा.**

1) कन्ना ⟶ ▭

2) कूव ⟶ ▭

3) दव्व ⟶ ▭

4) मग्ग ⟶ ▭

5) गिह ⟶ ▭

**5. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

1) मूलदेव राजा स्वतः चोरास पकडण्यासाठी का गेला?

2) मंडिक चोर कोणता व्यवसाय करीत होता?

3) चोर भगिनीने मूलदेवास पळून जाण्याचा इशारा का केला?

4) मूलदेवाने चोर भगिनीशी विवाह का केला?

5) मूलदेवाने मंडिक चोराजवळील संपत्ती कशी काढून घेतली?

**6. उपक्रम :**

वाईट कर्म करणाऱ्यास सन्मार्गावर आणलेली एक-दोन उदाहरणे तुमच्या शब्दांत लिहा.

# ५. सउन्दलाए णिव्वुदीं

'सउन्दलाए णिव्वुदीं' हा पाठ कवी कालिदासाने लिहिलेल्या 'अभिज्ञान शाकुंतल' या प्राचीन भारतीय नाटकातील चौथ्या अंकातून घेतलेला आहे. कवी कालिदास हे प्राचीन भारतीय साहित्यातील एक श्रेष्ठ कवी आणि नाटककार होत. त्यांनी 'रघुवंश', 'मेघदूत', 'कुमारसंभव', 'ऋतुसंहार' हे श्रेष्ठ काव्यसंग्रह लिहिले. त्याप्रमाणे 'मालविकाग्निमित्र', 'विक्रमोर्वशीय' आणि 'अभिज्ञान शाकुंतल' अशी तीन श्रेष्ठ नाटकेही लिहिली.

तारुण्यावस्थेतील दुष्यंत राजा आणि ऋषिकन्या शकुंतला हे परस्परांच्यावर आकर्षित होऊन वडिलांच्या अपरोक्ष गांधर्व पद्धतीने विवाह करतात. (गांधर्व विवाह म्हणजे प्रेमविवाह) त्यातून शकुंतलेस गर्भावस्था प्राप्त होते; परंतु प्रवासाहून परत आलेल्या कण्वऋषिंना (वडिलांना) ही घटना सांगण्याचे धाडस शकुंतलेस किंवा तिच्या मैत्रिणींनाही होत नाही; परंतु दैवीवाणीच्या प्रभावाने ही घटना कण्वऋषिंना समजते. कण्वऋषि ही घटना ऐकून अत्यंत दुःखी होतात; परंतु मुलीच्या सुखासाठी, आनंदासाठी कण्वऋषि (वडील) आपले दुःख आपल्या हृदयात ठेवून मुलीला सासरी पाठविण्याची तयारी करतात. एवढेच नव्हे तर सासरी गेल्यानंतर पतीशी, सवतीराण्यांशी, सेवकवर्गांशी, वडीलधाऱ्या व्यक्तींशी आदराने आचरण करण्याचा सल्ला देतात. याशिवाय शर्मिष्ठेच्या पुरू पुत्राप्रमाणे चक्रवर्ती पुत्रास जन्म देणारी माता हो. असा आशीर्वादही देतात.

तेव्हा शकुंतलेप्रमाणे वर्तमानकालीन तरुण-तरुणींनी केवळ कामविकार भोगण्याचाच विचार (उद्देश) करून प्रेमविवाह न करता आपल्याला लहानाचे मोठे करणाऱ्या, मुलामुलींच्या शिक्षणासाठी आपल्या इच्छा-आकांक्षा दूर ठेवणाऱ्या, सतत दुःख-कष्ट सहन करणाऱ्या आईवडिलांचा थोडातरी विचार करावा. आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तसेच जीवन जगण्याचे सामर्थ्य प्राप्त झाल्यानंतर तरुण-तरुणींनी वैवाहिक जीवनाचा विचार करावा; अन्यथा शकुंतलेप्रमाणे दुःख-कष्ट भोगण्याची वेळ येते हे या पाठातून स्पष्ट केलेले आहे.

**अनसूया –** पिअंवदे! जइ वि गंधव्वेण विहिणा णिव्वुत्त-कल्लाणा सउन्दला अणुरूव-भत्तु-गामिणी संवुत्तेति णिव्वुदं मे हिअअं तह वि एत्तिअं चिन्तणिज्जं।

**पियंवदा –** कहं विअ।

**अनसूया –** अज्ज सो राएसी इट्ठिं परिसमाविअ इसीहिं विसज्जिओ। अत्तणो णअरं पविसिअ अन्तेउरं समागदो इदोगदं वुत्तंतं सुमरदि वा ण वेत्ति।

**पियंवदा –** वीसद्धं होहि। ण तादिसा आकिदि-विसेसा गुण-विरोहिणो होन्ति। तादो दाणिं इमं वुत्तंतं सुणिअ ण जाणे वि पडिवज्जिस्सदि त्ति।

**अनसूया –** जह अहं पेक्खामि तह तस्स अणुमदं भवे।

**पियंवदा –** कहं विअ।

**अनसूया –** गुणवदे कण्णआ पडिवाद-णिज्जे त्ति अअं दाव पढमो संकप्पो। तं जई देव्वं एव्व संपादेदि णं अप्पआसेण किदत्थो गुरूअणो।

**पियंवदा –** जइ वि णाम विसअ-परम्मुहस्स वि जणस्स एदं ण विदिअं; तह वि तेण रण्णा सउंदलाए अणज्जं आअरिदं।

**अनसूया –** णं सहिगामी दोसो त्ति ववसिदा वि ण पारेमि पवास-पडिणिउत्तस्स ताद कण्णस्स दुस्सन्त-परिणीदं आवणसत्तं

सउंदलं, णिवेदिदुं। इत्थंगए अम्हेहिं किं करणिज्ज।

**पियंवदा** – सही! तुवर, तुवर सउंदलाए पत्थाण-कोदुअं णिव्वत्तिदुं।

**अनसूया** – सहि! कहं एदं।

**पियंवदा** – तदो जाव एणं लज्जावणद-मुहि परिस्संजिअ ताद-कण्णेण एव्वं अहिणंदिदं-दिट्ठिआ भणइ, 'वच्छे, सुसिस्स परिदिण्णा विज्जा विअ असोअ-णिज्जा संवुत्ता। अज्ज एव्व इसि-रक्खिदं तुमं भत्तुणो सआसं विसज्जेमि त्ति।

**अनसूया** – अह केण सुइदो ताद-कण्णस्स वुत्तन्तो।

**पियंवदा** – अग्गि-सरणं पविट्ठस्स सरीरं विणा छंदोमईए वाणिआए।

**अनसूया** – (प्रियंवदामाश्लिष्य) सहि! पिअं मे किंदु अज्ज एव्व सउंदला णीअदि त्ति उक्कंठा-साधारणं परितोसं अणुहोमि।

**तापसी** – (शकुंतला प्रति) जादे! भत्तुणो बहुमाण-सूअअं महादेवी-सद्द कहेहि।

**द्वितीय तपसिनी** – वच्छे! वीर-प्पसविणी होहि।

**तृतीय तपसिनी** – वच्छे! भत्तुणो बहुमदा होहि।


**कण्व** – (ततः प्रविशति स्नानोत्तीर्णः कण्वः।)

**यास्यत्यद्य शकुंतलेति हृदयं सस्पृष्टं उत्कंठया।**
**कंठः स्तम्भित-बाष्पवृत्ति-कलुषक्षिन्ताजडं दर्शनम्।**
**वैक्तव्यं मम तावदी-दृशमिदं स्नेहादरण्यौकसः।**
**पीडयन्ते गृहिणः कथं नु तनयाविश्लेषण-दुःखैर्नवैः।।1।।**

**गोतमी** – जादे! एसो दे आणंद-परिवाहिणा चक्खुणा परिस्सजन्तो, विअ गुरू अवट्ठिदो। आआरं दाव पडिवज्जस्स।

**कण्व** – वत्से!

**ययातेरिव शर्मिष्ठा भर्तुर्बहुमता भव।**
**सुतं त्वमापि सम्राजं सेव पुरूमवाप्नुहि।।2।।**



**गोतमी** – भगवं, वरो क्खु एसो ण आसीसा।

**कण्व** – शार्ङ्गरव! इति त्वया मद्वचनात्स राजा शकुंतला पुरस्कृत्य वक्तव्यः।

**शार्ङ्गरव** – आज्ञापयतु भवान्।

**कण्व** –

**अस्मान्साधु विचित्य संयम-धनानुच्चैः कुलं चाप्मन्।**
**स्त्वय्यास्याः कथमप्य-बांधव-कृता स्नेह-प्रवृत्तिं च ताम्।**
**सामान्य-प्रतिपति-पूर्वकमियं दारेषु दृश्या त्वया।**
**भाग्यत्यत्तमतः परं न खलु तद्वाच्यं वधू-बंधुभिः।।3।।**

वत्से! त्वम् इंदानीं अनुशासनीयाऽसि। वनौकसो अपि सन्तो लौकिकज्ञा वयम।

**शार्ङ्गरव** – न खलु धीमता कश्चिद-विषयो नाम।

**कण्व** – सा त्वमितः पतिकुलं प्राप्य।

**शुश्रूषस्व गुरून्कुरू प्रियसखी-वृत्तीं सपत्नी जने;**
**पत्युर्विप्रकृताऽपि रोषण तया मा स्म प्रतीपं गमः।**
**भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी**
**यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामा कूलस्याहायंः।।4।।**

कथं वा गौतमी मन्यते।

**गोतमी** – एतिओ बहुजणस्स उवदेसो। जादे! एदं क्खु सव्वं ओधारेहि।
(शकुंतला पितुः पादयोः पतति)

**कण्व** – गच्छ! शिवास्ते पंथानः सन्तु।

**विहिणा** – विधीने, पद्धतीने
**णिव्वुत्त–कल्लाणा** – निरोप देणे, शुभाशिर्वाद देणे
**भत्तु** – भर्तार, पती
**णिव्वुदं** – आनंदित
**हिअअ** – हृदयास, मनास
**एत्तिअं** – एवढी, एक
**वीसद्ध** – विश्वस्थ, निश्चित राहणे
**दाणिं** – आता
**ताद, तादो** – तात
**तदो** – तेव्हा
**इमं** – हा
**जाणे** – समजणे
**पडिवज्जिस्सदि** – प्रतिक्रिया व्यक्त करणे, वागणे
**भवे** – होईल, देतील
**अअं** – हाच
**दाव** – पासून
**संपादेदि** – प्राप्त करतो, मिळवितो
**अप्पासेण** – अल्पशा प्रयत्नाने
**तं जई** – जर तर
**किदत्थो** – कृतार्थ, आनंदित होणे
**णाम** – नाही, नसणे (सूचक अव्यय)
**विदिअं** – सांगितले
**एदं** – एवढे, हे
**अणज्जं** – अयोग्य
**आअरिदं** – आचरित
**क्खु, नु, णं** – खरोखर
**परिमि** – शक्य होणे
**पडिणिउत्तस्स** – परत आलेल्या
**कहं विअ** – कोणती, कसली, ते कसे
**इसीहिं** – ऋषिंनी
**अत्तणो** – स्वतःच्या
**समागदो** – आलेल्या, गेलेल्या
**इदोगदं** – येथे घडलेल्या घटना
**सुमरदि** – स्मरणे, आठवणे
**परिणीदं** – विवाह केला
**णिवेदिदु** – सांगणे
**इत्थंगए** – येथे, याप्रसंगी
**पत्थाण** – प्रस्थान, प्रवासास
**णिव्वत्तिदुं** – निवृत्तीची, निरोपाची
**तुवर–तुवर** – लवकरात लवकर
**अहिणंदिद–दिट्ठिआ** – अभिनंदन करण्याच्या दृष्टीने
**सुसिस्स** – चांगल्या शिष्यास
**असोअणिज्जा** – शोकरहित, दुःखरहित
**संवुत्ता** – वाटणे, होणे
**भत्तुणो** – पती
**सआसं** – जवळ
**सुइदो** – सूचित केले
**अह** – आता, अशाप्रकारे
**अग्गि–सरण** – यज्ञ–शाळा
**सरीरं विणा** – शरीररहित (आकाश)
**छंदोमईए** – छंदाने युक्त
**वाणिआए** – वाणी, वार्ता, बोलणे
**आश्लिष्य** – आलिंगन देणे, मिठी मारणे
**णीअदि** – जाणे, पाठविणे, नेणे
**अणुहोमि** – अनुभव असणे
**प्पसविणी** – जन्म देणारी माता
**बहुमदा** – आवडणारी

**स्नानोत्तीर्णः** – स्नान करून
**आआरं** – आदर
**दाव** – आता
**पडिवज्जस्स** – आदर, स्वागत करणे
**आसिसा** – आशीर्वाद
**इति** – अशाप्रकारे
**त्वया** – तू
**मद्‌वचनात्स** – माझ्या बोलण्याप्रमाणे
**स्त्वय्यास्या** – स्वतःच
**वृत्ती** – प्रमाणे, स्वाभाविकपणे
**तद्‌वाच्यं** – ते बोलणे, ते सांगणे
**त्वम्** – तुला
**स्तम्भित** – रोखल्याने, दाटून येणे
**बाष्प** – अश्रू
**सस्पृष्टं** – स्पष्टपणे
**उत्कंठया** – उत्कंठित होणे, धडधडणे
**तावदी** – तपस्वीची
**इदृश** – अशाप्रकारची
**पीडयन्ते** – दुःख, त्रास होणे
**गृहिण** – गृहस्थ
**तनया** – कन्या, मुलगी
**जाते, जादे** – मुली
**चक्खूणा** – डोळ्यांतून
**परिलाहिणा** – वाहात, भरलेले असताना
**अवट्ठिदो** – येणे
**बहुमता** – आदर करणारा
**त्वमषि** – तुझाही, त्याप्रमाणे
**पुरूमवं** – पुरूप्रमाणे
**सम्राजं** – सम्राट, चक्रवर्ती
**पुरस्कृत्य** – मार्फत
**वक्तव्य** – वचन
**अस्मान्साधू** – आमच्यासारखे सामान्य
**आष्मन** – आपल्यासारखे
**इदार्नी** – आता, हे
**अनुशासनीया** – सांगतो
**सन्तो** – असणे, राहणे
**लौकिकज्ञा** – व्यवहार
**वयम्** – आम्ही
**कश्चिद्** – कोणता
**नाम** – आहे
**प्राप्य** – प्राप्त होणे, जाणे
**वृत्ती** – प्रमाणे
**ओधारेहि** – धारण, अवलंब करणे
**पत्युर्विप्रकृता** – विरुद्‌ध, निराधार होणे
**मन्यते** – योग्य, मान्य असणे

## कृती

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(i) अनसूया मैत्रिणीच्या मनात कोणती शंका आली होती?

(ii) सासरी जाणाऱ्या शकुंतलेस कोणी कसा निरोप दिला?

(iii) कण्वऋषिंनी दुष्यंत राजास शार्ंगरवामार्फत कोणता संदेश दिला?

(iv) कण्वऋषिंनी सासरी जाणाऱ्या शकुंतलेस कोणता हितोपदेश केला?

(v) पिता म्हणून कण्वऋषिंचे व्यक्तिचित्रण स्पष्ट करा.

**2. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(i) दुष्यंत आणि शकुंतलेच्या गांधर्व विवाहाची बातमी कण्वऋषिंना कोणी सांगितली?

(ii) कण्वऋषिंनी शकुंतलेविषयी कोणता संकल्प केला होता?

(iii) गुरूंना आनंद केव्हा वाटतो?

(iv) आश्रमाच्या रक्षणासाठी आलेल्या दुष्यंताने आश्रमात कोणता गैरव्यवहार केला?

### 3. रिकाम्या जागा भरा.

(i) दुष्यंत राजा ------- च्या रक्षणासाठी कण्व आश्रमात आलेला होता?

(ii) दुष्यंत राजा आणि शकुंतलेच्या विवाहाविषयी ------- च्या मनात शंका निर्माण झाली.

(iii) गुणी व्यक्तीस आपली कन्या द्यावी हा ------- चा संकल्प होता.

(iv) दुष्यंत राजा आणि शकुंतलेच्या विवाहाची बातमी कण्वऋषींना ------- येथे गेल्यानंतर ------- ने ऐकवली.

(v) ------- च्या पुत्राप्रमाणे तुझाही पुत्र चक्रवर्ती राजा होवो.

### 4. कोणी कोणास म्हटले ते लिहा.

(i) 'मुली, पतीच्या आदरास पात्र होणारी प्रमुख राणी हो.' [ ]

(ii) 'मुली, तू वीरपुत्राला जन्म देणारी माता हो.' [ ]

(iii) 'पुरूपुत्राप्रमाणे तुझ्याही पुत्रास चक्रवर्ती पद प्राप्त होवो.' [ ]

(iv) 'मुली, पतीच्या घरी गेल्यानंतर वडिलधाऱ्यांची सेवाशुश्रूषा कर.' [ ]

(v) 'आपल्या भाग्याचा गर्व करू नको.' [ ]

### 5. आकृती पूर्ण करा.

शकुंतलेच्या मैत्रिणी → [ ], [ ]

### 6. अर्धमागधी-प्राकृत भाषेतील शब्द लिहा.

(i) निरोप → [ ]

(ii) हृदय → [ ]

(iii) संकल्प → [ ]

(iv) राजा → [ ]

(v) दुष्यंत → [ ]

(vi) प्रस्थान → [ ]

### 7. उपक्रम :

'गांधर्व विवाह' योग्य की अयोग्य या विषयीचे आपले विचार स्पष्ट करा.

# ६. नम्मया-सुंदरीए चउरत्तणं

पुरुष असो की स्त्री प्रत्येकाला आपले चारित्र्य अत्यंत प्रिय असते. त्याच्या रक्षणासाठी प्रत्येक स्त्री-पुरुष हे सतत दक्ष असतात. एवढेच नव्हे तर आपल्या चारित्र्यरक्षणासाठी स्वतःचे प्राणही दिलेले आढळून येतात. मग एखाद्या लहान-मोठ्या संकटाचे, कष्टाचे त्यांना काहीच वाटत नाही. कारण कलंकित, अपमानित जीवन जगणे त्यांना कठीण होते, त्यामुळे त्यांना मरण सुखकर वाटते.

परंतु आज चारित्र्यापेक्षाही मान, सन्मान, संपत्ती, सत्ता इत्यादीला अधिक महत्त्व प्राप्त झाल्याने चारित्र्याकडे दुर्लक्ष होत आहे. अपमानित, कलंकित जीवन जगण्यातच श्रेष्ठत्व मानले जात आहे. त्यामुळे समाजात भ्रष्टाचार, लुटालुट इत्यादीसारख्या गैरमार्गाचा अवलंब करून विविध सुखसोयी उपभोगल्या जात आहेत. त्यामुळे नैतिक मर्यादांचा ऱ्हास होत आहे. म्हणून प्रत्येकाने चारित्र्ययुक्त सन्मानित जीवन जगण्याचा प्रयत्न करावा.

या पाठातील नर्मदासुंदरी ही विविधप्रकारची दुःखे व संकटे सहन करत आपले चारित्र्य रक्षण कसे करते ते या पाठात स्पष्ट केलेले आहे. राजाची राणी होण्याची संधी प्राप्त होऊनही आपल्या चातुर्याने व मोठ्या कष्टाने नर्मदासुंदरी आपल्या चारित्र्याचे रक्षण करते. तेव्हा प्रत्येकाने तिचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून चारित्र्य संपन्न जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे यातून स्पष्ट केलेले आहे.

सदर पाठ महेंद्रसूरींनी लिहिलेल्या 'नम्मया-सुंदरी-कहा' या प्राकृत कथा ग्रंथातून घेतलेला आहे.



अन्नया नम्मयासुंदरीए रुव-वण्णणं सुणिऊण राइणा पेसिओ दंडवासिओ। दंडवासिओ नम्मयाए गिहं आगओ। परियणेण कया तस्स पडिवत्ती। पुच्छिओ य किं आगमणं पओयणं? दंडवासिएण भणियं, 'रन्ना तुह दंसणुक्कंठियं ममं आइट्ठो हरिणीए ठाण-ट्ठवियं राणियं सिग्घं आणेहि' ता तुरियं कीरउ गमणेण पसाओ। तओ नम्मयाए भणियं, 'अहं

जं इच्छामि तं चेव तुमए मज्झ आइट्ठं'। मम पुण्णइं अत्थि तेण संभरिया इंदसेण राइणा।

करिणीए भणियं 'सुंदरं एयं, पज्जंतु मणोरहा'। नम्मयाए भणियं 'सलक्खणा ते जीहा'। एरिसं आसीवायं मम दिज्जाहि' त्ति भणंतीए दंडवासिओ उवणीया सिविया आरूढा चलिया नयराभिमुहं। अंतराले घडिजंतं वहमाणं दट्ठूण नम्मया भणियं दंडवासिअं, 'तन्हाइया अहं उत्तारेह मं जेण एत्थ सहत्थेण पाणियं पियामि'। तओ 'जं आणवेसि' त्ति भणंतेण उत्तारिया दंडवासिएण, पत्ता विमल-जल-भरिय-सारणिं।

तत्थ पाऊण पाणियं कुहिय-चेक्कण-जंबाल-भरिय-खड्डाए लद्धावसरा फेल्हुसण-मिसेण झड त्ति निवडिया खड्डाए। खड्डाए उवरिं आगच्छिऊण अट्टाहासाए पुव्वं भणिया, 'अहो! राइणा मं एयं आभरणं पेसियं ति भणंतीए सव्व सरीरं लिपियं कुहिय-चेक्कणं।

एत्थंतरे 'हा सामिणि! किं एयं?' त्ति भणमाणो समुह-आगच्छंतो दंडवासिओ। अहो! गहो त्ति कओ जणेण कोलाहलो। विगराली-कय-लोयणा निल्लालिय-जीहा सिवारवं कुणंति पहाविया जणसमुह-समुहं, 'अहो! रायभारियं गहिल्लं उल्लवह त्ति संचल्लह रायउलं जेण दंसेमि दुब्भासिय-फलं'।

एवं अलजालई पलवंतीए दंडवासिओ राय-सगासं साहिउं पयत्तो, 'देव, सच्चं एयं सावराई सयमेव देव-संगम-उसुया मम विन्नवियं सोऊण बहलं रोमंच-कंचुयं तुरियं कय-सिंगारं मम वयणेण समारूढा सिबियं ति।

तीए दट्ठूण लोगा चिंतन्ति, 'एसा पच्चक्खा लच्छी, एसा विय रंभा, एसा च्चिय तिलोत्तिमा, णही णही एसा मयण-घरणि' त्ति। मए वि चिंतिउं लग्गो 'एए देवाउ इत्थीए थोवं थोवं रूव-लायण्णं घेत्तूण महारायस्स कए एसा विहिणा निम्मविय त्ति। महाराय! ण जाणामि किं तीए चक्खु-दोसो! किल जलं पियंतीए उत्तेडियं किं पि? खड्डा-तीरेण गच्छंति धस त्ति निवडिया विगंधे जंबाल-मज्झे। तओ गह-गहिया इव आयरणं करेइ'।

तं सुणिऊण राइणा संभंतेण भणिओ, 'गच्छ, गच्छ सिग्घं ति। तिहुयण-भूयवाइयं आणेहि। अहं पि तीए समीवं गच्छामि। तओ दंडवासिएण समाहूओ चेव आगओ तिहुयणो भूयवाइओ। रन्ना भणिओ, 'निरूवेहि को एस गहो? केण-उवाएण नियत्तइ'। सुचिरं परिभाविऊण संलत्तं तिहुयणो 'महाराय-संगम-पाविऊण ताणं उप्पज्जइ। मंत-तंताणं एयस्स इच्छाभंगो न कायव्वो। एसा जं मग्गइ तं चेव दिज्जइ, न य चंकारिज्जइ त्ति तओ कालेण सयमेव उवसमइ त्ति'।

तओ नम्मया-सुंदरीए भागधेय-चोइएण भूयवाइएण भणिएण रन्ना उग्घोसावियं नयरे, 'जो एयाए राय-वल्लहाए गरूए अवराहे कए वि, को वि तीए मंगुलं भणिस्सइ करिस्सइ वा तं अहं महादंडेण दंडिस्सामि' त्ति। तम्मि वेलाए नम्मया-सुंदरी जणस्स पच्चय-हेउं गह-चेट्ठिय पयासेइ। चेक्खलं दट्ठूण पुणो पुणो सव्वंगं लिंपइ। सीसे कयावि छारं खिवइ। दिणम्मि नयरे भमइ रत्तिं देउले गंतु नियजीवं भणइ-



**'रे जीव! मा किलम्मसु एयाए लज्जणेज्ज-किरियाए।**
**जं च्चिय सहिंति दुक्खं ति तं च्चिय सुह-भायणं होन्ति।।**
**सीलरयणं महग्घं किच्छेण वि जइ तरिज्ज रक्खेउं।**
**ता होज्ज मज्झ तुट्ठी तिहुयण-रज्जोवलंभे व्व।।**

एवं पयारे नम्मया-सुंदरीए निय-सील रयणस्स रक्खणं कया। तं जाणिऊण सव्वे जणा वि निय-सील-रयणस्स रक्खणं करियव्वं।

**अलजालई** – खोटे, दोषारोपाचे
**अंतराले** – मार्गामध्ये
**अट्टहासाए** – अट्टाहासाने, आग्रहाने
**असज्झो** – असाध्य, बरे न होणारा
**अवराहे** – अपराध
**आइट्ठो** – आदेश, आज्ञा, हुकूम
**आणावेसि** – आज्ञेप्रमाणे, हुकुमाप्रमाणे
**इव** – प्रमाणे, सारखे, समान
**उवणीय** – उपस्थित होणे, आणलेले
**उवसमइ** – शांत होणे, व्यवस्थित होणे
**उल्लवह** – बोलणे, म्हणणे
**उसुया** – उत्सुक, आतुर, उत्कंठीत होणे
**उत्तेडिया** – उत्तेजित, उन्मत्त झाल्याने
**एरिसं** – अशाप्रकारे
**पओयणं** – प्रयोजन, कारण, हेतू, उद्देश
**मा** – नको, पुरेसे होणे
**मयण–घरिणी** – मदनाची गृहिणी, रती
**राया–भारियं** – राजाच्या पत्नीस, राणीस
**रोमंच, कंचुयं** – आनंदित, रोमांचित होणे
**वराई** – बिचारी
**विहिणा** – विधीने
**विगराली** – विक्राळ, मोठे करणे
**कओ** – केले
**करिणीए** – स्त्रीचे नाव, कार्य करणारी
**किलम्मसु** – किल्मिष, दुःख, कष्ट
**किला–विज्जंतो** – क्रीडा, क्रिया करत असताना
**कोलाहलो** – कोलाहल, गोंधळ
**कए** – करिता, साठी
**कुहिय–चेक्कण** – दुर्गंधीयुक्त चिखलाने
**पहाविया** – धावणे, पळत जाणे
**परिभाविऊण** – विचार करून
**पच्चय, पच्चक्ख** – प्रत्यक्ष, समक्ष
**पयासेइ** – प्रकट करते
**पयत्तो** – प्रवृत्त होते, प्रारंभ करते
**पलवंतीए** – बोलण्याचे, बडबडण्याचे
**पियंतीए** – पिल्याने
**पज्जंतु** – पूर्ण होणे
**फेल्हुसण–णिसेस** – पाय घसरल्याच्या निमित्ताने
**बहल** – पुष्कळ, अतिशय
**भायणं** – सहभागी
**भागधेय** – भाग्याने, नशिबाने
**भूयवाइ** – भूतवादी
**महग्घं** – महाग, मौल्यवान
**मंगुल** – वाईट, अशुभ
**किच्छेण** – कष्टाने
**खिवइ** – टाकतो, फेकतो
**घडिजंतं** – रहाट यंत्र
**गह–गहिया** – भूतबाधा होणे
**गह–चेट्ठिया** – ग्रहबाधा, बुद्धिभ्रष्ट
**गहिल्ल** – ग्रहबाधा, बुद्धिभ्रष्ट
**चेट्ठइ** – राहतो
**चेक्खल्ल** – चिखल
**चंकारिज्जइ** – इलाज, उपाय
**चक्खुदोसे** – चक्षू दोषाने, न दिसणे
**चोइएण** – चेतविणे, प्रभावाने
**छार** – राख, धूळ, माती
**जंबाल** – चिखल
**जीहा** – जीभ

**तण्हाइया** – तहानलेली

**तुरियं तुरियं** – ताबडतोब

**तुट्ठि** – आनंद, संतुष्ट होणे

**दुब्भासिय** – अशुभ, वाईट बोलण्याचे

**तिहुयणा** – त्रिभुवन, व्यक्तीचे नाव

**धणियं** – अधिक, पुनःपुन्हा

**निवडिया** – पडले

**निल्लालिया** – बाहेर काढली

**सगास** – जवळ

**साहिउं** – सांगण्यासाठी

**सलत्तं** – बोलणे

**सहिंत** – सहन करीत

**संचल्लह** – चालणे, जाणे

**सारणि** – जलप्रवाह, ओढा

**समाहुओ चेव** – येताच, बोलविताच

**संभारिया** – आठवण, स्मरण

**सलक्खणा** – शुभलक्षणी

**सिग्घं** – शीघ्र, ताबडतोब

**सिविया** – शिबिका, मेणा, डोली

**सिवारव** – मोठ्याने ओरडते

**वाहमाण** – चालू असलेले

## कृती

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(i) इंद्रसेन राजाने कोणास; कोणाकडून निरोप दिला?

(ii) नर्मदासुंदरीने शीलरक्षणासाठी कोणत्या उपायाचा अवलंब केला?

(iii) इंद्रसेन राजाने भूतवादी वैद्यास का बोलावले? वैद्याने काय सांगितले?

(iv) इंद्रसेन राजाने नर्मदासुंदरीच्या शीलरक्षणासाठी अप्रत्यक्ष कसे सहकार्य केले?

**2. कोणी कोणास म्हटले ते स्पष्ट करा.**

(i) 'हरिणीच्या पदावर जिची नेमणूक झाली तिला घेऊन या.' -----------

(ii) 'मी ज्याची इच्छा करत होते तिच तुम्ही आज्ञा देत आहात.' -----------

(iii) 'माझे पुण्य म्हणूनच इंद्रसेन राजास माझी आठवण झाली असावी.' ---------

(iv) 'मला तहान लागलेली आहे; मला खाली उतरवा.' -----------

(v) 'ताबडतोब जाऊन भूतवादी वैद्यास घेऊन या.' -----------

(vi) 'जे दुःख सहन करतात तेच सुखाचे भागीदार होतात.' -----------

**3. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(i) इंद्रसेन राजाने दंडाधिकाऱ्यास कोणती आज्ञा दिली?

(ii) नर्मदासुंदरीने स्वतःच्या अंगास चिखल लावून का घेतला?

(iii) इंद्रसेन राजाने त्रिभुवन भूतवादी वैद्यास का बोलावून घेतले?

(iv) इंद्रसेन राजाने आपल्या राज्यात कोणती घोषणा केली?

(v) नर्मदासुंदरी देवालयात जाऊन स्वतःस कोणता बोध देत होती?

(vi) 'नर्मदासुंदरीचे चातुर्य' हा पाठ कोणत्या ग्रंथातून घेतलेला आहे?

**4. जोड्या जुळवा.**

| (अ) | (ब) |
|---|---|
| 1) इंद्रसेन | (i) गणिका |
| 2) करणी | (ii) राजाचा सेवक |
| 3) नर्मदासुंदरी | (iii) नगराचा राजा |
| 4) दंडाधिकारी | (iv) चारित्र्यसंपन्न स्त्री |

**5. आकृती पूर्ण करा.**

पाठातील पात्रे → ☐ ☐ ☐ ☐

**6. समानार्थी शब्द लिहा.**

(i) गिहं →

(ii) जलं →

(iii) लोयणं →

(iv) सरीरं →

**7. उपक्रम :**


(i) चारित्र्यसंपन्न स्त्री म्हणून नर्मदासुंदरीचे व्यक्तिचित्रण लिहा.

(ii) इंद्रसेन राजाचे व्यक्तिचित्रण करा.

पज्ज-विभागो

# १. सुहासियाइं

शिक्षणाची जी प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत त्यापैकीच 'नैतिक मूल्यांचा विकास' हे एक उद्दिष्ट होय. गुलाबाचा अर्क इवल्याशा कुपीत बसावा, तसाच विविध अनुभवांचा, ज्ञानाचा अर्क अत्यंत मोजक्या व मार्मिक शब्दांत कवी सुभाषितात सूत्रबद्ध करतात, त्यांनाच सुभाषित म्हणतात. सुभाषिते ही सुगंधित फुलासारखी नित्यपणे सर्वांना आल्हाददायक असतात. तसेच व्यावहारिक शहाणपणाची शिकवणूकही देणारी असतात. सुभाषितांमध्ये कल्पनांचे, विचारांचे व शब्दांचे विशेष सौंदर्य असते, त्यामुळेच ती आकर्षक बनतात. कोणत्याही भाषेतील सुवचने ही विचारांची, आचारांची संपत्तीच असते. त्यामुळे मानवी जीवनात सुभाषितांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. म्हणून सुभाषितांना रत्नांचीही उपमा दिली जाते. प्राकृत साहित्यात अशी सुभाषिते विविध ग्रंथात दिसून येतात. शिवाय प्राकृत साहित्यात सुभाषितांचे काही ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये कवी हालरचित 'गाथासप्तशती' आणि जयवल्लभ रचित 'वज्जालग्गं' हे दोन ग्रंथ अत्यंत महत्त्वपूर्ण सुभाषितसंग्रह आहेत.



लोहाविट्ठो नरो वित्तं पासइ नेव आवयं।
दुद्धं पासइ मज्जारो दंडाघायं न देक्खइ।।1।।

पोत्थगत्था उ जा विज्जा, पर-हत्थ-गयं धणं।
कज्ज-काले ण समुपन्ने, न सा विज्जा न तं धणं।।2।।

गंगा पावं, ससी तावं, दालिद्दं कप्प-पायवो।
पावं, तावं च दालिद्दं नासेंति सुयणा सया।।3।।

विएसेसु धणं विज्जा, वसणेसु धणं मई।
पर-लोए धणं धम्मो, सीलं हु सव्वया धणं।।4।।

पओसे दीवगो चंदो, पच्चूसे दीवगो रवी।
तेल्लोक्के दीवगो धम्मो, सु-पुत्तो कुल-दीवगो।।5।।

सव्व-नासे समुप्पन्ने, अद्धं चयइ पंडिओ।
अद्धेण कीरए कज्जं सव्व-नासो हि दूसहो।।6।।

माया सत्तू, पिया वेरी, जेण बालो न पाढिओ।
न सोहइ सहा-मज्झे, हंस-मज्झे बगो जहा।।7।।

दुस्सीलो य सढो मित्तो, भिच्चो आणा-परम्मुहो।
स-सप्पे य गिहे वासो, मच्चू एव्व न संसओ।।8।।

सहावो नोवएसेण, तीरए काउमन्नहा।
सुतत्तं पि जलं पेच्छ, पुणो हवइ सीयलं।।9।।

सो अत्थो जो हत्थे, तं मित्तं जं निरंतरं वसणे।
तं रुवं जत्थ गुणा, तं विन्नाणं जहिं धम्मो।।10।।

जं कल्ले कायव्वं, तं अज्ज चिय करेह तुरमाणा।
बहु वग्घो हि मुहुत्तो, मा अवरण्हं पडिक्खेह।।11।।

अणुचिंतिय वियागरे, मोहरिए सच्चवयणस्स पलिमंथू।
मुसाभासा निरत्थिया, अपुट्ठिओ न भासेज्जा।।12।।

## शब्दार्थ

**लोहाविट्ठ** – लोभाधीन
**आवयं** – संकट
**पोत्थगत्था** – पुस्तकात असलेली
**परहत्थगय** – दुसऱ्याच्या हातातील
**समुप्पन्नं** – उपस्थित झाल्यावर
**कप्पपायव** – कल्पवृक्ष
**पओस** – सायंकाळ
**पच्चूस** – सकाळ
**पाढिओ** – शिकवले
**सढ** – धूर्त
**आणापरम्मुह** – आज्ञा न पाळणारा
**संसअ** – संशय
**सब्भाव** – सद्भावना
**अवरण्ह** – दुपार
**पडिक्ख** – प्रतीक्षा
**जाय** – झाले

**भाए** – वाट्यास

**मुसाभासा** – खोटारडी भाषा

**मोहरिए** – वाचाळता

**पलिमंथू** – घात करणारी

## कृती

**1. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(i) सुपुत्त × ______

(ii) वेरी × ______

(iii) पच्चूस × ______

(iv) धम्म × ______

(v) सुयण × ______

(vi) दुक्ख × ______

(vii) धवल × ______

(viii) पाव × ______

**2. आकृती पूर्ण करा.**


(i) गंगा → पाप नाहीसे करते

(ii) चंद्र → ______


(iii) कल्पवृक्ष → ______

(iv) सज्जन → ______

**3. आकृती पूर्ण करा.**




**4. आकृती पूर्ण करा.**




**5. खालील शब्दांना अर्धमागधी प्रतिशब्द लिहा.**

(i) पुत्त → ______

(ii) धण → ______

(iii) माया → ______

(iv) जल → ______

(v) मुह → ______

(vi) पिया → ______

(vii) गिह → ______

(viii) पायव → ______

**6. रिकाम्या जागा भरा.**

(i) लोभाधीन मनुष्य ------- पाहतो.

(ii) गंगा, चंद्र व कल्पवृक्ष यांच्यापेक्षा ----- श्रेष्ठ आहे.

(iii) विद्या, बुद्धी व धर्म यांपेक्षा ------- चा महिमा श्रेष्ठ आहे.

(iv) ------- भाषा निरर्थक असते.

(v) जे आपल्या पुत्राला शिक्षण देत नाहीत असे मातापिता त्या मुलांचे ------- असतात.

**7. उपक्रम :**

(i) तुम्हांला आवडणाऱ्या प्राकृत सुभाषितांचा संग्रह करा.


(ii) तुम्हांला आवडणाऱ्या सुवचनांचा संग्रह करा.

# २. कम्म-फलं

प्रस्तुत पद्यपाठ रत्नशेखरसूरींनी लिहिलेल्या 'सिरीसिरीवाल कहा' या प्राकृत काव्य ग्रंथातून घेतलेला असून पूर्व जन्मातील कर्मानुसारच जीव चांगले-वाईट फळ कसे भोगतो ते, या कवितेत स्पष्ट केलेले आहे.

विवाहामुळे कौटुंबिक जीवनामध्ये स्थैर्य प्राप्त होत असल्यामुळे भारतीय संस्कृतीमध्ये विवाहास अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान असलेले दिसून येते. त्यामुळे आईवडील किंवा इतर नातेवाईक आपल्या मुलामुलींचे विवाह करून देतात. त्यातील काहींचे वैवाहिक जीवन पूर्णता सुखी होते तर काहींचे जीवन पूर्णता दुःखाने भरलेले असते.

ज्यांचे जीवन दुःखमय आणि संकटमय होते ते तरुण-तरुणी विवाह ठरविणाऱ्यांना किंवा आपल्या आईवडिलांना किंवा नातेवाईकांना दोष देत असतात; परंतु अशाप्रकारे इतरांना दोष देणे अज्ञानपणाचे आणि व्यर्थ असते. कारण हा परिणाम म्हणजे पूर्वी केलेल्या (म्हणजे पूर्वजन्मातील असो की या जन्मातील) कर्माचे फळ म्हणून ते या जन्मात दुःख कष्ट भोगत असतात. तेव्हा आईवडिलांना किंवा इतरांना दोष न देता शांतपणे आणि धैर्याने केलेल्या कर्माचे फळ भोगले पाहिजे, तरच त्यांना सुखाची प्राप्ती होऊ शकते. हे या कवितेतून मदनसुंदरी राजकन्येच्या उदाहरणातून स्पष्ट केलेले आहे.



अह मयणसुंदरी वि हु रन्ना नेहेण पुच्छिया, 'वच्छे।
केरिसओ तुज्झ वरो कीरउ'? मह कहसु अविलंबं।।1।।

सा पुण जिण-वयण-वियार-सार-संजणिय-निम्मल-विवेआ।
लज्जागुणिक्क-सज्जा अहो-मुही जा न जंपेइ।।2।।

ताव नरिंदेण पुणो पुट्ठा सा भणइ ईसि हसिऊणं।
'ताय' विवेय-समेयं मं पुच्छसि तं सि किमजुत्तं।।3।।

जेण कुल-बालिआओ न कहंति हवेउ एस मज्झ वरो।
जो किर पिऊहिं दिन्नो सो चेव पमाणिय-व्वुत्ति।।4।।

अम्मा-पिउणो वि निमित्त-मेत्तं होइ वर-पयाणम्मि।
पायं पुव्व-निबद्धो, संबंधो होइ जीवाणं।।5।।

जं जेण जया जारिसमुवज्जियं होइ कम्मं सुहमसुहं।
तं तारिसं तया से, संपज्जइ दोरिय-निबद्धं।।6।।

जा कन्ना बहु-पुण्णा, दिन्ना कु-कुले वि सा हवइ सुहिया।
जा होइ हीण-पुण्णा, सु-कुले दिन्ना वि सा दुहिया।।7।।

ता ताय! नाय-तत्तस्स तुज्झ नो जुज्जए, इमो गव्वो।
जं मज्झ कय-पसायापसायओ सुह-दुहे लोए।।8।।

तो दुम्मिओ य राया भणेइ 'रे तं सि मह पसाएण।
वत्थालंकाराइ पहिरंती कीसिमं भणसि?'।।9।।

हासिऊण भणइ मयणा, 'कय-सुकय-वसेण तुज्झ गेहम्मि।
उप्पन्ना ताय! अहं तेणाणुहवामि सुक्खाइं'।।10।।

पुव्व-कयं सु-कयं चिय जीवाणं सुक्ख-कारणं होई।
दुकयं च कयं दुक्खाणं कारणं होइ निब्भंतं।।11।।

## शब्दार्थ

**मयणसुंदरी** - मदनसुंदरी
**वच्छे (वत्से)** - मुली
**कहसु** - आज्ञा, सांग
**वियारसार** - श्रेष्ठ विचार, तात्पर्य
**रन्ना** - राजा
**नेह** - वात्सल्य
**केरिस** - कसा
**दुम्मिय** - दुखावलेला
**लज्जगुणिक्कसज्जा** - लज्जा-संकोच गुणाने युक्त
**ईसि** - किंचित
**विवेयसमेयं** - विवेकी
**किर** - खरोखर
**संजणिय** - उत्पन्न झालेला
**निम्मलविवेय** - शुद्ध, सारासार विचार
**अहोमुही** - नतमस्तक
**जंप** - बोलणे
**जेण** - ज्यायोगे
**हवेउ** - असावा
**पिऊहिं** - वडिलांनी
**वरपयाण** - (वरप्रदान) वर शोधून देणे
**पायं** - बहुतांशी
**संपज्जइ** - प्राप्त करतो
**बहुपुण्णा** - पुण्यवान

**नायतत्त** – तत्त्वज्ञान जाणणारा
**उवज्जिय** – संपादित, संचित
**दोरिय–निबद्धं** – दोऱ्याने बांधलेले
**नो जुज्जए** – योग्य नाही
**पहिरंती** – परिधान करणारी
**निब्भंतं** – निश्चितपणे
**उप्पन्ना** – जन्मास आले
**कय–पसायापसायओ** – कृपा किंवा अवकृपा करण्यामुळे

## कृती

**1. समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | नरिंद | अ) | कन्ना |
| (ii) | वर | आ) | पई |
| (iii) | सुद्‌ध | इ) | किंचि |
| (iv) | बालिया | ई) | राया |
| (v) | ईसि | उ) | निम्मल |

**2. खालील शब्दांचे अर्धमागधी शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (i) | राजा | |
| (ii) | मदनसुंदरी | |
| (iii) | वडील | |
| (iv) | मुलगी | |
| (v) | जिनवचन | |
| (vi) | वात्सल्य | |

**3. गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (i) | रन्ना | नरेंद्र | पन्ना | |
| (ii) | अम्मा | दिया | माया | |
| (iii) | बालिया | कन्ना | सुय | |
| (iv) | माय | ताय | पिऊ | |
| (v) | मुह | लोयण | वयण | |

**4. खाली दिलेल्या गाथेचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

अम्मा–पिऊणो वि निमित्त–मेत्तं होइ वर–पयाणम्मि।
पायं पुव्व–निबद्‌धो, संबंधो होइ जीवाणं।।

**5. चौकटी पूर्ण करा.**

(i) लज्जेने अधोमुखी होणारी → ☐
(ii) मदनसुंदरीवर क्रोधिष्ट झालेला → ☐
(iii) कर्मसिद्‌धांतावर श्रद्‌धा ठेवणारी → ☐

**6. मदनसुंदरीच्या कथेच्या आधारे कर्मसिद्‌धांत स्पष्ट करा.**

# ३. खंडपाणाए चउरत्तणं

प्राचीन काळापासून भारतीय स्त्रिया ह्या सर्व क्षेत्रात श्रेष्ठ असल्याचे विविध ग्रंथातून वर्णिलेले दिसून येते. कौटुंबिक जबाबदारी सांभाळण्यापासून ते मृत्यूसारख्या संकटावरही मात करणाऱ्या सावित्रीसारख्या अनेक स्त्रिया या भारतभूमीत होऊन गेल्या. त्यांच्या या अफाट शक्तीस पाहून कोणी त्यांना शक्तीदेवता मानले तर कोणी त्यांचे आर्थिक नियोजन पाहून त्यांना धनलक्ष्मी म्हटले. त्यांचे बुद्धीचातुर्य आणि कलागुणातील श्रेष्ठत्व पाहून कोणी त्यांना विद्येची देवता सरस्वती म्हणून सन्मानित केले.

आधुनिक काळात तर स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात यशस्वीपणे आपली जबाबदारी सांभाळत असलेल्या दिसून येतात.

स्त्रियांचे हे श्रेष्ठत्व जाणून आ. हरिभद्रसूरींनीही आपल्या 'धूर्ताख्यान' या प्राकृत काव्य ग्रंथात खंडपाणा या धूर्त स्त्रीच्या बुद्धीचातुर्याचे, अभ्यासूवृत्तीचे, धैर्याचे तसेच दातृत्वाचे वर्णन केलेले आहे. एवढेच नव्हे तर हजारो धूर्तांचे प्रमुख होण्याचा मान ती कसा मिळविते तेही या 'धूर्ताख्यान' ग्रंथात स्पष्ट केले आहे.

आ. हरिभद्रसूरी हे प्राकृत साहित्यातील एक श्रेष्ठ ग्रंथकार होते. त्यांनी आपल्या विनोदी व व्यंगात्मक शैलीने धार्मिक ग्रंथातील अविश्वसनीय घटनावर टीका करून ग्रंथातील घटनांना वास्तविक स्वरूप देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. या ग्रंथातील मूलदेव, कंडरीक, एलाषाढ, शश आणि खंडपाना या पाच धूर्तांच्यापैकी खंडपाना ही एक धूर्त स्त्री व्यक्तिमत्त्व होय. ती आपल्या बुद्धीचातुर्याने सहकार्यांना भोजन कसे मिळवून देते, ते या कवितेतून स्पष्ट केलेले आहे.

सा (खंडपाणा) भणइ हसंता 'पुव्विं विण्णाविया मया तुब्भे।
भो, गव्वमुव्वहंता ओहसह सव्वे मं अबुद्धिया' ।।1।।


'उप्पत्तिय-बुद्धीए अम्हे अभिसंधिया तुमे सुयणु।
तो सव्वे वि भणामो अम्हं भत्तं पयच्छाहि' ।।2।।

'बाढं' त्ति भणिऊणं पेयवणं सा गया सुबीहणयं।
अचिर-विमुक्कं बालं खंडा तं गिण्हिऊण ण्हावइ ।।3।।

अब्भंगेऊण तयं जर-चीवर-सुसंगयं करेऊणं।
उज्जेणीइ पविट्ठा सिट्ठिस्स घरं धण-समिद्धं ।।4।।

दिट्ठो अणाइ सिट्ठी आसणोवविट्ठो जणेहि परिकिण्णो।
भणिओ अणाए 'भाओ, सुत्तिय-धूया मि दुग्गइया ।।5।।

कइवय-दिवस-पसूया अबंधवा असरणा विदेसत्था।
तुब्भे महप्पभावा पिइहर-मुल्लं ममं देह'।।6।।



सिट्ठी वाउल-चित्तो पुणो पुणो तीइ उच्चरंतीए।
रूसिओ भणइ पुरिसे 'सिग्घं नीणेह दमिय' त्ति ।।7।।



'निग्गच्छसु' त्ति भणिया अह जंपइ 'मा छिवसु बालस्स।
अन्नं ठाणं बप्पिकयं तो मे मा पिल्लेह' ।।8।।


निग्गच्छिउं नेच्छइ तेहिं च पुरिसेहि पिल्लिया सहसा।
धरणीयले निवडिया भणइ- 'मह मारिओ पुत्तो' ।।9।।

हा मज्झ अणाहाए नाहो होहि त्ति चिंतत्तीए।
सो वि मणोहर-तंतू छिन्नो निच्छित्त-गत्तेहि ।।10।।

'भो पिच्छह, जण-समुदय इमेण धण-गव्विएण वणिएण।
अट्ठारस-दोस-विवज्जियाइ मह मारिओ पुत्तो' ।।11।।

अह पहरिउमारद्धा सीसे य उरे य असाहारं।
भणइ सिट्ठिं 'मज्झं भग्गं भिक्खा-कवालु' त्ति ।।12।।

तो सिट्ठि आदण्णो सव्व-पयत्तेण परियण-समग्गो।
अणुणेइ विलवमाणि करेह मा सुयणु बोलं त्ति ।।13।।



दिन्ना य कण्णिया सा भणिया 'घित्तूण वच्चसु पुत्तं।
मा रुयसु, मा य कंदसु तुह एत्तियं जीवणं दिन्नं'।।14।।

घित्तूण कण्णियं मयं कलेवरं च सा तओ अइक्कंता।
सिट्ठिस्स निराबाहं जायं दाण-प्पभावेणं ।।15।।

सिसु-मडयं छड्डित्ता खंडा विउलत्थलाह-परिसुद्धा।
मणि-कणय-रयण-मुत्तिय-चमर-समिद्धं गया हट्टं ।।16।।

काऊण य विणिओगं तेसिं धुत्ताणं सीय-विहुराणं।
बहु-खज्ज-पिज्ज-कलियं सुसक्कयं भोयणं देइ ।।17।।

भुत्तयंतेहि तओ सव्वेहिं पि हट्ठ-तुट्ठ-मणसेहि।
भणिया य खंडपाणा सुजीवियं जीवियं तुज्झ ।।18।।

जं ते बुद्धि-बलाओ धुत्त-जणो निज्जिणित्तु सयराहं।
संतोसिओ खु हत्थो विउलेणं भत्त-पाणेणं ।।19।।

## शब्दार्थ

**अबुद्धिय (अबुद्धिक)** – निर्बुद्ध, मूर्ख

**अभिसंध** – फसविणे, पराभव करणे

**पयच्छ** – देणे

**बाढं** – ठीक आहे, अशी स्वीकारसूचक उक्ती

**पेयवण** – स्मशान

**सुबीहण** – अतिशय भयानक

**जर** – जीर्ण, जुने

**चीवर** – वस्त्र

**परिकिण्ण** – वेष्टित

**दुग्गय** – दरिद्री, विपत्तिग्रस्त

**बप्पिकयं** – आधार, आश्रय घेईन

**पिइहर** – पित्याचे घर, माहेर

**पिल्ल (पीडय्)** – पिडणे, त्रास देणे

**भिक्खाकवाल** – भिक्षापात्र

**आदण्ण (दे)** – व्याकूळ

**बोल (दे)** – कलकल, कोलाहल, बोलणे

**कण्णिया (कर्णिका)** – मुद्रिका, अंगठी

**कंद (क्रन्द्)** – आक्रोश करणे

**सयराह** – शीघ्र, एकाच वेळी

**सुत्तिय** – ब्राम्हण

**हट्ट** – बाजारपेठ

**निज्जिणित्तु** – जिंकले

## कृती

**1. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(i) खंडपानाने व्यापाऱ्याला कसे फसविले ते तुमच्या शब्दांत लिहा.

(ii) खंडपानाने धूर्त मित्रांना भोजन कसे दिले ते स्पष्ट करा.

**2. असे कोण म्हणाले ?**

(i) अठरा दोषाने रहित अशा माझ्या मुलाला मारले.

(ii) ताबडतोब हिला बाहेर हाकला.

(iii) उपजत बुद्धीने आम्ही तुला शरण आलो आहे.

(iv) 'भिक्षापात्र हेच माझ्या भाग्यात आहे.'

(v) 'हे सुंदरी, कोलाहल करू नकोस.'

**3. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**


(i) 'भाओ सुत्तिय-धुया मि दुग्गइया।'

(ii) 'मा छिवसु बालस्स अन्नं ठाणं बप्पिकयं ता मे मा पिल्लेह।'

(iii) 'धण गव्विएण वाणिएण अट्ठारस-दोस विवज्जियाइ मह मारिओ पुत्तो।'

(iv) 'मज्झ भग्गं भिक्खा-कवालु त्ति।'

**4. आकृती पूर्ण करा.**

(i) 


(ii) ग्रंथ → खंडपाणाए चउरत्तणं → ग्रंथकार

**5. समानार्थी शब्द लिहा.**

(i) धूया ⟶ ☐
(ii) वणिय ⟶ ☐
(iii) धरणी ⟶ ☐
(iv) पुत्त ⟶ ☐

**6. वर्ण बदल स्पष्ट करा.**

(i) पुव्विं ⟶
(ii) पेयवण ⟶
(iii) उज्जेणी ⟶
(iv) पुत्त ⟶
(v) दुग्गय ⟶
(vi) कण्णिया ⟶

**7. रूपे ओळखा.**


(i) वच्चसु
(ii) भणइ
(iii) होमि
(iv) जंपइ
(v) देह

# ४. विणयस्स माहप्पं

विनय म्हणजे नम्रता, विनय म्हणजे आदरभाव, विनय म्हणजे आत्मविकास, विनय म्हणजे आज्ञाधारकता, विनय म्हणजे दुराचाराचा त्याग, विनय म्हणजे क्षमा, विनय म्हणजे चारित्र्यसंपन्नता. अशा विविध गुणांनी युक्त विनयी व्यक्तींचा सर्वत्र आदर केला जातो. विनयी व्यक्तीचे सर्वांशी मैत्रीचे संबंध असतात; परंतु अविनयी व्यक्तीच्या अविनयी आचार-विचारांमुळे शत्रुत्वच वाढत जाते. अविनयी व्यक्तीचा कोणीही आदर करत नाही. थोडक्यात अविनयी आचरण म्हणजे आत्मनाशाची पहिली पायरीच होय.

ज्ञान देणाऱ्या गुरूंशी विनयाने आचरण केल्याने विद्येची प्राप्ती होते; परंतु गुरूंच्याविषयी मनात गैरसमज करून घेतलेल्या व्यक्तीस विद्येची, ज्ञानाची प्राप्ती तर होत नाहीच, उलट त्या व्यक्तीवर अज्ञानाने संकटेच येतात. अविनयी व्यक्ती म्हणजे आयुष्याचा मार्ग चुकलेली व्यक्तीच होय, म्हणून सर्वांशी विनयी आचरण करणे लाभदायक असते.

जैन आगमग्रंथातील 'उत्तरज्झयणसुत्त' या ग्रंथातील 'विणइज्जं' अध्यायातून काही निवडक गाथा घेतलेल्या आहेत. विद्यार्थ्याने आपल्या गुरूंशी विनयाने आचरण केल्याने आणि अविनयाने आचरण केल्याने काय परिणाम होतो, ते या कवितेतून स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि गुरू यांच्यामधील नाते अधिक दृढ होण्यास मदत होईल असे वाटते.



आणा-निद्देसयरे गुरूण-उववाय-कारए।
इंगियागार-संपन्ने से विणयीए त्ति वुच्चई।।1।।

आणा-निद्देसयरे गुरूणं अणुववाय-कारए।
पडिणीए असंबुद्धे अविणयीए त्ति वुच्चई।।2।।

जहा सुणी पूइ-कण्णी निक्कसिज्जइ सव्वसो।
एवं दुस्सील-पडिणीए मुहरी निक्कसिज्जइ।।3।।

तम्हा विणयं एसिज्जा सीलं पडिलभेज्जए।
बुद्ध-पुत्त-नियागट्ठी न निक्कसिज्जइणं कण्हुई।।4।।

निसंते सियामहुरी बुद्धीण अंतिए सया।
अट्ठ-ज्जुत्ताणि सिक्खिज्जा निरट्ठाणि उ वज्जाए।।5।।

अणुसासिओ न कुप्पिज्जा, खंतिं सेविज्ज पंडिए।
खुड्डेहिं सह संसग्गिं हासं कीलं च वज्जए।।6।।

आहच्च चंडालियं कट्टु न निण्हविज्ज कयाइ वि।
कडं कडे त्ति भासेज्जा, अकडं नो कडि त्ति य।।7।।

अणासवा थूलवया कुसीला मिउं पि चंडं पकरिंति सीसा।
चित्ताणुया लहु दक्खोववेया पसायए ते हु दुरासयं पि।।8।।

ना पुट्ठो वागरे, किंचि पुट्ठो वा नालियं वए।
कोहं असच्चं कुव्वेज्जा, धारेज्जा पियमप्पियं।।9।।

पडणीयं च बुद्धाणं वाया अदुवा कम्मुणा।
आवी वा जइ वा रहस्से नेव कुज्जा कयाइ वि।।10।।

जम्मे बुद्धा-अणुसासंति सीएण फरूसेण वा।
मम लाभो त्ति पेहाए समओ तं पडिस्सुणे।।11।।

रमए पंडिए सीसं हयं भद्दं व वाहए।
बालं सम्मइ सासंतो गलियस्सं व वाहए।।12।।

पुत्तो मे भाया नाइ त्ति साहू कल्लाणं मन्नइ।
पाव-दिट्ठी उ अप्पाणं सीसं दासु त्ति मन्नई।।13।।

न कोवए आयरियं अप्पाणं पि न कोवए।
बुद्धोवघाई न सिया, न सिया तोत्त-गवेसए।।14।।

आयरियं कुवियं नच्चा पत्तिएण पसायए।
विज्झवेज्जा पंजलिउडो व एज्ज न पुणु त्ति य।।15।।

धम्मज्जियं ववहारं, बुद्धेहा-आयरियं सया।
तमायरंतो ववहारं गरहं नाभिगच्छई।।16।।

('उत्तरज्झयण सुत्त' अ-1, गाथा 1 ते 42)

**आणा–निद्देसयरे** – आज्ञेनुसार वागणाऱ्या
**उववाय** – संपर्क, सान्निध्यात
**इंगियागार** – हावभाव
**संपन्ने** – जाणण्यात कुशल
**से** – त्यास, त्याला
**अनिद्देसयरे** – न वागणारे
**पडिणीए** – प्रतिकूल
**असंबुद्धे** – तत्त्व न जाणणारा, अज्ञानी
**सुणी** – कुत्री
**पूइ–कण्णी** – कान सडलेली
**निक्कसिज्जइ** – हाकलणे, बाहेर काढणे
**कट्टु** – घडणे, करणे, होणे
**पडिलभेज्जए** – लाभ होणे, प्राप्ती होणे
**अणुसासिओ** – समज देणे
**कुप्पिज्जा** – रागवले
**खंति** – क्षमा
**खुड्डेहि** – क्षुद्र, सामान्य
**कडं कडे** – केले तर केले
**भासेज्जा** – सांगावे
**अणासवा** – आज्ञा मोडणारे
**थूल–वया** – अविचाराने बोलणारे
**चित्ताणुया** – चित्त, मनाप्रमाणे वागणारे
**दक्खोववेया** – दक्षतेने वागणारे
**पुट्ठो** – विचारले
**वागरे** – बोलणे
**नालियं** – खोटे न बोलणे
**पियमप्पियं** – प्रिय अप्रिय
**अदुवा** – अथवा
**कम्मुणा** – कर्माने, क्रियेने
**जम्मे** – जेव्हा, ज्यावेळी
**सीएण** – शीतल, कोमल
**फरूसेण** – कठोर
**पेहाए** – दक्षता, एकाग्रतेने
**त्ति** – असा, अशी, असे
**गलियस्स** – गळणारे, निकृष्ट, अडेल
**वुच्चई** – म्हणणे
**मुहरी** – बडबडणारा
**तम्हा** – म्हणून
**एसिज्जा** – इच्छा करणे
**बुद्ध** – आचार्यांना, गुरूंना
**नियागट्ठी** – मोक्षाची इच्छा
**कण्हुई** – कोठेही
**निसंते** – शांत असावे
**सिया** – सतत, नेहमी
**अट्ठज्जुत्ताणि** – अर्थपूर्ण
**निरट्ठाणि** – निरर्थक
**वज्जाए** – वर्ज्य करणे
**संसग्गि** – संपर्क करणे
**चंडालिय** – अपराध, दुरावा
**निण्हविज्ज** – लपविणे
**कयाइ वि** – केव्हाही, कधीही
**मिउं** – मृदू, कोमल, शांत
**चंड** – क्रोधिष्ठ
**सीसा** – शिष्य
**पसायए** – प्रसन्न करणे
**दुरासयं पि** – कठोर, तापट
**वाया, वए** – बोलणे, वाणी
**असच्चं** – असत्य, निष्फळ करणे

**कुव्वेज्जा** – करावे
**नेव** – नाही
**आवी** – उघडपणे
**रहस्से** – गुप्तपणे
**पडिस्सुणे** – ऐकावे
**हयं** – घोडा
**भद्द** – उत्तम, चांगले
**बालं** – मूर्ख, अज्ञानी
**सम्मइ** – थकणे
**सासंतो** – शिकविणे, शासनकाळ
**नाइ** – नातेवाईक
**कल्लाणं** – चांगला
**उवघाई** – विघातक
**तोत्त** – त्रस्त, दुःख, त्रास
**गवेसिए** – शोधणे
**बुद्धेहायरियं** – बुद्धीवानांनी आचरलेले
**तमायरंतो** – त्याचे आचरण करताना
**नच्चा** – जाणून
**मेहावी** – ज्ञानी
**जायाए** – होणे
**भूयाणं** – जीवांचा
**पत्तिएण** – प्रयत्नपूर्वक, आदराने
**एज्ज** – करणे
**विज्झवेज्जा** – शांतपणे
**पंजलि–उडो** – हात जोडून
**गरह** – निंदेला
**नाभि–गच्छई** – जात नाही, होत नाही
**सरणं** – आधारस्थान
**जगई** – पृथ्वी, जग

## कृती

**1. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(i) विनयी विद्यार्थी कोणास म्हटले जाते?

(ii) विनयी विद्यार्थ्यांची तुलना कोणाशी केली जाते?

(iii) कोणता विद्यार्थी गुरूंच्या आदरास पात्र होतो?

**2. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(i) 'न कोवए आयरियं अप्पाणं पि न कोवए।'

(ii) 'रमए पंडिए सीसं हयं भद्दं व वाहए।'

(iii) 'जहा सुणी पूइ–कण्णी निक्कसिज्जई सव्वसो।'

**3. कोण ते लिहा.**

(i) गुरूंच्या विषयी गैरसमज करून घेणारा

(ii) उत्तम जातीच्या घोड्यावरून प्रवास करणारा


(iii) आचार्यांना पुत्राप्रमाणे असणारा

**4. आकृती पूर्ण करा.**

(i) उत्तर–अध्ययन सूत्र ग्रंथाचे आगम ग्रंथातील स्थान →

(ii) विनयी विद्यार्थ्यांची लक्षणे

(iii) अविनयी विद्यार्थ्याची
लक्षणे



**5. खालील गाथा पूर्ण करा.**

(i) तम्हा विणयं एसिज्जा --------।

(ii) नच्चा नमइ मेहावी --------।

(iii) धम्मज्जियं ववहारं --------।

(iv) ना पुट्ठो वागरे, किंचि पुट्ठो वा --------।

(v) कडं कडे त्ति भासेज्जा, अकडं ------।

**6. खालील शब्दांना प्राकृतातील शब्द सांगा.**

(i) बडबडणारा –

(ii) क्षमा –

(iii) शिष्य –

(iv) घोडा –

**7. उपक्रम :**

वर्तमानकाळातील गुरू आणि शिष्य यांच्यातील संबंधाविषयी माहिती लिहा.

# ५. कलह-णिवारणं

'बळी तो कान पिळी' या म्हणीप्रमाणे प्राचीन काळापासून जगामध्ये सर्वत्र व्यवहार चालत असलेला दिसून येतो. ज्याची शक्ती जास्त तो आपल्या शक्तीच्या प्रभावाने सामान्यांच्यावर अत्याचार करत असतो. त्या बलाढ्य शक्तीस विरोध करणाऱ्यास एखाद्या वेळेस जीवासही मुकावे लागते किंवा भयग्रस्त अवस्थेत जीवन जगावे लागते. परंतु ज्यांच्याकडे संयम, बुद्धिमत्ता आणि बोलण्यातील चातुर्य असते त्या व्यक्ती विचारपूर्वक आचरण करून बलाढ्य शक्तीस आवडेल असे आचरण करून संकटापासून आपली सुटका करून घेतात.

जेव्हा दोन किंवा दोहोंहून अधिक बलाढ्य शक्ती असणाऱ्यांच्यामध्ये एखाद्या विषयावर वाद किंवा चर्चा चाललेली असेल तेव्हा सामान्याने त्या दोघांपैकी कोणत्याही एकाची बाजू न घेता शांतपणे तटस्थ आचरण केले पाहिजे. अन्यथा एकाच्या मनात आपल्याविषयी नाराजी निर्माण होऊन धोका निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून दोन्हीही बलाढ्य शक्ती संतुष्ट कशा होतील असेच सामान्यांचे आचरण असले पाहिजे. हे या कवितेत वाघ-सिंह आणि मांजर यांच्या उदाहरणातून स्पष्ट केले आहे. हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनीही कोणत्याही बलाढ्य शक्तीचे शत्रुत्व निर्माण होणार नाही असेच आचरण करून आपले जीवन संकटरहित, सुखी, समाधानी जगावे असे या कवितेतून स्पष्ट केले आहे.


ही कविता आ. हरिभद्रसूरींनी लिहिलेल्या 'मणिपतिचरियं' या प्राकृत कथा ग्रंथातून घेतलेली आहे. 'मणिपतिचरियं' या ग्रंथात एकूण सोळा कथा असून 'मूलदेव कथा' ही त्यापैकी एक कथा आहे. या कथेतून मूलदेवाचे बुद्धिचातुर्य, धैर्य इत्यादींचे श्रेष्ठत्व वर्णन केलेले दिसून येते.

एगम्मि अरणम्मि वग्घो सीहो दुवे संति।
तेसिं पुणो संलावो एवं वुत्तो महं पडइ सीयं।।
किं पोसे माहे वा? भणियं वग्घेण 'पोसम्मि' ।।1।।

सीहेण पुणो भणियं, 'अहियं सीयं पडइ माहम्मि'।
तेहिं पुणो वि भणियं, 'पुच्छामो बहुस्सुयं कं पि' ।।2।।

अह तेसिं अदूरम्मि बिलम्मि पविसइ जुण्ण-मज्जारो।
दिट्ठं-सुई-कुसलो उंदुरं आईण खयकारी ।।3।।

गंतूण तब्बिल-दारे भणियं, तेहिं तु 'ताय, ताय' त्ति।
सो किं पुत्ता, पुत्तं' त्ति जंपिरो तत्थ संपत्तो ।।4।।



पभणइ 'धन्नो हं, अज्ज जाणामि लच्छी मे आगया।
जं मज्झण्हय-काले दो वि जणा आगया पासे' ।।5।।

'तं सागयं ति पुत्ता, केण निमित्तेण आगया एत्थ?'
पडिभणियं तेहिं इमं 'अम्हाणं अत्थि तु विवादो ।।6।।

किं पोसे माहे वा बहुलं सीयं पडइ? इय तुमं छिंद'।
सोऊणेव भीओ मज्जारो चितिउं लग्गो ।।7।।

'जंव्वयणं न भणिस्सामि सो य ममं मारिही धुवं'।
एयम्मि काले संभरिया मूलदेव-कहा तस्स ।।8।।

जह किर महाडवीए दुवे पिसाया, वसंतया मिलिया।
ताणं इहो कहासु जायासु भणियं एगेणं ।।9।।



'मह महिला रूववई', बीओ वि भणइ 'मज्झ न तुज्झ'।
एवं च वयंताण ताणं भवियव्वया-वसओ ।।10।।

रत्तिम्मि मूलदेवो एगागी तेण चेव मग्गेण।
वच्चंतो दिट्ठी-पहे पडिओ नाओ य एएहिं ।।11।।

दोहि वि करेहि गहिओ धाविता तेहिं झत्ति भणिओ।
'पंडिय, कहेसु अम्हं कस्स महिला अइ-रूववई?' ।।12।।

भणियं च मूलदेवेण 'निय-निय-जायाण कहेइ गुण-वण्णणं'।
भणियं तेहिं, 'सयं चिय जाणासि न य वियाणामो' ।।13।।

तेसिं हिययाणुसारओ तह य जाइ-पच्चयओ।
वीमंसिय तेणेक्को भणिओ निसुणेहि भज्ज-गुणा ।।14।।

अच्छीसु नूली, हसिएण मक्कडी, जंपिएण भेरूंडी।
चंकमिएण य उट्ठी, सील-वसओ अत्तण-गुणेण ।।15।।

हसिऊण तेण भणियं, 'सच्चं एए गुणा मइ वि जायाए'।
बीओ वि तेण भणिओ 'तुमं पि जाया गुणे सुणसु' ।।16।।

नालत्ता आलवइ, भणिया पडिभणइ पंच-दसवारा।
अज्जा-गले व्व घंटा छिक्काछिक्का कणकणेइ ।।17।।

तेण वि भणियं 'सच्चं एयाणं का हु रूववई?'।
'निसुणेह सावहाणा' अह भणियं मूलदेवेण ।।18।।

'जा जस्स पिया सा तस्स सुंदरी नत्थि मंगुलं तीए'।
इय भणइ मूलदेवो हत्थे गहिओ पिसाएहिं ।।19।।

तं ते तुट्ठा दोन्नि वि मुंचंति य 'साहु साहु' भणिऊण।
'अहं वि तोसइस्से एए' चिंतित्तु संलवइ ।।20।।

'पोसे वा माहे वा जइया वाएइ मारूओ।
तया पडंति सीयाइं मासा एत्थ न कारणं' ।।21।।

अइ-तुट्ठा ते दोन्नि वि भणंति 'साहु साहु पन्ना ते'।
सट्ठाणेसु गया ते बिलम्मि पत्तो य मज्जारो ।।22।।

(मणिपतिचरियं - 80 ते 102)

**संति** – असणे
**संलावो** – चर्चा, संभाषण
**वुत्तो** – म्हणणे, म्हणाले
**महं** – अधिक
**सीयं** – थंडी, शीत
**माहे** – माघ
**वा** – अथवा
**अहियं** – अधिक
**बहुस्सुयं** – बहुश्रुत, विद्‌वान
**जुण्ण–मज्जारो** – वृद्‌ध मांजर
**सुई–कुसलो** – शास्त्रतज्ज्ञ
**खयकारी** – नाश करणारे, ठार मारणारे
**ताय ताय** – तात, तात
**जंपिरो** – बोलणारा
**संपत्तो** – पोहोचला
**पासे** – जवळ
**हु, तु** – खरोखर
**अइ** – अति, अधिक
**बहुलं** – अधिक, जास्त
**छिंद** – छेदणे, मिटविणे, तोडणे
**जंव्वयणं** – ज्याच्यासारखे वचन
**धुवं** – निश्चितपणे
**संभरिया** – स्मरण झाले
**कहा** – कथा
**किर** – खरोखर, दाट
**महाडवीए** – मोठ्या अरण्यात
**वसंतया** – वसंत ऋतूत
**पिसाया** – पिशाच्च
**इहो** – अशाप्रकारे

**कहासु** – कथा, गप्पागोष्टी
**जायासु** – पत्नीविषयी
**बीओ** – दुसरा
**वच्चंतो** – जात असताना
**दिट्ठी–पहे** – दृष्टिक्षेपात
**नाओ** – जाणले, समजले
**एएहिं** – त्यांनी
**निय–निय** – स्वत:, स्वतःच्या
**जायाण** – पत्नीचे
**वियाणामो** – जाणणे
**हिययाणुसारओ** – हृदयातील, मनातील भावानुसार
**जाइ–पच्चयओ** – जाती प्रत्यक्ष, अंतर्ज्ञानाने
**वीमंसिय** – विचार करून
**निसुणेहि** – ऐक
**भज्जगुण** – बायकोचे गुण
**अच्छीसु** – डोळ्यांत
**नूली** – (नकुली) मुंगसिन
**मक्कडी** – माकडीणीप्रमाणे
**जंपिएण** – बोलण्यात
**भेरंडी** – भेरूंड पक्ष्याप्रमाणे (कर्कश)
**चंकमिए** – चालण्यात
**सील–वसओ** – स्वभाव, आचरण, चारित्र्य
**अत्तण** – आत्म्याचे, स्वभावाचे
**तोसइस्से** – संतुष्ट, आनंदित करणे
**संलवइ** – बोलतो, म्हणतो
**पन्ना** – बुद्‌धी, प्रज्ञा
**एए** – हे
**नालत्ता** – न बोलता
**आलवइ** – बोलते, बडबडते

**वारा** – वेळा

**व्व** – प्रमाणे

**अज्जागले** – शेळीच्या गळ्यातील अवयवाप्रमाणे

**छिक्काछिक्का** – कणकण, घणघण वाजणे

**सावहाणा** – सावधानपणे

**एयाणं** – असेच

**का** – कोण

**मंगुलं** – वाईट, अयोग्य

**गहिओ** – पकडलेल्या

**मुंचंति** – सोडतात

**साहु साहु** – छान छान

**वाएइ** – वाहाणे

**मारूओ** – वारा

**पत्तो** – जाणे, पोहोचणे

## कृती

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(i) वाघ आणि सिंह यांच्यात कोणता वाद निर्माण झाला? हा वाद मिटविण्यासाठी ते कोणाकडे गेले?

(ii) मांजराने वाघ आणि सिंह यांच्यातील वाद कसा मिटविला?

(iii) मांजराने वाघ आणि सिंहास कोणता दृष्टांत सांगितला?

(iv) मूलदेवाने पिशाच्यांचा वाद कसा मिटविला?

(v) पिशाच्यांमध्ये कोणता वाद निर्माण झाला? तो वाद कोणी व कसा मिटविला ते स्पष्ट करा.

**2. खालील शब्दांचे अर्धमागधीत शब्द लिहा.**

(i) माघ ⟶ ______

(ii) रूपवती ⟶ ______

(iii) पिशाच्च ⟶ ______

(iv) विद्‌वान ⟶ ______

(v) पत्नी ⟶ ______

(vi) मुंगुस ⟶ ______

**3. समानार्थी शब्द लिहा.**

(i) भणइ (iv) रण्णं

(ii) सुणइ (v) दिट्ठी

(iii) वाया (vi) भज्जा

**4. खालील ओळी पूर्ण करा.**

(i) 'ते सागयं त्ति पुत्ता, केण निमित्तेण ----- एत्थ।' (आगया / गच्छामि)

(ii) पभणइ ------- अज्ज जाणामि लच्छी मे आगया। (धन्नो हं / दुब्भागं हं)

(iii) किं पोसे माहे वा बहुलं ------- पडइ? (सीयं / उण्णं)

(iv) भणियं च मूलदेवेण निय-निय ------- कहेइ गुण वण्णणं। (जायाण / मायाण)

(v) अइ तुट्ठा ते दोन्नि वि भणंति ------- पन्ना ते। (साहु साहु / दुहिं दुहिं)

**5. उपक्रम :**

आपल्या परिसरामध्ये जर कलह निर्माण झाला तर तो तुम्ही कसा मिटवाल? त्याच्या प्रमुख मुद्द्यांसह स्पष्ट करा.

# ६. उदयण-वासवदत्ता-प्पेमकहा

मानवी जीवनामध्ये निःस्वार्थी प्रेमाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे; परंतु वर्तमानकाळातील तरुण-तरुणी निःस्वार्थी प्रेमापेक्षाही कामविकार किंवा अन्य कोणता तरी हेतू मनामध्ये ठेवूनच प्रेमाचे नाटक करतात. त्यामुळे त्यांच्या प्रेमाला सफलता येईलच याची खात्रीही नसते. त्यामुळे त्या प्रेमाचा शेवट दुःखमय झालेला दिसून येतो.

या पद्यपाठात उदयन आणि वासवदत्ता यांच्या आदर्श प्रेमाचे वर्णन केले आहे. कारण यांचे प्रेम हे कामविकारावर किंवा सौंदर्यावर आकर्षित होऊन केलेले प्रेम नव्हते. त्यांचे प्रेम परस्परांच्या गुणांवर, संयमावर, कर्तव्याला प्रथम प्राधान्य देणारे होते. भवितव्याचा विचार करणारे प्रेम असल्याने प्रेम प्रकट करण्याची वेळ येईपर्यंत ते स्वतःवर नियंत्रण ठेवणारे व दूरदृष्टीने युक्त होते. त्यामुळे त्यांच्या प्रेमाला सफलता प्राप्त होते.

वर्तमानकाळातील तरुण-तरुणींना आपले प्रेम सफल व्हावे असे वाटत असेल, तर प्रथम त्यांनी आपले (शैक्षणिक) कर्तव्य पूर्ण केले पाहिजे. प्रेमामध्ये कोणत्याही प्रकारचा स्वार्थ किंवा कामविकार भोगण्याचा उद्देश असू नये. उदयन व वासवदत्ता यांच्याप्रमाणे संयम व दूरदृष्टीने आचरण केले पाहिजे. तसेच प्रेमाचा देखावा न करता प्रेम प्रकट करण्याची वेळ येईपर्यंत स्वतःवर नियंत्रण ठेवून आचरण केले तर त्यांचे प्रेम निश्चितच सफल होईल. तेव्हा प्रत्येक तरुण-तरुणींनी उदयन-वासवदत्ता यांच्या प्रेमाचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून प्रेमाचा अवलंब केला तर त्यांचेही प्रेमच नव्हे तर जीवनही सफल होईल असे वाटते.

प्रस्तुत पद्य पाठ हा अंबदेवसूरींनी लिहिलेल्या 'आख्याणक-मणिकोशवृत्ति' या प्राकृत कथाग्रंथातून घेतलेला आहे. विद्यार्थ्यांना या पाठातून निश्चितच योग्य मार्गदर्शन होईल असे वाटते.

अह अन्नया नलगिरी भग्ग-आलाणो भमइ नयरिं।
नरिंदेण अभयकुमारो पुट्ठो, तेण वि पयं पियं एयं ।।1।।

'वच्छाहिवई गायउ जो चिट्ठइ उदयणो इह-आणीओ।
सो किह?' पज्जोय-सुया वासवदत्ता कला-कुसला ।।2।।

गंधव्व-कला-कुसलो न तम्मि समयम्मि उदयणादन्नो।
ता आणिज्जउ एसो एईए सिक्खण-निमित्तं ।।3।।

'सो कह आणेयव्वो' अभएण वुत्तं 'सो गयवरं दट्ठुं।
गीएण कुणइ सवसं' तो कित्तिम-करिवरो विहिओ ।।4।।

मुक्को य तस्स विसए कित्तिम-करि, वणयरेण केणवि।
दिट्ठो, कहिओ य तओ गंतुं उदयण-नरिंदस्स ।।5।।

तत्तो बल-सहिओ सो समागओ गयवरस्स पासम्मि।
मोत्तुं खंधावारं अल्लिणो गय-समीवम्मि ।।6।।

अइ-महुर-अराव-पूरिय-दियंतरो जाव गायइ नरिंदो।
ताव गइंदो अविचल-गत्तो पसुत्तो व्व ।।7।।

पच्चासन्नो जाओ राया पच्छन्न-संठिय-नरेहिं।
धरिऊण चंड-पज्जोय-राइणो तेहिं उवणीओ।।8।।

भणिओ य 'मज्झ-धूया काणं, सिक्खवसु सुंदरं गेयं।
न तए निरिक्खियव्वा, जओ इमा लज्जिही अहियं' ।।9।।

कहियं तीय वि 'वच्छे, एयं गुरूं कोढाभिभूय-सव्वंगं।
मा पेच्छसु तं तुज्झ वि मा संचरिही इमो वाही' ।।10।।



सो जवणियंतर-ठिय कुमरिं सिक्खवइ तस्स सद्देण।
अवहरिय-मणा सा तं पलोइउं कोउयं वहइ ।।11।।

परमवलोयइ न हु रोग-संग-भीया अह अन्नया कुमरी।
सम्मं सर-संगहणं न कुणइ रूट्ठेण तो तेण ।।12।।

भणिया 'काणे, किं पढसि कूडयं' तो सरोसं एसा वि।
जंपइ, 'किं न वियाणसि अप्पाणं कोढिय-निहीण' ।।13।।

'जारिसओ हं कोढी, नूणं काणा वि तारिसा एसा'।
इय चिंतिऊण जवणियं उक्खिविउं जाव सो नियइ ।।14।।

ताव पेच्छइ तं कुमरिं अहिणव-जोव्वण-मणोहर-अवयवं।
सो सा पिवास तीय वि सच्चविओ कुसुम-बाणो व्व ।।15।।



परोप्पर-अणुराओ संजाओ ताण मुणइ न हु कोइ।
मोत्तुं कंचणमालं, नलगिरी-करिबंधण-निमित्तं ।।16।।

भणिओ पज्जोय-निवेण उदयणो 'कुणसु सुंदरं गीयं'।
पभणइ 'गाएमि अहं वासवदत्ताए संजुत्तो' ।।17।।

आरूढो भद्दवइं करेणुयं 'तो तहा कयं तेहिं'।
अंतर-दिन्न-पडेहिं गहिओ हत्थी तओ राया ।।18।।

आरोवियाओ सद्धिं वासवदत्ताए निय-पुराभिमुहं।
सिग्घं पलाइओ सो अवंतीए जाया य अग्गमहिसी वासवदत्ता ।।19।।

(अंबदेवसूरिविरइयं 'आख्याणक-मणिकोशवृत्ति'
गाथा 220 ते 245)

## शब्दार्थ

**अहियं** – अधिक
**अदन्नो** – शिवाय
**आलाणो** – खांब
**आणेयव्वो** – आणावे
**आरव** – आवाज
**अवहरिय** – अपहरण
**अग्गमहिसी** – प्रमुख राणी
**अल्लिण्णो** – एकटा
**एईए** – याला
**एयं** – हा
**कित्तिमकरी** – कृत्रिम हत्ती
**कोढाभिभूय** – कुष्ठरोगाने युक्त
**खंधावार** – सैन्यांचे शिबीर
**गेय** – गीत
**जवणिय** – जवनिका, पडदा
**नूणं** – खरोखर
**निरिक्खिय** – निरीक्षण केले
**पयंपियं** – बोलतो
**पलोइओ** – पाहतो, निरीक्षण केले
**पच्छन्न** – झाकले, लपविले
**पज्जोय** – प्रद्योत, व्यक्तीचे नाव
**भग्ग** – नष्ट झाले, पळून गेले
**मुक्को** – मुक्त करणे
**वच्छाहिवई** – वत्साधिपती
**वाही** – रोग, व्याधी
**सरसंग्गह** – स्वरसंग्रह
**सवसं** – ताब्यात घेणे
**सच्चाविओ** – सत्य पटविले
**सद्धिं** – सह, समवेत
**गायउ** – गायन करणे

## कृती

**1. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(i) उदयन राजास उज्जैनीस का आणण्यात आले ?
(ii) उदयनास आणण्यासाठी कोणती योजना केली होती ?
(iii) प्रद्योताने उदयनास कोणती विनंती केली ?
(iv) प्रद्योताने मुलीस गुरूविषयी काय सांगितले ?

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(i) वासवदत्ताच्या गुरूंचे नाव काय होते ?
(ii) हत्ती निश्चल का झाला ?
(iii) नगरात कोण फिरत होते ?
(iv) प्रद्योत राजाने कन्येच्या बाबतीत उदयनास काय सांगितले ?

**3. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(i) 'मज्झ-धूया काणं सिक्खवसु सुंदरं गेयं'।
(ii) 'काणे, किं पढसि कूडयं'।
(iii) 'जारिसओ हं कोढी, नूणं काणा वि तारिसा एसा'।

**4. आकृती पूर्ण करा.**

| ग्रंथकाराचे नाव | ← | उदयन-वासवदत्ता कहाणयं | → | ग्रंथाचे नाव |
|---|---|---|---|---|

**5. अर्धमागधीत शब्द लिहा.**

(i) राजा – 
(ii) हत्ती – 

(iii) कन्या – [ ]

(iv) आवाज – [ ]

(iii) वाही → [ ]

(iv) गय → [ ]

**6. समानार्थी शब्द लिहा.**

(i) राया → [ ]

(ii) कन्ना → [ ]

# परिसिट्ठं

## (अ) वागरण–विभागो

1. काळ, विभक्ती, सर्वनाम इत्यादींचा संक्षिप्त परिचय
2. प्राकृत कृदन्त
3. प्रयोग
4. समास

## (ब) लेहण–कोसल्लं

1. अपठित उतारे
2. प्राकृत भाषेत अनुवाद
3. निबंध लेखन

## (क) अर्धमागधी–प्राकृत काव्यसाहित्य परिचय

1. प्राकृत काव्य साहित्य परिचय
2. खंडकाव्य
3. मुक्तक काव्य

परिसिट्ठं

# अ) वागरण-विभागो

## 1) काळ, विभक्ती, सर्वनाम इत्यादींचा संक्षिप्त परिचय

बहुसंख्य विद्यार्थ्यांना व्याकरणाची भीती वाटत असते. त्यामुळे विद्यार्थी व्याकरण शिकण्याची टाळाटाळ करताना दिसतात किंवा परीक्षेत व्याकरणाचे प्रश्न सोडवतच नाहीत. एवढेच नव्हे तर वर्तमानकाळात एक गैरसमज असलेला दिसून येतो. तो म्हणजे ज्यांना भाषा विषय शिकावयाचा आहे त्यांनीच व्याकरण समजून घ्यावे; परंतु हे पूर्णत: चुकीचे आहे, कारण भाषेवर प्रभुत्व मिळवावयाचे असेल तर त्या त्या भाषेचे व्याकरण शिकणे अत्यंत आवश्यक असते.

एखाद्यास भाषण, संभाषण, लेखन इत्यादी कला आत्मसात करायच्या असतील, तर त्या भाषेचे व्याकरण जाणून घेतलेच पाहिजे, कारण संभाषणात अधिक शुद्धता असेल तर त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा इतरांच्यावर अधिक प्रभाव पडतो.

एक गुरू आपल्या शिष्याला व्याकरणाचे महत्त्व स्पष्ट करताना म्हणतात, 'हे बाळ! तुला जास्त शिकता आले नाही तरी एक वेळ चालेल; परंतु तू जी भाषा आत्मसात केलेली आहे किंवा तू जी भाषा बोलतोस त्या भाषेचे व्याकरण शिकण्याचे मात्र टाळू नको.' यावरून व्याकरणाचे महत्त्व स्पष्ट होते.

**व्याकरण शिकण्याचे फायदे :**

(i) गद्य-पद्य पाठांच्या तुलनेने व्याकरणाचा अभ्यास मर्यादित असतो.

(ii) थोड्या वेळेत आणि थोड्याशा श्रमाने अधिक गुण मिळतात.

(iii) व्याकरणामुळे लेखन आणि संभाषण कौशल्याचा विकास होतो.

(iv) लेखनात आणि संभाषणात शुद्धता व सुबकता येते.

(v) व्याकरणामुळे शब्दांच्या अर्थातील बारकावे स्पष्ट होतात.

(vi) बोलण्यातील उच्चार स्पष्ट होण्यास मदत होते.

म्हणून व्याकरण शिकणे अत्यंत महत्त्वाचे असते.

**प्राकृत वाक्यरचना :**

आपल्या मनातील भाव स्पष्ट करण्यासाठी आपण विविध प्रकारच्या शब्दांचा आधार घेतो, या शब्दसमूहालाच वाक्य म्हणून संबोधले जाते.

अनेक शब्द एकत्र करून आपण वाक्यरचना करत असतो. वाक्यरचना करण्यासाठी कमीत कमी एक कर्ता आणि एक क्रिया असावीच लागते. केवळ कर्ता किंवा क्रिया असूनही चालत नाही. केव्हा केव्हा एखादी व्यक्ती केवळ क्रियेने किंवा कर्त्यांनेही बोलू शकते; परंतु त्यातून अर्थबोध होईलच असे नाही.

उदा : 'गेला नाहीस'? येथे फक्त क्रियाच आहे, तर 'कोण आहे तिकडे' तेव्हा तिकडून उत्तर आले 'मी'.

वरील दोन्ही वाक्यातील एकात केवळ क्रियापद आहे, तर दुसऱ्या वाक्यात केवळ कर्ताच आहे. त्यामुळे त्यांना वाक्य म्हणताच येत नाही. वाक्यरचना परिपूर्ण होण्यासाठी काळ, विभक्ती, अर्थ तसेच शब्दसंग्रह इत्यादी आवश्यक असतात.

(i) **नाम :** एखाद्या व्यक्तीस, प्राण्यास, वस्तूस अगर अन्य घटकांचा परिचय ओळख होण्यासाठी एखाद्यास नावाने, शब्दाने संबोधले जाते त्यास **'नाम'** असे म्हटले जाते.

उदा : राम, लक्ष्मण, सीता, माला इत्यादी नामे होत.

(ii) **सर्वनाम:** नामाऐवजी वापरण्यात येणाऱ्या शब्दांना **'सर्वनाम'** म्हणून संबोधले जाते.

उदा : मी-आम्ही तो, ती, ते
तू-तुम्ही ते, त्या, ती

(iii) **क्रिया (धातू) :** मूळ क्रियेलाच प्राकृत भाषेत **'धातू'** असे म्हणतात. या मूळ धातूंना काळाचे प्रत्यय जोडून क्रियापद तयार केले जाते.

(iv) **विभक्ती :** विभक्त करणाऱ्या किंवा विभाजन करणाऱ्या प्रत्ययांना **'विभक्ती'** म्हटले जाते.

विभक्ती प्रत्यय जोडून नामे आणि सर्वनामाचे संबंध स्पष्ट केले जातात.

आता आपण काळ, अर्थ, विभक्ती इत्यादी प्रत्ययांचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे करून घेऊ.

### (i) वर्तमानकाळाचे प्रत्यय –

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | मि | मो |
| द्वि.पु. | सि | ह |
| तृ.पु. | इ | अन्ति/न्ति |

### (ii) भविष्यकाळाचे प्रत्यय –

| ए.व. | अ.व. |
|---|---|
| स्सं, स्सामि | स्सामो |
| स्ससि | स्सह |
| स्सइ | स्सन्ति |

### (iii) भूतकाळाचे प्रत्यय –

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | इत्था | इंसु |
| द्वि.पु. | '' | '' |
| तृ.पु. | '' | '' |

### (iv) आज्ञार्थाचे प्रत्यय –

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | मु | मो |
| द्वि.पु. | 0, सु, हि | ह |
| तृ.पु. | उ | न्तु |

### (v) विध्यर्थाचे प्रत्यय –

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | एज्जा, एज्जामि | एज्जामो |
| द्वि.पु. | एज्जा, एज्जासि, एज्जाहि | एज्जाह |
| तृ.पु. | एज्जा | एज्जा |

### (vi) संबंध कृदन्त (ल्यबन्त) प्रत्यय –

(i) अकारांत धातू → 'इऊण'

(ii) आकारांत धातू, एकारांत धातू, ओकारांत धातू → 'ऊण'

### (vii) हेत्वर्थक कृदन्त (तुमन्त) प्रत्यय –

(i) अकारांत धातू → 'इउं'

उदा : पास+इउं = पासिउं

(ii) आकारांत धातू, एकारांत धातू, ओकारांत धातू → 'उं'

उदा : गा+उं = गाउं
ने+उं = नेउं
हो+उं = होउं

### (viii) विभक्ती प्रत्यय –

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| **प्रथमा** | ओ (कर्ता) | आ |
| **द्वितीया** | अनुस्वार (कर्म) (स,ला,ते) | ए,आ |
| **तृतीया** | एण (ने, कडून) | एहि, एहिं |
| **चतुर्थी/षष्ठी** | स्स (चा, ची, चे) | आण, आणं |
| **पंचमी** | आओ, आउ (पासून) | आओ, एहिंतो |
| **सप्तमी** | ए, म्मि (आत, मध्ये) | एसु, एसुं |
| **संबोधन** | मूलरूप | आ |

वरीलप्रमाणे काळ, अर्थ, ल्यबंत, तुमंत, विभक्ती इत्यादींचे प्रत्यय संक्षिप्त स्वरूपात दिलेले आहेत, त्याच्या आधारे विद्यार्थ्यांना प्राकृत भाषेत वाक्यरचना करता येईल.

## 2) प्राकृत कृदन्त

इयत्ता अकरावीच्या वर्गामध्ये आपण काळादींचे प्रत्यय शिकलो. आता आपणास कृदन्ताच्या प्रत्ययांचा परिचय करून घ्यायचा आहे. तेव्हा कृदन्त म्हणजे काय, ते प्रथम समजावून घेतले पाहिजे.

- **व्याख्या :**

संस्कृत भाषेत धातुसाधित विशेषणांनाही कृदन्त म्हणून संबोधले जाते. त्यामुळे **धातुसाधिते म्हणजे 'कृदन्त' होय.**

(i) ज्या धातुसाधिताचा स्वतंत्रपणे वाक्यात उपयोग करता येत नाही अशा धातुसाधितांना कृदन्त म्हणून संबोधले जाते.

(ii) धातूंच्या शेवटी प्रत्यय जोडून जे संज्ञावाचक विशेषण आणि अव्ययवाचक शब्द तयार होतात त्या शब्दांना 'कृदन्त' म्हटले जाते.

- **कृदन्ताचा उपयोग :**

**कोणत्याही काळातील अपूर्ण क्रिया दर्शविण्यासाठी किंवा क्रिया अपूर्ण आहे; क्रिया चालू आहे, हे दर्शविण्यासाठी कृदन्ताचा उपयोग केला जातो.**

उदा :

(i) राम धावत आहे. (अपूर्ण वर्तमानकाळ)

(ii) राम धावत होता. (अपूर्ण भूतकाळ)

(iii) राम धावत राहील. (अपूर्ण भविष्यकाळ)

(iv) रामाने धावावे. (आज्ञार्थ, विध्यर्थक)

- **कृदन्ताचे प्रकार :**

कृदन्ताचे पुढील पाच प्रकार आहेत.

(i) वर्तमानकाळी कृदन्त

(ii) भूतकाळी कृदन्त

(iii) भविष्यकाळी कृदन्त

(iv) हेत्वर्थक (तुमंत) कृदन्त

(v) विध्यर्थक कृदन्त

### 1) वर्तमानकाळी कृदन्त :

(i) वर्तमानकाळातील अपूर्ण क्रिया दर्शविण्यासाठी वर्तमान कृदन्ताचा उपयोग केला जातो.

(ii) वर्तमानकाळी कृदन्ताचे रूप तयार करण्यासाठी धातूला 'न्त' किंवा 'माण' प्रत्यय जोडून कृदन्ताचे रूप तयार केले जाते.

(iii) पुल्लिंगी कृदन्ताचे रूप तयार करण्यासाठी 'न्त आणि माण' या प्रत्ययातील अकाराचा ओकार केला जातो. परंतु अकारांत धातूचे 'न्त' आणि 'माण' प्रत्यय लागतो. आ, ए, ओ या धातूंना फक्त 'न्त' प्रत्यय लावला जातो.

उदा : न्त = न्तो माण = माणो

| | |
|---|---|
| पढ+न्त+ओ = पढन्तो | पढ+माण+ओ = पढमाणो (वाचत असताना) |
| सुण → सुणन्तो | सुणमाणो (ऐकत असताना) |
| धाव → धावन्तो | धावमाणो (धावत असताना) |
| ने → नेन्तो | (नेत असताना) |
| जा → जायन्तो | (जाताना) |
| हो → होन्तो | (होत असताना) |

(iv) 'न्त' आणि 'माण' प्रत्ययांना इकार जोडल्याने स्त्रीलिंगी रूप तयार होते.

उदा : पढ+न्ती = पढन्ती. (वाचत असताना)

पढ+माणी = पढमाणी, पढिमाणी

सुण+माणी = सुणमाणी, सुणिमाणी

जा+माणी = जायमाणी

(v) 'न्त' आणि 'माण'च्या अंत्याक्षरावर अनुस्वार दिल्याने (अनुस्वारात रूपांतर केल्याने) नपुंसकलिंगी रूप तयार होते.

उदा : पढ+न्तं = पढन्तं, पढिअंतं, पढिअमाणं

सुण+न्तं = सुणन्तं, सुणिअंतं, सुणिअमाणं

## 2) भूतकाळी कृदन्त :

**भाव, विचार प्रकट करण्यासाठी भूतकाळी कृदन्ताचा उपयोग केला जातो.**

(i) धातूला 'इअ' किंवा 'अ' प्रत्यय जोडून भूतकाळी कृदन्ताचे रूप तयार केले जाते.

(ii) केव्हा केव्हा धातूला 'य, त, द' प्रत्यय जोडूनही भूतकाळी कृदन्ताचे रूप तयार केले जाते.

उदा : हस - हसिय, हसित, हसिद

पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंगामध्ये बदलणारी तुलनात्मक उदाहरणे

| मूळधातू | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग | |
|---|---|---|---|---|
| पढ | पढिओ | पढिआ | पढिअं | (वाचत होता, ती, ते) |
| कर | करिओ | करिआ | करिअं | (करत होता, ती, ते) |
| हस | हसिओ | हसिआ | हसिअं | (हसत होता, ती, ते) |

## 4) संबंधसूचक (ल्यबन्त) कृदन्त :

जेव्हा कर्ता एक क्रिया पूर्ण करून दुसरी क्रिया करतो तेव्हा पहिल्या क्रियेसाठी संबंधसूचक कृदन्ताचा उपयोग केला जातो.

(i) संबंधसूचक कृदन्तामध्ये दोन क्रियेचा संबंध जोडला जातो म्हणून त्यास संबंधसूचक कृदन्त (ल्यबन्त) म्हणतात.

(ii) संबंधसूचक कृदन्तास 'ल्यबन्त' म्हणूनही संबोधले जाते.

(iii) अकारान्त धातूला 'इऊण' आणि 'आ, ए, ओ' या धातूंना 'ऊण' प्रत्यय जोडला जातो.

(iv) वरील (इऊण आणि ऊण) प्रत्ययाशिवाय 'तुं, अ, तूण, तुआणं, इत्ता, इत्ताण, एत्ता, आए' इत्यादी प्रत्ययही जोडले जातात. तरीही 'इऊण, ऊण' प्रत्ययांचा अधिक वापर होत असलेला दिसून येतो.

| अकारान्त धातू | अकारान्तेतर धातू |
|---|---|
| पढ+इऊण = पढिऊण, पढेऊण | गा+ऊण = गाऊण |
| पढ+इत्ता = पढित्ता, पढित्ताण | जा+ऊण = जाऊण |
| पढ+आए = पढाए, पढिआए | ने+ऊण = नेऊण |
| पढ+तुआण = पढितुआण | दे+ऊण = देऊण |
| पढ+अ = पढिअ, पढेअ | हो+ऊण = होऊण |

## 5) हेत्वर्थक कृदन्त (तुमन्त) :

(i) जेव्हा कर्ता एखादे निश्चित किंवा इच्छित कार्य करण्यासाठी जाणार असतो (कार्य करणार असतो) तेव्हा हेत्वर्थक कृदन्ताचा उपयोग केला जातो.

(ii) हेत्वर्थक कृदन्तास 'तुमन्त' म्हणूनही संबोधले जाते.

(iii) हेत्वर्थक (तुमन्त) कृदन्ताचे रूप तयार करण्यासाठी धातूला 'उं किंवा इउं' तसेच 'त्तए, इत्तए, एत्तए' प्रत्यय जोडूनही हेत्वर्थक कृदन्ताचे रूप तयार केले जाते.

(iv) अकारांत धातूला 'इउं' आणि 'आ, ए, ओ' या धातूंना 'उं' प्रत्यय जोडून हेत्वर्थक (तुमंत) रूप तयार केले जाते.

| | | |
|---|---|---|
| उदा : | पढ+इउं = पढिउं | (वाचण्यासाठी, वाचण्याकरिता) |
| | पढ+इत्तए = पढित्तए | ’’ ’’ |
| | पढ+एत्तए = पढेत्तए | ’’ ’’ |
| | जा+उं = जाउं | (जाण्यासाठी) |
| | ने+उं = नेउं | (नेण्यासाठी) |
| | हो+उं = होउं | (होण्यासाठी) |

## 6) विध्यर्थक कृदन्त :

(i) कर्त्यास दुसरे कोणीतरी कार्य करण्यास प्रेरित करत असते. तेव्हा विध्यर्थक कृदन्ताचा उपयोग केला जातो.

(ii) धातूला 'ज्जं, तव्वं, यव्वं आणि यं' इत्यादी प्रत्यय जोडून विध्यर्थक कृदन्ताचे रूप तयार केले जाते.

(iii) अकारान्ताचे इकारान्तामध्ये रूपांतर करून नंतर प्रत्यय जोडले जातात.

| | | |
|---|---|---|
| उदा : | कर+ज्जं = करिज्जं | (कर, करावे, करावेस) |
| | कर+तव्वं = करितव्वं, करियव्वं | ( ’’ ’’ ’’ ) |
| | करेतव्वं, करेयव्वं | ( ’’ ’’ ’’ ) |
| | कर+अणिज्जं = करिणिज्ज, करणिज्जं | ( ’’ ’’ ’’ ) |
| | कर+अणीयं = करणीयं, करेणीयं | ( ’’ ’’ ’’ ) |

## 7) कर्तृसूचक कृदन्त :

केव्हा केव्हा पुल्लिंगामध्ये धातूंना 'इर' आणि स्त्रीलिंगामध्ये धातूला 'इरा' प्रत्यय जोडूनही कर्तृसूचक कृदन्ताचे रूप तयार केले जाते.

उदा : पढ+इरो = पढिरो (पुल्लिंग) (पठन करणारा)

पढ+इरा = पढिरा (स्त्रीलिंग) (पठन करणारी)

### कृदन्ताची काही उदाहरणे

| | मराठी | | प्राकृत |
|---|---|---|---|
| (i) | तो पाहत जात आहे. | → | सो पासन्तो गच्छइ। |
| (ii) | राम वाचन करत चिंतनही करत आहे. | → | रामो पढन्तो चिंतणं वि करेइ। |
| (iii) | गीता नृत्य करत गायन करत आहे. | → | गीया नच्चन्ती गायइ। |
| (iv) | बालिका हसत हसत येत आहे. | → | बाला हसन्ती आगच्छइ। |
| (v) | माता स्वयंपाक करत कथा सांगत आहे. | → | माया रंधियमाणी कहा कहेइ। |
| (vi) | राम खेळत असताना पडला. | → | रामो खेलमाणो पडिओ। |
| (vii) | हसणारा मुलगा. | → | हसन्तो (हसमाणो) बालो। |
| (viii) | नाचणारी स्त्री. | → | नच्चंती (णच्चमाणी) नारी। |
| (ix) | उमलत असलेले फूल. | → | वियसंतं (वियसमाणं) पुप्फं। |
| (x) | एक वृद्ध दुसऱ्या गावाला जात असताना थकला. | → | एगो वुड्ढो अण्णं गामं गच्छंतो संतो भुओ। |
| (xi) | परिश्रम करणाऱ्या लोकांना धन मिळते. | → | परिस्समो करेंता लोगा धणं लब्भइ। |

# ३) प्रयोग

प्रत्येक भाषेत योग्य प्रकारच्या वाक्यरचनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. वाक्यरचना व्यवस्थित नसेल तर त्या वाक्यातून योग्य तो अर्थबोध होऊ शकत नाही, म्हणून वाक्यातील कर्ता, कर्म आणि क्रियापद यांचा योग्य तो क्रम (ठिकाण) असणे अत्यंत आवश्यक आहे.

उदा : खेळतात मुले चेंडूने . (किंवा)

चेंडूने खेळतात मुले.

या दोन्ही वाक्यातील कर्ता, कर्म आणि क्रियापद यांचा क्रम योग्य नाही. परंतु 'मुले चेंडूने खेळतात.' या वाक्यातील कर्ता, कर्म आणि क्रियापद यांचा क्रम (ठिकाण) योग्य असल्याने वाक्य बोलण्यासाठी आणि अर्थबोध होण्यासाठी सहजसुलभ वाटते.

वाक्याच्या क्रमालाच प्रयोग म्हणून संबोधले जाते. वाक्याचा क्रम कसा असावा त्यासाठी व्याकरणकारांनी काही नियमावली, तंत्र सांगितलेले आहे या नियमावलीस, तंत्रास **'प्रयोग'** म्हटले जाते.

वाक्यरचनेच्या दृष्टीने 1) कर्तरी प्रयोग 2) कर्मणि प्रयोग 3) भावे प्रयोग असे प्रयोगाचे प्रमुख तीन प्रकार आहेत. याशिवाय 1) अकर्मक 2) सकर्मक 3) द्विकर्मक असे प्रयोगाचे तीन उपप्रकारही आहेत; परंतु प्राकृत वाक्यरचनेत (प्रयोगात) द्विकर्मक प्रयोग हा प्रकार असत नाही.

## 1. कर्तरी प्रयोग

(i) ज्या वाक्यामध्ये कर्ता प्रमुख असतो त्यास कर्तरी वाक्य (प्रयोग) म्हणून संबोधले जाते.

(ii) कर्तरी प्रयोगात कर्त्याची प्रथमा विभक्ती वापरतात आणि कर्माची द्वितीया विभक्ती वापरतात.

(iii) कर्तरी प्रयोगात क्रियापद कर्त्यानुसार वचन (ए.व. किंवा अ.व.) आणि पुरुष (प्रथम, द्वितीय, तृतीय) वापरले जाते.

(iv) कर्तरी प्रयोग हा अकर्मक किंवा सकर्मक अशा दोन प्रकारचा असतो.

उदा :

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | बालो देवं वंदइ। | (vi) | मेहा जलं वरिसंति। |
| (ii) | अहं धणं अज्जामि। | (vii) | किंकरा भारं वहन्ति। |
| (iii) | सावया धम्मं सुणन्ति। | (viii) | गुरू छात्तं पाढं पढइ। |
| (iv) | तुमं गीयं गासि। | (ix) | पोत्तगा पितामहं नमन्ति। |
| (v) | वयं पाढसालं गच्छामो। | (x) | नरिंदो रज्जं पालेइ। |

वरील सर्व वाक्यांमध्ये कर्म असल्याने ही सर्व वाक्ये सकर्मक प्रयोगाची असून या वाक्यातील कर्ता प्रथमा विभक्तीमध्ये आहे आणि कर्म द्वितीया विभक्तीत आहे. तर क्रियापद कर्त्याच्या पुरुष आणि वचनाप्रमाणे असलेले दिसून येते.

ज्या वाक्यात कर्म नाही त्या वाक्यांना अकर्मक कर्तरी प्रयोगाचे वाक्य म्हटले जाते.

(i) अकर्मक कर्तरी वाक्यामध्ये कर्ता आणि क्रियापद या दोहोंचाच समावेश असतो. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे–

उदा :
(i) अहं जामि। (मी जातो.)
(ii) तुमं खेलसि। (तू खेळतोस.)
(iii) सा नच्चइ। (ती नाचते.)
(iv) ताणि धावन्ति। (ते धावतात.)
(v) ताओ पढन्ति। (त्या वाचतात.)
(vi) लया भणइ। (लता म्हणते.)
(vii) रामो भक्खइ। (राम खातो.)

## 2. कर्मणी प्रयोग

ज्या वाक्यांमध्ये कर्म हे प्रमुख असते आणि कर्ता हा गौण असतो त्यास **'कर्मणी प्रयोग'** वाक्य म्हटले जाते.

(i) कर्मणी प्रयोगात कर्मासाठी प्रथमा विभक्तीचा उपयोग केला जातो आणि कर्त्यासाठी तृतीया विभक्तीचे प्रत्यय वापरले जातात.

(ii) कर्मणी प्रयोगातील क्रियापदासाठी (मूळ धातूला) 'इज्ज' प्रत्यय जोडून त्या त्या काळानुसार आणि वचनानुसार रूपे तयार केली जातात.

उदा :
पास+इज्ज = पासिज्ज
सुण+इज्ज = सुणिज्ज
गा+इज्ज = गाइज्ज
ने+इज्ज = नेइज्ज
हो+इज्ज = होइज्ज

विविध काळातील कर्मणी रूपे पुढीलप्रमाणे –

(i) वंद+इज्ज = वंदिज्ज ⟶ वंदिज्जामि (वर्तमानकाळ)
(ii) वंद+इज्ज = वंदिज्ज ⟶ वंदिज्जित्था (भूतकाळ)
(iii) वंद+इज्ज = वंदिज्ज ⟶ वंदिज्जिस्सामि (भविष्यकाळ)
(iv) वंद+इज्ज = वंदिज्ज ⟶ वंदिज्जामु (आज्ञार्थ)
(v) वंद+इज्ज = वंदिज्ज ⟶ वंदिज्जामि (विध्यर्थ)

### काही अनियमित कर्मणी अंगे

| | |
|---|---|
| कर ⟶ कीर, किज्ज | पास ⟶ दीस |
| भण ⟶ भण्ण | जाण ⟶ नज्ज, जाणज्ज |
| लह ⟶ लब्भ | हण ⟶ हम्म |
| बंध ⟶ बज्झ | खा ⟶ खज्ज |

सुण → सुण्ण　　　　पा → पिज्ज

वय → वुच्च　　　　ने → निज्ज

डह → डज्झ

## 3. भावे प्रयोग

(i) ज्या वाक्यामध्ये भावाची (विचार, उद्‌देश्याची) प्रमुखता असते त्यास **'भावे प्रयोग'** म्हटले जाते.

(ii) भावे प्रयोगामध्ये वाक्यातील कर्ता तृतीया विभक्तीमध्ये असतो. त्यामुळे क्रियापदही तृतीय पुरुषांमध्येच येते.

उदा : (i) मालाए हसिज्जइ।

(ii) रामेण आगच्छिज्जइ।

(iii) भाववाचक वाक्यामध्ये तिन्ही पुरुष आणि दोन्ही वचनांमध्ये क्रियापदासाठी 'इज्ज' प्रत्यय जोडून वर्तमान, भूतकाळ, आज्ञार्थ, विध्यर्थ इ. चे तृतीय पुरुष एकवचनाचे प्रत्यय जोडले जातात.

उदा : →

| | मूळधातू | | प्रत्यय | | भावेप्रयोगी रूप | वर्तमानकाळ | भूतकाळ | आज्ञार्थ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (i) | हस | + | इज्ज | = | हसिज्ज | हसिज्जइ, | हसिज्जित्था, | हसिज्जउ |
| (ii) | पास | + | इज्ज | = | पासिज्ज | पासिज्जइ, | पासिज्जित्था, | पासिज्जउ |

(iv) भविष्यकाळी भावेप्रयोगी रूप तयार करण्यासाठी इतर काळाप्रमाणे 'इज्ज' हा प्रत्यय न जोडता तिन्ही पुरुषांमध्ये आणि दोन्ही वचनांमध्ये नेहमी तृतीय पुरुष एकवचनाचाच उपयोग केला जातो.

उदा : हस + हि + इ = हसिहिइ

(v) भावे प्रयोगामध्ये केव्हा केव्हा तिन्ही पुरुषात आणि दोन्ही वचनात धातूला 'ईय' प्रत्ययही जोडला जातो. त्यानंतर तृतीय पुरुष एकवचनाचा प्रत्यय जोडला जातो.

उदा : हस + ईय = हसीय + इ (तृ.पु.ए.व.) = हसीयइ

* कर्तरी वाक्यांचे भावे प्रयोगामध्ये रूपांतर करण्याची सोपी पद्‌धत पुढीलप्रमाणे –

| | कर्तरी प्रयोग वाक्ये | | भावे प्रयोग वाक्ये |
|---|---|---|---|
| (i) | रामो भक्खइ। | → | रामेण भक्खिज्जइ। |
| (ii) | अमच्चा भणंति। | → | अमच्चेहिं भणिज्जइ। |
| (iii) | निवो जाणिस्सइ। | → | निवेण जाणिज्जिस्सइ। |

# 4) समास

संस्कृत-प्राकृत-पालि या प्राचीन भारतीय भाषांमध्येच नव्हे तर जगातील सर्व भाषांमध्ये समासास अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान असलेले दिसून येते. कारण या समासामुळे वाक्यरचनेस एक प्रकारचे सौंदर्य तर प्राप्त होतेच शिवाय वाक्यालाही एक प्रकारचा सुटसुटीतपणा येतो. या समासाच्या प्रक्रियेमुळे मोठमोठाले आशयही मोजक्या शब्दांत व्यक्त केले जातात. असे असले तरीही प्राकृत व्याकरणकारांनी सोप्या व सरळ स्पष्ट होणाऱ्या समासांचाच अधिक उपयोग केलेला दिसून येतो. सामान्यता नाम, विशेषण, क्रिया विशेषण, अव्यय, शब्दयोगी अव्यय आदि प्रकारच्या शब्दांचीच समासाची पदे असतात.

दुसरे म्हणजे समासामधील दोन्ही पदे समान दर्जाची असतीलच असे नाही. त्यामुळे प्रमुख पद आणि गौणपद असे समासाचे दोन विभाग पडतात.

### समासाची व्याख्या :

(i) समास म्हणजे शब्दांचे संक्षिप्तीकरण होय.

(ii) मोजक्या शब्दांमधून अधिक अर्थ सांगणाऱ्या प्रक्रियेस **'समास'** म्हणतात.

(iii) विभक्ती प्रत्ययाने रहित असलेल्या आणि परस्परांशी संबंधित असलेले दोन किंवा दोहोंपेक्षा जास्त शब्द (पदे) एकत्र जोडल्याने तयार होणाऱ्या सामासिक (जोड) शब्दास समास म्हणतात.

(iv) जोडशब्दांना **'समास'** म्हणतात.

### समास विग्रह :

(i) दोन जोडशब्दांमधील परस्परांचा संबंध स्पष्ट करण्याच्या क्रियेला **समासाचा विग्रह** म्हणतात.

(ii) समासाचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या शब्दाला किंवा **वाक्याला विग्रह** असे म्हणतात.

(iii) वि म्हणजे विशेष. ग्रह म्हणजे धारणा, अर्थ. **एखाद्या शब्दाचा विशेष अर्थ स्पष्ट करणाऱ्या क्रियेस विग्रह करणे असे म्हटले जाते.**

(iv) विभक्ती प्रत्यय लावून किंवा समासात नसलेले दुसरेच शब्द वापरून दोन किंवा दोहोंहून अधिक पदांमधील संबंध दर्शविण्याच्या क्रियेला विग्रह करणे म्हणतात.

### समासाचे प्रकार :

समासात असणारी दोन्ही पदे केव्हा केव्हा समान दर्जाची असतात तर केव्हा केव्हा समान दर्जाची नसतात. कारण समासातील पहिले पद प्रमुख असेल तर दुसरे पद गौण असते, तर केव्हा केव्हा दुसरे पद प्रमुख असते तर पहिले पद गौण असते. केव्हा केव्हा तर समासात नसलेल्याच व्यक्तीचा किंवा वस्तूचा बोध होतो. त्यावरून समासाचे प्रमुख चार प्रकार असले तरीही प्रत्येक समासाचेही विविध उपप्रकार असलेले दिसून येतात. प्रथम आपण प्रमुख चार समासांचा संक्षिप्त परिचय करून घेऊ.

### समासाचे प्रकार :

समासाचे 1) द्वंद्व समास 2) अव्ययीभाव समास 3) तत्पुरुष समास 4) बहुव्रीही समास, असे चार प्रमुख प्रकार आहेत.

(i) दोन्हीही (उभय) पदे समान दर्जाची - **द्वंद्व समास.**

(ii) पूर्व (प्रथम) पद गौण आणि उत्तर (दुसरे) पद प्रमुख - **तत्पुरुष समास**

(iii) दोन्हीही पदे गौण असून (समासाबाहेरील) एखाद्या तिसऱ्याच पदास महत्त्व दिले जाते तेव्हा त्यास **बहुव्रीही समास** म्हणतात.

(iv) एखाद्या अव्ययाने प्रारंभ होणारा किंवा पूर्व पद प्रधान आणि उत्तर पद गौण सामासिक शब्दास **अव्ययीभाव समास** म्हणतात.

## 1. द्वंद्व समास :

दोन किंवा दोहोंपेक्षा जास्त नामे (संज्ञा), विशेषण एकत्र येऊन जो सामासिक (जोड) शब्द तयार होतो त्यास **'द्वंद्व समास'** म्हटले जाते.

(i) हा समास अनेकवचनी असतो. (समासातील शेवटच्या पदाचे, शब्दाचे जे लिंग, वचन असेल तेच या समासाचे लिंग, वचन असते.)

(ii) या समासातील प्रत्येक पद हे प्रमुख असते. त्यामुळे प्रत्येक शब्दातून स्वतंत्र अर्थबोध होतो. एकाला दुसऱ्याचा आधार घेण्याची गरज नसते.

(iii) द्वंद्व समासाचा विग्रह करताना 'य, च, वा' इत्यादींपैकी एका अव्ययाचा उपयोग करून समासाचा विग्रह (वेगळा) केला जातो.

(iv) द्वंद्व समासाचे 'इतरेतर द्वंद्व' आणि 'समाहार द्वंद्व' असे उपप्रकार आहेत.

### I. इतरेतर द्वंद्व :

(i) या समासातील दोन्ही पदे समान दर्जाची (प्रमुख) असतात.

(ii) हा समास अनेकवचनी असतो.

(iii) अंत्यपदाचे जे लिंग, वचन असेल ते सर्व समासाचे लिंग, वचन असते.

(iv) या समासाचा विग्रह 'य' अथवा 'च' या अव्ययाने केला जातो. केव्हा केव्हा 'वा' ही वापरले जाते.

(v) या समासातील पदांमधून दोन किंवा तीन वस्तूंचा, नामांचा बोध होतो; परंतु समूहाचा बोध होत नाही.

उदा : जीवाजीवा → जीवा य अजीवा य। (पुल्लिंगी)
मित्तबंधवा → मित्ता य बंधवा य। (पुल्लिंगी)
नरनारीओ → नरा य नारीओ य। (स्त्रीलिंगी)
गंधपुप्फ → गंधं च पुप्फं च। (नपुंसकलिंगी)
नेत्ताइ → नेत्तं च नेत्तं च। (नपुंसकलिंगी)
निंदापसंसाओ → निंदाओ य पसंसाओ य।
मायापिया → माया य पिया य।
देवदेवीओ → देवा य देवीओ य।
इत्थिपुरिसा → इत्थि य पुरिसा य।
जणणीजणया → जणणी य जणया य।

### II. समाहार द्वंद्व :

समाहार म्हणजे समूह, समुदाय, समूह किंवा समुदाय नेहमी एकच असतो. (समूहामध्ये अनेकांचा जरी सहभाग असला तरी त्या समूहास कोणत्यातरी एकाच नावाने संबोधले, ओळखले जाते.)

(i) या समासातील प्रत्येक पदास प्राधान्य न देता त्यांच्या समुदायास प्राधान्य दिले जाते.

(ii) शारीरिक अवयव, प्राणी, पदार्थ किंवा इतर सामान्य नामाच्या शब्दांच्या, समूहाचा बोध करण्यासाठी या समासाचा उपयोग केला जातो.

(iii) या समासाचा विग्रह करतेवेळी विशेषत: 'य' आणि 'च' चा उपयोग केला जातो. तरीही केव्हा केव्हा 'वा' या शब्दाचाही उपयोग केला जातो. तरीही या समासामध्ये 'च' चा अधिक वापर केला जातो.

(iv) या समासातील शब्द भिन्न भिन्न लिंगी असले तरीही हा समास नेहमी नपुंसकलिंगी एकवचनात असतो.

(v) विग्रह करताना 'एयाणं' किंवा 'तेसिं' समाहारो असा केला जातो.

उदा : भत्तपाणं → भत्तं च पाणं च तेसिं समाहारो।
अन्नपाणं → अन्नं च पाणं च एयाणं समाहारो।
मंससोणियं → मंसं च सोणियं च एयाणं समाहारो।
तवसंजयं → तवं च संजयं च एयाणं समाहारो।
सुहदुक्खं → सुहं च दुक्खं च तेसिं समाहारो।
वत्थगधं → वत्थं च गंधं च तेसिं समाहारो।
ण्हाणविलेपणं → ण्हाणं च विलेपणं च तेसिं समाहारो।
णाणदंसणचरितं → णाणं च दंसणं च चरित्तं च एयाणं समाहारो।

पुण्णपावं → पुण्णं च पावं च।

लाभालाभो → लाभो वा अलाभो वा।

सत्तूमित्तो → सत्तू वा मित्तो वा।

## 2. अव्ययीभाव (अव्वई) समास :

ज्या समासामधील पहिले पद हे एखादे अव्यय असते आणि दुसरे पद हे नाम असते त्यास **'अव्ययीभाव समास'** म्हणतात.

(i) अव्ययीभाव समासातील पहिले पद अव्यय असून ते त्या समासातील प्रमुख पद असते. म्हणून या समासास पूर्वपदप्रधान समास म्हणूनही संबोधले जाते. दुसरे पद नाम असते.

(ii) वाक्यामध्ये या समासाचा उपयोग क्रिया-विशेषणासारखा केला जातो.

(iii) विग्रह करताना केव्हा केव्हा दुसरे पद प्रथम लिहिले जाते आणि दोन्हीही शब्द (पदे) विभक्त केले जातात.

उदा : अणुरूवं → रूवं अणु।

अणुदिणं → दिणे दिणे।

पइदिणे → दिणे दिणे।

पइवरिसे → वरिसे वरिसे।

जहासुहं → जहा सुहं तहा।

जावज्जीवं → जाव जीवो ताव।

उवगुरुं → गुरूणो समीवं।

जहासत्ति → जहा सत्ति तहा।

जहाउयं → जहा आउयं तहा।

## 3. तत्पुरुष (तप्पुरिस) समास :

(i) ज्या समासातील उत्तर (दुसरे) पदाच्या अर्थाचे प्रभुत्व (प्रमुख) असते त्या समासास **'तत्पुरुष समास'** म्हणतात.

(ii) या समासातील दुसऱ्या पदाचे जे लिंग, वचन असते तेच लिंग, वचन विग्रह केल्यानंतरही कायम राहाते.

(iii) या समासात ज्या विभक्तीचा उपयोग केला जातो त्यानुसार त्या समासाचे विविध प्रकार पडतात.

(iv) समासातील प्रथम पदातील ज्या विभक्तीचा लोप केला जातो त्यानुसार त्या समासास त्या त्या विभक्तीचे नाव दिले जाते.

उदा : द्वितीया विभक्तीचा लोप केला तर द्वितीया तत्पुरुष नाव दिले जाते. तृतीया असेल तर तृतीया अशाप्रकारे सप्तमी विभक्तीपर्यंतची पाच नावे दिली जातात. तेच त्याचे प्रकार मानले जातात.

(v) वरील प्रकाराशिवाय तत्पुरुष समासाचे कर्मधारय, द्विगु, नञ्तत्पुरुष, उपपद, अलुय (अलुक्)

(vi) तत्पुरुष समासास बहुव्रीही-रूपक-तत्पुरुष समास म्हणूनही संबोधले जाते. तरी दोहोंमध्ये विग्रह करताना फरक दिसून येतो.

बहुव्रीही-रूपक-तत्पुरुष समासातील विग्रहात अव्ययाचा अर्थ कायम राहातो परंतु बहुव्रीही समासात अव्ययाचा अर्थ कायम राहात नाही.

तसेच बहुव्रीही समासात उत्तर (दुसऱ्या) पदाचे लिंग आहे ते न राहता ते विशेषण होते आणि विशेष्यानुसार चालते.

तत्पुरुष समासाचे विविध प्रकार असले तरीही इयत्ता बारावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी येथे फक्त कर्मधारय, द्विगु, नञ्तत्पुरुष समासांचाच परिचय दिलेला आहे.

### I. कर्मधारय समास :

(i) कर्मधारय समास हा तत्पुरुष समासाचाच एक उपप्रकार आहे.

(ii) या समासातील दोन्हीही पदे ही एकाच विभक्तीची म्हणजे प्रथमा विभक्तीची असतात.

(iii) या समासातील पहिले पद हे दुसऱ्या पदाची विशेष माहिती सांगण्यासाठी आलेले असते. म्हणजेच या समासातील पहिले पद गौण आणि दुसरे पद हे मुख्य असते.

(iv) पहिले पद हे विशेषण असते आणि दुसरे पद हे नाम, सर्वनाम किंवा सामान्यनाम असते.

उदा : नीलकमल

(सूचना- मराठी भाषेतील काही उदाहरणे पुढीलप्रमाणे)

(v) केव्हा केव्हा उत्तर पदही विशेष्य असते आणि दुसरे पद विशेषण असते.

उदा : पुरुषोत्तम (उत्तम पुरुष)

(vi) केव्हा केव्हा या समासातील दोन्हीही पदे विशेषणे असतात.

उदा : निळासावळा (निळा आणि सावळा)

(vii) केव्हा केव्हा पहिले पद उपमान आणि दुसरे पद नाम असते.

उदा : कमलनेत्र (कमळासारखे नेत्र) येथे पहिले पद उपमान

(viii) केव्हा केव्हा उत्तर (दुसरे) पद उपमान असते.

उदा : मुखचंद्र (चंद्रासारखे मुख किंवा मुख हाच चंद्र)

अशाप्रकारे कर्मधारय समासाचे विविध उपप्रकार आहेत.

उदा : सीओदगं → सीयं उदगं।
सीओण्हं → सीयं उण्हं।
पुरिसोत्तमो → उत्तमो पुरिसो।
वडरुक्खो → वडो रुक्खो।
सुक्कनई → सुक्का नई।
अद्धच्छिन्नं → अद्धं छिन्नं।
मुहकमलं → मुहं इव कमलं (मुहं कमलं इव)
सुपुरिसो → सोहणो पुरिसो।
अहिंसाधम्मो → अहिंसा एव धम्मो।
दयाधम्मो → दया एव धम्मो (दया धम्मो)
दुस्सीलं → दुसीलो सीलो
मच्चुसीहो → सीहो एव मच्चू

## II. नञ् तत्पुरुष समास :

ज्या समासाची सुरुवात 'अ' किंवा 'अण' या नकारार्थी पदाने होते त्यास **'नञ् तत्पुरुष समास'** म्हणतात.

(i) या समासातील दुसरे पद नाम असते.

(ii) या समासातील विग्रह करताना 'न' प्रारंभी येते.

अकारण → न कारणं।
अणलसो → न अलसो।
असच्चं → न सच्चं।
अहिंसा → न हिंसा।
अधम्मो → न धम्मो।
अलोहो → न लोहो।
अण्णाणी → न णाणी।
अरइं → न रइं।
अणिट्ठं → न इट्ठं
अणायारो → न आयारो।
अणत्थो → न अत्थो।
अणसणं → न असणं।

## III. द्विगु समास :

हा एक तत्पुरुष समासाचाच प्रकार आहे.

(i) ज्या समासातील पहिले पद संख्यात्मक असते आणि दुसरे पद नाम असते त्यास **'द्विगु समास'** म्हणतात.

(ii) ज्या सामासिक शब्दातून समुदायाचा बोध होतो त्यास द्विगु समास म्हणतात.

(iii) द्विगु समास नेहमी नपुंसकलिंगी एकवचनी असतो.

(iv) या समासातून समुदायाचा बोध होतो म्हणून समाहारो (समुदाय) असा विग्रह केला जातो.

उदा : णवतत्तं → णवण्हं तत्ताण्हं समाहारो।
तिलोय → तिण्हं लोयाणं समाहारो।
चउक्कसायं → चउण्हं कसायाणं समाहरो।
दोमासं → दोण्हं मासाणं समाहारो।
तिहुयणं → तिण्हं भुवणाणं समाहारो।
दसदिणं → दसण्हं दिणाणं समाहारो।
तिसंझं → तिण्हं संझाणं समाहारो।
चउरंगुलं → चउण्हं अंगुलाणं समाहारो।
सत्तसइं → सत्तण्हं सइणं समाहारो।
छट्ठपूयं → छट्ठण्हं पूयाणं समाहारो।

### 4. बहुव्रीही समास :

ज्या समासातील दोन्ही पदे गौण असून ती दोन्हीही पदे समासातील पदांच्या बाहेरील घटकांचा अर्थ (बोध) स्पष्ट करतात. त्या समासास **'बहुव्रीही (बहुव्वीही) समास'** म्हणतात.

(i) बहुव्रीही म्हणजे पुष्कळ प्रकारे, अनेक प्रकारचा अर्थ स्पष्ट करणारा सामासिक शब्द होय.

(ii) या समासातील कोणतेही (पहिले किंवा दुसरे) पद स्वतंत्र अर्थ दर्शवित (स्पष्ट करत) नाही.

(iii) समासाचा विग्रह करताना 'ज' या सर्वनामाची वेगवेगळ्या विभक्तीची योग्य रूपे योजलेली असतात. त्यामुळे या समासास विभक्ती बहुव्रीही समास म्हणूनही संबोधले जाते.

(iv) 'ज'च्या विभक्तीनुसार या समासाचे द्विवितीय विभक्ती बहुव्रीही, तृतीया वि. बहु., पंचमी वि. बहु., षष्ठी वि. बहु. आणि सप्तमी विभक्ती बहुव्रीही असे पाच उपप्रकार पडतात.

(v) (i) या समासातील दोन्ही पदे विशेषण आणि विशेष्य असते (मंदभग्गो)

(ii) काही वेळा दोन्ही पदे नाम असतात (चंदाभिहाणा)

(iii) केव्हा केव्हा पहिले पद अव्ययही असते (निद्दओ)

(iv) केव्हा केव्हा पहिले पद उपमान आणि दुसरे उपमेय असते (चंदवयणा)

या समासाचेही काही उपप्रकार आहेत ते पुढीलप्रमाणे–

(i) नञ् बहुव्रीही

(ii) सहबहुव्रीही

#### 1) विभक्ती बहुव्रीही :

##### (i) द्विवितीया बहुव्रीही :

(i) पत्तगंगो → पत्ता गंगा जं सो।

##### (ii) तृतीया बहुव्रीही :

(i) जिइंदिओ → जियाणि इंदियाणि जेण सो।

(ii) जियपरिसहो → जिया परिसहा जेण सो।

(iii) गहियविज्जो → गहिया विज्जा जेण सो।

(iv) आसवपीओ → आसवो पीओ जेण सो।

##### (iii) पंचमी बहुव्रीही :

(i) गयरागो → गओ रागो जाओ सो।

(ii) निद्दओ → निग्गया दया जाओ सो।

##### (iv) षष्ठी बहुव्रीही :

(i) एगदंतो → एगो दंतो जस्स सो।

(ii) पीअांबरो → पीअं अंबरं जस्स सो।

(iii) मंदबुद्धी → मंदं बुद्धी जस्स सो।

(iv) मंदपुण्णो → मंदं पुण्णं जस्स सो।

(v) चक्कपाणी → चक्कं पाणिम्मि जस्स सो।

(vi) चक्कहत्थे → चक्कं हत्थे जस्स सो।

(vii) चित्तघडहत्थगओ → चित्तघडो हत्थ गओ जस्स सो।

(viii) चंदाअभिहाणा → चंदा अभिहाणं जीए सा।

##### (v) सप्तमी बहुव्रीही :

(i) बहुधणं → बहुं धणं जम्मि तं।

##### नञ् (न) बहुव्रीही :

(i) ज्या समासातील दोन्हीही पदे गौण असून समासातील पहिले पद 'अ' किंवा 'अण' या नकारार्थी पदाने होते त्यास **'नञ् (न) बहुव्रीही समास'** असे म्हणतात.

(ii) या समासातील पहिले पद नकारार्थी आणि दुसरे पद नाम असते.

(iii) नञ् बहुव्रीही समासाला स्वतंत्र असा अर्थ नसतो कारण ते अन्य शब्दाचे विशेषण असते.

उदा :

(i) अपुत्तो ⟶ अविज्जमाणो पुत्तो जस्स सो।

(ii) अणगारो ⟶ अविज्जमाणं अगारं जस्स सो।

(iii) अणंतो ⟶ अविज्जमाणं अंतो जस्स सो।

(iv) निद्दओ ⟶ निग्गया दया जाओ सो।

(v) अणाहो ⟶ णत्थि णाहो जस्स सो।

(vi) अणरूवो ⟶ णत्थि रूवो जस्स सो।

(vii) णीलज्जो ⟶ णिग्गया लज्जा जस्स सो।

**सहबहुव्रीही समास :**

ज्या समासातील पहिले पद 'स' किंवा 'सह' असते आणि दुसरे पद नाम असते म्हणजे ज्या समासाची सुरुवात 'स' किंवा 'सह' या शब्दाने होते त्या समासास **'सहबहुव्रीही समास'** म्हणतात.

उदा :

(i) समित्तो ⟶ मित्तेण सह जो होइ सो।

(ii) सदुक्खं ⟶ दुक्खेण सह जहा तहा।

(iii) सविम्हय ⟶ विम्हएण सह जहा तहा।

(iv) सवेरग्गो ⟶ वेरग्गेण सह जो होइ सो।

(v) सहेउयं ⟶ हेउयं सह जो होइ सो।

(vi) सहोयरो ⟶ उयरं सह जो होइ सो। (समाणं उयरं जस्स सो)

(vii) सकारण ⟶ कारणेण सह जो होइ।

(viii) सवयंसो ⟶ वयंसेहिं सह जो होइ सो।

अशाप्रकारे समासांचा संक्षिप्त परिचय दिलेला आहे. विद्यार्थी त्याचा लाभ घेतील असे वाटते.

# ब) लेहण-कोसल्लं

## 1) अपठित उतारे

आतापर्यंत विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमातील पठित प्राकृत पाठांचे अध्यापकांच्या मदतीने अध्ययन केलेले आहे. या अध्ययनातून स्वतः आत्मसात केलेल्या प्राकृत भाषेच्या ज्ञानाचे मूल्यमापन स्वतःच करावे या उद्देशाने काही अपठित उतारे पुढीलप्रमाणे दिलेले आहेत. या उताऱ्यांच्या खाली काही कठीण शब्दार्थही दिलेले आहेत. त्याच्या आधारे विद्यार्थ्यांनी या अपठित उताऱ्यांचे आपल्या मातृभाषेत अनुवाद करावा अशी अपेक्षा आहे.

**1**

एगो पुरिसो अईव दुग्गच्चेण बाहिओ। किसि-कम्माइं करेंतस्स वि तस्स ण किंचि फलइ। तओ सवेरग्गो निग्गओ गिहाओ। एगम्मि य गामे देवालयम्मि रत्तिं वासं करित्था। तत्थ एगो चित्त-घड-हत्थ-गओ सिद्धपुरिसो आगओ। सो तं चित्तघडं एगठाणे ठविऊण तं पुइऊण भणइ, 'लहुं मे परम-रमणिज्जं वासहरं सज्जेहि'। तं चित्तघडेण तक्खणमेव तहेव कयं। तयणंतरं तेण सिद्धपुरिसेण तं घडेण आसण-अन्न-पाणाइं कराविय़ं। सो जं जं भणइ तं तं चित्तघडो करेइ। तेण दरिद्देण तं सव्वं दिट्ठं।

**कठीण शब्दार्थ**

**अईव** – अतिशय

**दुग्गच्चेण** – दुर्गतीने, दारिद्र्याने

**बाहिओ** – बाधित, पीडित

**किसि-कम्माइ** – कृषी कर्म

**सवेरग्गो** – निराशेने, विरक्ततेने

**लहुं** – ताबडतोब

**2**

जलं एव जीवाणं। जलस्स बिइयं नाम 'जीवणं' ति। णाणसंपण्णो जणो जीवणस्स हाणी कहं सहइ? एयम्मि विसयम्मि चिंतणं सेयं। आगच्छ, अम्हे तव्विसए किं पि चिंतेमो। भारहदेसे जलस्स समस्सा अईव गहीरा अत्थि त्ति अम्हे सव्वे जाणामो। अम्हाण मरहट्ठरज्जो महंतो तहवि रज्जम्मि अज्जवि पाणियस्स अभावो दिसइ। नयरे निवसमाणा जणा विउलं जलं पाउणंति, तस्स महत्तं ण जाणन्ति तेण जलं नासेन्ति।

अज्ज वि गामीणभागम्मि सच्छ-महुरं य जलं ण लब्भइ। एएण कारणेण जणाणं पिबिउं पि जलं ण उवलब्भइ। ते अईव कट्ठेण जलं लहंति। महिलाओ जलट्ठं गामाओ गामं परिभमन्ति। सरीर-गिह-सुद्धि-रंधण-कज्जे निच्च-कम्मम्मि य जलस्स उवओगो अत्थि। जइ पसासण-नियुत्ता हियविक्खिणो सव्व-कज्ज-वड्ढावया कज्ज-दक्खा य होस्सन्ति ता लोगा अणेगा समस्साए समाहाणं पाविस्संति।

**कठीण शब्दार्थ**

**बिइयं** – दुसरे

**गहीरा** – गंभीर

**महंतो** – मोठे, महान

**पाउणन्ति** – प्राप्त होणे

**गिहसुद्धि** – घरशुद्धी

**रंधण** – स्वयंपाक

**पसासण-नियुत्ता** – प्रशासन नियुक्त

## 3

एगया राया मित्तवई देवीए सह रायसहाए चिट्ठइ। तओ जिणपालो नाम सुवण्णयारो पडिच्छंद-सरिसं नेउरं घडित्ता तत्थ आगओ। तं नेउर-जुयं रायस्स हत्थे अप्पियं। राया तं दिट्ठिऊण विम्हिएण भणइ, 'धन्ना तव कला'। कामदेव-सरिसं तं जिणपाल-सुवण्णयारं पासिऊण सा मित्तवई देवी कामवियारेण उम्मत्तिया जाया। राएण तं नेउर-जुयलं देवीए हत्थे दिन्नं। सा संभमिया जाया। राइणा परमत्थं नायं।

रत्तीए जाव राया मंचए पसुत्तं णाऊण मित्तवई सणियं उट्ठिऊण वत्थालंकारेण विभूसिया होऊण जिणपालियस्स गिहे गया। अलिय-पसुत्तो राया वि तीए अणुमग्गो गओ। दार-ट्ठिओ य सुणिउं लग्गो।

पणामं काऊण सा भणइ, 'भो जिणपालो! अहं तवोवरिं अणुरत्ता। मए समं भुंजसु रइ-सुहं'। तओ जिणपालो भणिया, 'देवी, अहं धन्नो तव अणुग्गहिओ किंतु अहं अभग्गो म्हि। देवी, अपुरिसो खु अहं'।

### कठीण शब्दार्थ

**चिट्ठइ** – बसणे
**पडिच्छंद** – प्रतिबिंब
**सरिसं** – समान
**नेउरं** – पैंजन
**अलियं** – खोटा बहाणा केला
**अणुमग्गो** – पाठीमागून गेला
**उम्मत्तिया** – उन्मत्त, व्याकूळ झालेली
**जाया** – झाली
**नाय** – जाणते
**सणियं-सणियं** – हळूहळू
**अणुग्गाहिओ** – अनुग्रह, कृपा
**जुयं** – जोडी

## 4

कम्हि गामे कोइ गामेल्लओ गहवई परिवसइ। सो य अन्नया कयाइ पंजरगयं बंधेत्ता नयरे चलइ। नयर-गओ तत्थेव गंधिय-पुत्तेहिं दिट्ठीओ। गंधिय-पुत्तेहिं पुच्छिओ 'किं एयं ते पंजराए? तेण भणियं, 'तित्तिरिं ति। तओ तेहिं पुच्छियं, 'किं इमा सगड-तित्तिरी विक्कायइ'? तेण भणियं, 'आमं, विक्कायइ। तेहिं भणिओ- 'किं लब्भइ'? सागडिएण भणियं, 'काहावणेणं' ति। तओ तेहिं काहावणो दिन्नो। सगडं तित्तिरं च घेत्तुं पयत्ता। तओ तेण सागडिएण भणइ, 'कीस एयं सगडं नेहि'? तेहिं वुत्तं, 'मोल्लेण घेइ। तओ ताणं ववहारो जाओ। जिओ सो सगडो तित्तिरीए समं।

### कठीण शब्दार्थ

**गामेल्लओ** – ग्रामीण, खेडवळ
**गहवई** – घरप्रमुख, गृहपती
**गंधिय-पुत्त** – अत्तर विकणारी मुले
**पंजराए** – पिंजऱ्यात
**तित्तिरि** – तितिरी, पक्ष्याचे नाव
**जिओ** – जिंकणे
**सगड** – गाडी
**आम** – होकार देणे
**काहावणेण** – कार्षापणाने
**पयत्ता** – प्रवृत्त झाला
**वुत्त** – म्हटले, सांगितले

## 5

अत्थि उज्जेणी नाम नयरी। तत्थ विक्कमाइच्चो नाम राया। तस्स रज्जे विविह-सत्ति-जुत्ता अणेगे पुरिसा संति। राया वि परकाय-प्पवेस-विज्जा सिक्खिउं अईव उस्सुगो होइ। रज्जं सुत्थं काऊण सो बडुणा सह सिद्ध-पुरिस-समीवं गओ। राया तं सेविउं आढत्तो। सिद्धो पुरिसो भणइ, 'किमत्थं मं सेवेसि? रण्णा भणइ, 'अहं परकाय-प्पवेस-विज्जा सिक्खिउं इच्छामि'। सिद्ध-पुरिसेण वुत्तं- 'तुम सिक्खिउं जोग्गो सि, किंतु, एए तुमं मित्तो परकाय-प्पवेस-विज्जा सिक्खिउं ण जोग्गो।' रण्णा वुत्तं 'सो मम सहायओ, तं कहं वंचेमि?' तओ सिद्धपुरिसेण दुवे वि सिक्खिविया परकाय-प्पवेस-विज्जा।

### कठीण शब्दार्थ

**सत्ति-जुत्ता** – शक्तीने युक्त
**सुत्थं** – व्यवस्था करणे, व्यवस्थित करणे
**बडूणा** – बटू, बुटका
**एए** – हा
**वुत्तं** – म्हटले
**वंचेमि** – सोडू
**आढत्तो** – प्रारंभ करणे

## 6

अन्नया वेसाए दासिं पेसिऊण कीडणत्थं सेट्ठी-समीवाओ सुगो मग्गाविओ। तं हत्थे घेत्तूण रूट्ठा सा तस्स पक्खे छिंदित्ता दासिं भणइ, 'एस सुगो भोयणट्ठं रंधियव्वो'। एवं वुत्तुण कज्जत्थं सा अन्नत्थ गया।

लद्धावसरो सो सुगो नास्सिऊण खालम्मि पविट्ठो। दासीए इओ तओ गवेसिओ न लद्धो। तओ तीए अवरं मंसं रंधियं। सा वेसा भोयण-समए तं मंसं भुंजंती वयासि- 'रे दुट्ठ सुग! तुमए सेट्ठिणो बुद्धिदाणेण मम धणं हारियं। एण्हिं कयफलं चिय पासहि'। तओ तीए वयणं खाल-संठिओ सुगो सुणंतो छण्णं आसी। मरण भयाभिभूओ सुगो खालगयं अन्नं खायंतो कमेण जाय-पक्खो उड्डेऊण वणम्मि गओ।

### कठीण शब्दार्थ

**खालम्मि** – मोरीत, गटारात
**इओ-तओ** – इकडे तिकडे
**गवेसिओ** – शोधले
**वयासि** – बोलली
**जाय** – होणे, येणे
**एण्हिं** – आता
**सुग** – पोपट
**कयफल** – केलेल्याचे फळ
**संठिओ** – थांबला
**छण्ण** – लपून राहणे

## 2) प्राकृत भाषेत अनुवाद

### प्राकृत भाषेत अनुवाद (कृती) करा.

**1**

भाषा हे आपले विचार व्यक्त करण्याचे एक प्रभावी साधन आहे. कानावर पडणारे शब्द आणि डोळ्यांनी दिसणारे जग यातूनच भाषासंस्कार निर्माण होतात. बालपणात कानांवर पडणारे शब्द हे सुसंस्कृत आणि संवादप्रिय व्यक्तींचे असतील तर ऐकणाऱ्या व्यक्तीचे भाषिक ज्ञान वाढण्यास मदत होते.

भाषिक ज्ञान वाढविण्यात आईवडील, भावंडे, मित्र, शेजारी इत्यादींचे मोठे योगदान असते. जी भाषा अगोदरच्या लोकांच्याकडून बोलली जाते त्या भाषेतून दिलेले ज्ञान हे सहजपणे ज्ञात होते. त्यामुळेच माणसाला मातृभाषेतून दिलेले ज्ञान सहजपणे अवगत होते आणि त्या भाषेत बोलताही येते. परंतु परभाषा प्रयत्नपूर्वकच शिकावी लागते.

**2**

आई आणि वडील ही जीवनातील दोन मोठी सामर्थ्ये आहेत. कोणाच्या जीवनावर आईचा प्रभाव पडतो तर कोणाच्या जीवनावर वडिलांचा अधिक प्रभाव पडतो. ज्या वयात आधाराशिवाय जगता येत नाही त्या वयात आईवडील हेच त्या बालकाचे सर्वस्व असतात. आईच्या स्पर्शात माया असते. म्हणूनच बालकास संकटाची चाहूल लागताच मूल आईच्या कुशीचा विश्वासाने आधार घेते.

**3**

मुलांना वेळ देण्यासाठी आईबाबांना वेळच नसतो; तर आजोबा-आजीला वेळ जात नसतो. त्यामुळे वृद्ध माणसेच लहान मुलांच्या सान्निध्यात अधिक वेळ असतात, म्हणून वृद्धांना लहान मुले आवडतात आणि मुलांना आजी-आजोबाच अधिक आवडतात.

नातवंडे म्हणजे दोन पिढ्यांना सांधणारा एकप्रकारचा सेतूच असतो. तरीही घरातील विश्वासू आजी-आजोबांच्या जवळ मुलांना न ठेवता पगारी माणसाकडे ठेवले जाते हा आधुनिक कुटुंबातील दोषच होय. याचा विचार करण्याची आता वेळ आलेली आहे.

**4**

तुम्हांला भूक लागली तर प्रसंगी स्वतःला स्वयंपाकही करता आला पाहिजे. उत्तमोत्तम कपडे परिधान करणे आवडत असेल तर स्वतःचे कपडे स्वतःला धुताही आले पाहिजेत. घरातील लहान-मोठी कामे करताना मुलांना कमीपणा वाटत असेल तर तो दोष मुलांचा नसून त्यांच्या आईवडिलांचाच होय. कारण जसे पालक शिकवतात तसेच त्यांची मुलेही आचरण करत असतात. पालकांचे आचरण मुलांच्यात जसेच्या तसे उतरते. म्हणून पालकांनी प्रथम स्वतः सुधारणे हाच मुले सुधारण्याचा खरा मार्ग होय.

**5**

परमेश्वर हा सर्वांचा आद्य गुरू असला तरीही शिक्षकांनी विद्यार्थीपरायण असावे. विद्यार्थ्यांनी ज्ञानपरायण असावे; आणि ज्ञान हे समाजसेवापरायण असावे. विद्यार्थी घडविणे हे एकप्रकारचे समाजकार्यच आहे हे जाणून शिक्षकांनी प्रामाणिकपणे शिकविण्याचे कार्य करत राहावे.

शिक्षकांनी असे शिकवावे, की जे लोक शिकलेले नाहीत त्यांनाही शिकण्याचा मोह निर्माण व्हावा. ज्यांना शिकविलेले कळत नाही त्यांना समजेपर्यंत शिक्षकांनी समजावून शिकवित राहावे; परंतु शिकू इच्छिणाऱ्यास दोष देऊ नये.

**6**

लोकशाही ही लोकमतावर आधारलेली असते. लोकमत हे अनेकवेळा ऐकीव माहितीवर आधारित असते. परंतु ज्ञानावर आधारित विवेकी लोकमत असावे. कारण विवेकी लोकमत हाच खरा लोकशाहीचा आधार असतो. ज्ञानाशिवाय व्यक्त होणारे लोकमत हे निराधार असते. ज्ञानातून, चिंतनातून आणि चर्चेतून विकसित होणारे लोकमत हे लोकशाहीच्या रक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्येक नागरिकाला आपला नेता, राज्यकर्ता निवडण्याचा अधिकार असणे हेच लोकशाहीचे वैशिष्ट्य होय. विचारपूर्वक आणि न विसरता मतदान करणे म्हणजेच लोकशाही बळकट करणे होय. परंतु मतदान न करणे म्हणजे लोकशाही धोक्यात आणणे होय. हे मतदारांनी लक्षात ठेवावे.

**7**

प्रौढांनी प्रौढत्व जपले नाहीतर केव्हा केव्हा लहानांनाच प्रौढ व्हावे लागते. म्हणून प्रौढांनी आपले प्रौढत्व आचार-विचारातून प्रकट केले पाहिजे. प्रौढांनी हसावे परंतु खिदळू नये. चालावे परंतु पळू नये. बोलावे परंतु शांतपणे आणि विचारपूर्वक बोलावे. मतभेद असलेच तर योग्य शब्दांत व्यक्त करावेत. कारण प्रौढत्व हा नियतीने माणसाला दिलेला पुरस्कारच होय.

# प्राकृत भाषेत अनुवाद

## प्राकृत भाषेत अनुवाद (कृती) करा.

1) सीता वनात गेली.
2) फळ झाडावरून पडले.
3) आम्ही महावीरांना वंदन करतो.
4) तू कोठे जात आहेस?
5) माधव खाली बस.
6) प्रिया, तू प्रश्नाचे उत्तर दे.
7) कमला गाणे गाते.
8) पक्ष्यांमध्ये गरुड श्रेष्ठ आहे.
9) हत्तींमध्ये ऐरावत श्रेष्ठ आहे.
10) पैसा कोणाला प्रिय नाही?
11) अहिंसा सर्व धर्मांचे मूळ आहे.
12) रत्न समुद्रात पडले.
13) दिव्यापासून प्रकाश मिळतो.
14) प्राकृत काव्याला नमस्कार.
15) सीता रामाबरोबर वनात गेली.
16) विद्या राज्यापेक्षा श्रेष्ठ आहे.
17) कौशांबी नावाची नगरी होती.
18) मुलांनी फळे खाल्ली.
19) नेहमी खरे बोलावे.
20) पक्षी सकाळी गातात.
21) धनाचा लोभ करू नये.
22) हातच्या कंकणाला आरसा कशाला?
23) भारत माझा देश आहे.
24) माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
25) शील हे कुलापेक्षा श्रेष्ठ आहे.
26) जो आईचा तिरस्कार करतो त्याला कोणाचाही आधार मिळत नसतो.
27) दुष्टांची मैत्री नसावी.
28) अमृताला मरण नसते.
29) ज्ञानाने अर्थबोध होतो.
30) अर्थ समजून घेतल्याशिवाय पाठांतर करू नये.
31) अज्ञान हे भयाचे मूळ आहे.
32) आपण जसे बोलतो तसेच उत्तर येते.
33) कोणतेही काम प्रथम स्वत: करून नंतर इतरांना सांगावे.
34) कोणाचे गुणदोष न पाहणे हाच उत्तम गुण होय.
35) आपण काहीतरी दिल्याशिवाय आपणास इच्छित गोष्टींची प्राप्ती होत नाही.

# 3) निबंध लेखन

इयत्ता अकरावी आणि इयत्ता बारावीच्या वर्गामध्ये अर्धमागधी-प्राकृत भाषेच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या प्राकृत भाषेतील शब्दसंग्रहांच्या आणि व्याकरणाच्या आधारे विद्यार्थी एखाद्या विषयाशी संबंधित असे विचार सुलभ, लहान-लहान प्राकृत भाषेत वाक्यरचना करतील अशी अपेक्षा गृहीत धरून काही विषयांवर उदाहरणे म्हणून प्राकृत भाषेतील निबंध लेखन खालीलप्रमाणे लिहून दिलेले आहेत. ते पाहून आणि आपल्या अध्यापकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनीही प्राकृत भाषेत निबंध लेखन करण्याचा प्रयत्न करावा. अशी अपेक्षा आहे.

## 1. पाइय-भासा

पाइयभासा पाईण-भारहदेसस्स एगं जणभासा अत्थि। इमाए भासाए लोगाण ववहारं होन्ति। तेण कारणेण सम्माट (समराट) असोग-सम्माट खारवेल-हालराया-पवरसेणराया आइ विविह रायाण रायदरबारम्मि पाइयभासा चिअ रायभासा अत्थि। भगवं महावीरेण वि निय-धम्मस्स तत्तं पाइयभासाए उवएसइ। जिणधम्मस्स आगम-गंथस्स भासा वि पाइयभासा चिअ अत्थि।

मागही, अद्धमागही, सोरसेणी, मरहट्ठी, पेसाची, अपब्भंसाइ पाइयभासाए उवभासाए अत्थि। पाइयभासा पुप्फ इव सुउमारं अत्थि। तेण सव्व-सद्दाण अत्थं सुहं फुडं होइ। पाइयभासाए छायाए सक्कय-भासाए कढिण-वयणस्स अत्थं वि फुडं होइ। तेण सक्कय-भासाए नाडयगंथम्मि वि पाइयभासाए समावेसं करेइ।

पाइय-भासाए महाकव्व-खंडकव्व-चरित्तकव्व-मुत्तककव्व-आइ विविह-पयारस्स गंथसंपदा अत्थि। एए पाइयभासाओ चिय आहुणिय भारहीय भासाए उप्पत्ती होइ। तेण पाइय-भासा सव्व-भासाए जणणी अत्थि। तेण वाकपइराय कवी निय-गंथम्मि भणइ, ‘सयलाओ इमं वाया विसंति, एत्तो य नेंति वाआओ’। तेण णाणीजणा भणंति, ‘जेण पाइयकव्वस्स निम्मियं तस्स नमो। जे पाइयभासाए पाइयकव्वं य पढिऊण वियाणंति ताहं चिय णमामो’।

## 2. धम्मो

पच्चेग जीवस्स निय-सभावं ति धम्मं होइ। जे आयार-वियारा मणुस्साण दुट्ठ-कम्माओ दूरं करिऊण सम्मं कम्मम्मि थिरं करेइ, सो चिय सच्च-धम्मो अत्थि। जे आयार-वियारा मणुस्सा दुट्ठ-कम्मम्मि थिरं करेइ सो अधम्मो होइ। सच्च-धम्मो मणुस्साण नीइमाण-सयाचारी सुसक्कयं य करेइ। अधम्मो मणुस्साण पसू करेइ। तेण विवेगजुत्त हिययं चिय धम्ममंदीरं होइ। सम्मं आयार-वियारं च त्ति धम्मो होइ।

सच्चधम्मो दयाजुत्त-परोवयारी य अत्थि। जस्स धम्मम्मि दया-परोवयार-खमा-संजम-आइ नत्थि। सो अधम्मो अत्थि। अधम्म-आयरणम्मि किंचि वि सुहं नत्थि। धम्मेण विणा जीवाण सुहं न लब्भइ। तेण धम्मो सव्वं मंगलम्मि मंगल अत्थि। धम्मो चिय सव्व-दुक्खस्स उवरिं ओसहं अत्थि। धम्मेण मणुस्साण सम्माणं मिलइ। धम्म-पभावेण पावरूव-अंधयारं नट्ठं होइ। धम्मेण चिय जीवाण मोक्खं पावइ।

सच्चधम्मो कोवि गंथम्मि नत्थि। मंत-तंतम्मि वि धम्मं नत्थि। सुह-आयार-विचार चिय सच्च धम्मो अत्थि। सव्वे सुपुरिसा विय एयं चिय भणंति।

जे कण्णा सम्मं वयणं सुणन्ति सो कणस्स धम्मं होइ। णयणेण सम्मं पासन्ति सो णयणस्स धम्मं होइ। जो हत्थेण सम्मं कम्मं करेइ सो हत्थस्स धम्मं होइ। जो हियएण सम्मं वियारं करेइ सो हिययस्स धम्मं होइ। मणुस्सेण माणव-इव आयरणं करेह सो मणुस्सस्स धम्मं होइ। एवं पयारे सव्व-धम्मम्मि माणव-धम्मो सेट्ठ-धम्मं होइ।

## 3. महिलाओ

भारहीय-सक्कतीए महिलाण अच्चंतं सम्माणस्स ठाणं अत्थि। पच्चेगे कुटुंबम्मि वि महिला चिय कुटुंबस्स पमुह-आहारं अत्थि। जस्स कुटुंबम्मि महिला उज्जोगा अत्थि तस्स चिअ कुटुंबस्स विकासं होइ। तेण कारणेण महिलाण सत्ति-देवया त्ति मण्णंति। सव्वे महिलाओ ववहार-कुसला अत्थि तेण ताओ लच्छीदेवया-गिहदेवया त्ति मण्णंति। सा पुरिसाओ विय चउरा-बुहीमाणी अत्थि तेण ताओ विज्जाए देवया सरस्सवई-देवयाए त्ति सम्माणं देइ। महिलाओ जम्माओ विविह-कलागुण-संपण्ण त्ति तेण तीए कलादेवया वि मण्णन्ति ।

महिलाण हिययं कोमलं चिय अत्थि तेण ताण माउ-माया-माऊली-आइ विविह नामेण संबोधन्ति। महिला निय बाल-बालियाण पोसणं करेंति। ताओ पोसण-कज्जाए समं सक्कारं विय करेन्ति। तेण छतरपइ शिवराय इव सराज्जस्स रक्खणं कराविय महापुरिसं निम्माणं होइ। महप्पा गांधी इव भारहस्स पियामहो वि निम्माणं होइ।

महिलाण सहावं धम्मियं अत्थि। तेण पच्चेगे गिहे विविह धम्मियखण-उस्सवा होन्ति। वत्तमाणकाले पुरिसाओ विय महिला चिय पच्चेग-धम्मस्स रक्खणं करेन्ति। महिलाण जइ माया-पिया-भाया-पई आइयाओ य सहयारं होइ ता ताओ विविध-खेत्ते निय सेट्ठत्तं पयडं करेन्ति। महोदया पतिभा-पाटील , इंदिरा-गांधी, कप्पणा-चावला एयस्स उत्तमं उदाहरणा संति।

एवं पयारे अणाइकालाओ महिलाओ पच्चेग-खेत्तम्मि अग्गेसरं संति। तेण सव्वे समाजम्मि महिलाण ठाणं सेट्ठं अत्थि।

## 4. अहिंसा-धम्मो

भारहीय-भूमीए विविह-पयारस्स धम्मं अत्थि। तेण भारहीयभूमी धम्मभूमी ति पसिद्धं अत्थि। सव्व-धम्मम्मि अहिंसा-तत्तं एगं पमुह-तत्तं अत्थि। अहिंसा-तत्तं सव्व-धम्मस्स मूलं अत्थि। जस्स धम्मम्मि अहिंसा-दया-खमा-आइ तत्तं नत्थि सो धम्मं नत्थि। सो अधम्मं अत्थि। तेण अहिंसा सव्व-धम्मस्स पमुहं आहारं अत्थि।

जिण-बुद्ध-धम्मेण अहिंसाए चिय धम्मस्स पमुह-तत्तं मण्णइ। सव्व जीवोवरिं दयाभाव करेइ त्ति अहिंसा धम्मस्स पालणं होइ। दया तत्तेण सव्वजीवाण मेत्तिभावं होइ। तेण भणन्ति, 'सव्व-धम्मो मंगलं उक्किट्ठं अहिंसा-धम्मो।'

भगवं महावीर-भगवं बुद्ध-आइ महापुरिसेण निय-रज्ज-विहवस्स मोहं चइऊण एए अहिंसा-धम्मस्स उवएसं करेइ। समराट असोगेण जुज्झाए हिंसा दट्ठूण अहिंसा-धम्मस्स अवलंबं करेइ। अहिंसाए पयारत्थं विविह-ठाणे असोग राएण सिलालेहं लिहिऊण ठवेइ। महप्पा-गांधी-महाभागेण एए अहिंसाए पभावेण भारहदेसं सातंत्तं पाविऊण देइ।

भाहरदेसे पाचीण-कालाओ अहिंसा-धम्मस्स पालणं होइ। तेण कारणेण भारहीय-लोएण धम्मकारणाए को वि काले सत्थस्स अवलंबं ण करेइ। अज्ज वत्तमाणकाले वि भारहभूमीए एए अहिंसा-धम्मस्स पालणं होइ। भारहीय-सुपुरिसे वि हिंसा-अंधसद्धा-अधम्म-आइ विरुधं उवएसं करिऊण समाजम्मि दया-खमा-संजम-सयाचार-आइ वियारस्स विकासत्थं अहिंसा-मग्गस्स चिय अवलंबं करेन्ति। तेण अहिंसा सव्व-धम्मस्स मूल-तत्तं अत्थि। अओ अंधसद्धा-अधम्म-आइस्स पालणं ण करेह। अहिंसा-दयाभाव-खमाइस्स पालणं करिऊण माणवधम्मस्स वियासं करेह।

## 5. 'अत्थो'

अत्थं धण-संपइ-दव्वं आइ य विविह-णामेण संबोहइ। अत्थस्स देवयाए लच्छीदेवया त्ति भणइ। लच्छीदेवया धणस्स पमुह-देवया अत्थि। तेण लोगा लच्छीदेवयाए निच्चं पूया करेन्ति। सव्वे जणा अत्थत्थं विविह-पयारस्स कट्ठं करिऊण अत्थं पावन्ति। अज्ज वत्तमाणकाले अत्थं अच्चंतं महप्पं एइ। तेण सव्वे जणा अत्थस्स परमभत्तं होन्ति। अत्थत्थं नियसुहं विय हरन्ति। अणेगा लोगा अत्थत्थं को वि दुट्ठ-कम्मं करेन्ति। को वि जणा धणस्स कए निय-मित्तस्स वि घायं करेन्ति। को वि जणा धणस्स कए देसंतरं वि करेन्ति। अत्थस्स लोहेण मणुसाण विवेगं वि नट्ठं होइ। अत्थस्स कए मणुसो दयाभावं वि मुंचइ। निय-माया-पिया-भाया-भगिणी आइ य संबंधं वि ण जाणइ। किंतु सो ण जाणइ, एए पयारस्स धणेण सुहं न मिलइ। जे मणुस्सो विवेगेण धणं पावइ सो चिय सुहीं होइ। तेण सव्वे सुपुरिसा भणन्ति, 'धम्म-मग्गेण जो धणं अज्जेइ सो चिय सुहं पावइ'। जइ तुमं इच्छसि ता धम्ममग्गेण धणं पावेह। को वि काले धणस्स अत्थस्स लोहं न करेह।

## 6. मयण-महूसवो

भारहदेसस्स लोगा उस्सव-पियं अत्थि। तेण भारहदेसस्स लोगा भिण्ण-भिण्ण-कालाए णिच्चं विविह-पयारस्स ऊसवं करिऊण आणंदं पावन्ति। दसहरा-दीपावली आइ उसवं इव मयण-महुसवो वि एगो भारहीय उसवं अत्थि। एसो ऊसवो वसंतउउ-काले एइ। तेण एयं वसंतऊसवो त्ति वि संबोधइ। एए ऊसवो फग्गुणमासे एइ। वसंतउऊ सव्वे जणाणं आणंदयारी अत्थि। तम्मि समए सव्वे जणा निय-निय बाल-बालियाओ मायापिया-भारियाओ समं उज्जाणम्मि गच्छिऊण भगवं मयणदेवस्स पूया करेन्ति। एसो ऊसवो तरूणजणाण ऊसवो अत्थि। तेण सव्वे जुवाजणा आणंदेण नच्चन्ति-गायन्ति य।

वसंतउउकाले सव्व-पुहवीए उवरिए रुक्खलया-वेली आइ फुल्लन्ति, वियसियं होंति। अंब-रुक्खा वि फलं फलन्ति। कोइला वि महुर-महुरं सरेण गीयं गायन्ति। पोक्खरणीए कमलाइं वियसन्ति। तेण पोक्खरणीए वि सोहइ। एवं पयारे वसंतकाले सव्वे जणा मयण-ऊसवो करेन्ति।

- **विद्यार्थ्यांनी प्राकृतभाषेत निबंध लेखन करावे म्हणून खालीलप्रमाणे विषय दिलेले आहेत.**

  (i) छत्तपई सिवरायं

  (ii) भारहदेसं

  (iii) मम माया-पिया

  (iv) मम साला / मम विज्जालयं

  (v) जलं समस्सा

  (vi) पदूसण समस्सा

  (vii) हालियस्स समस्सा

  (viii) लोगसाही

# क) अर्धमागधी-प्राकृत
## काव्यसाहित्य परिचय

### 1. प्राकृत काव्यसाहित्य परिचय

**प्रस्तावना :**

भारतीय समाज हा कथा आणि काव्य ऐकण्यात नेहमीच उत्सुक असल्याने परंपरेने चालत आलेल्या लोककथा आणि लोककाव्ये आजही भारतीय समाजाच्या मनोरंजनाचे एक प्रभावी साधन असलेले दिसून येते. या लोककथांचे आणि लोककाव्यांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ह्या लोककथा आणि लोककाव्ये ही धर्माचरणाशी, 'व्रतवैकल्यांशी जोडलेली असल्याने या लोककथा आणि लोककाव्ये ऐकणे म्हणजे एक प्रकारचे धार्मिक कार्य करून पुण्यप्राप्ती घडते असा एक चांगला समज समाजात असल्याने या लोककथांना व लोककाव्यांना भारतीय साहित्यात अधिक महत्त्व असलेले दिसून येते.

या लोककथा आणि लोककाव्यातून भारतीय संस्कृतीचे, समाजाचे, रूढीपरंपरांचे तसेच राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थितीचे ज्ञान होण्यास मदत होते. थोडक्यात सांगावयाचे तर या लोककथा आणि ही लोककाव्ये म्हणजे प्राचीन भारतीय समाजाचा, संस्कृतीचा संक्षिप्त इतिहासच होय. म्हणून नवीन पिढीला या लोककथांचा आणि लोककाव्यांचा परिचय होणे अत्यंत महत्त्वाचे आहे  कारण विद्वानांची प्रतिभा म्हणजे (कधीही न भंगणारे)अभंगच होत.

काव्य म्हणजे अनुभूती आणि कल्पनेतून साकारलेली जीवनधारा. काव्य म्हणजे कोमल-कोमल शब्दरचनांच्या माध्यमातील मधुर कल्पनाविलासच होय. तसेच उद्रेकमय भावनांनी हृदयस्पर्शी भाषा म्हणजे काव्य होय. अशाप्रकारे विविध वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या या मानवतावादी तत्त्वज्ञान साहित्याबरोबर या प्राकृत भाषेत रसयुक्त साहित्याचीही रचना असलेली दिसून येते. या साहित्यातील नायक आणि इतर पात्रेही समाजातील सामान्यांपासून असामान्यांपर्यंतच्या व्यक्ती असलेल्या दिसून येतात. त्यामुळेच सामान्यातील सामान्यांनाही हे प्राकृत साहित्य आपले साहित्य वाटते. ही वास्तवता कोणीही नाकारूच शकत नाही.

**प्राकृत काव्यरचनेतील काही तत्त्वे :**

(i) कथात्मकता आणि छंदोबद्धता.

(ii) सर्गबद्धता किंवा खंडविभाजन आणि कथाविस्तार.

(iii) जीवनातील विविध अंगांचे चित्रण.

(iv) कथातत्त्वांनी युक्त कथानक.

(v) मनोरंजक व कोमल भाषाशैली.

**प्राकृत काव्याचे प्रकार :**

इतर भाषेप्रमाणे प्राकृत भाषेतही विविध प्रकारच्या काव्यरचना असल्या तरीही काही प्रमुख काव्यप्रकार पुढीलप्रमाणे-

(i) महाकाव्य

(ii) खंडकाव्य

(iii) मुक्तककाव्य

(iv) चरित्रकाव्य

(v) चंपूकाव्य

वरीलप्रमाणे प्राकृत काव्याचे प्रकार आहेत त्यांचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे-

**महाकाव्याची वैशिष्ट्ये :**

भारतीय संस्कृतीमध्ये राम आणि कृष्ण यांना अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान असल्याने 'रामायण आणि महाभारतातील नायक 'राम आणि कृष्ण' यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून भारतीय कविंनी आपल्या काव्यरचना केलेल्या दिसून येतात. तरीही दंडीसारख्या विद्वानांनी आपल्या 'काव्यदर्शन' ग्रंथात काव्याची लक्षणे (वैशिष्ट्ये) पुढीलप्रमाणे दिलेली दिसून येतात.

(i) महाकाव्याचा प्रारंभ मंगलाचरण, देवदेवतांना वंदन किंवा आशीर्वादाने केलेला असतो.

(ii) त्यानंतर कविंनी काव्यरचना करण्याचा उद्देश, कारण दिलेले असते.

(iii) काव्यरचनेतील कथानकाचा नायक हा चतुर, व्यवहारकुशल, धीरोदात्त असतो.

(iv) कथानक हे एखाद्या ऐतिहासिक विषयावर, सत्यघटनेवर किंवा काल्पनिक विषयावर आधारित असते.

(v) कथानकात निसर्गवर्णन, प्रवास, युद्ध, उत्सव इत्यादींचे वर्णन असते.

(vi) काव्यात शांतरस, वीररस, शृंगाररसाचे तसेच विविध अलंकारांचा उपयोग केलेला असतो.

(vii) काव्यरचना सुलभ व ऐकण्यास मधुर आणि लोकरंजक असते.

(viii) काव्य सर्ग, आश्वास, प्रस्ताव, संधी इत्यादींमध्ये विभागलेले असते.

(ix) काव्य कथानकामध्ये नायकाच्या जन्मापासून दीक्षा घेण्यापर्यंतच्या विविध घटनांचे वर्णन असते.

(x) मुख्य कथानकाबरोबर काही उपकथानकांचाही समावेश असतो.

प्राकृत महाकाव्यामध्ये सेतुबंध, गउडवध, लीलावई इत्यादींचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे–

## 1) सेतुबंध :

'सेतुबंध' हे प्राकृत साहित्यातील एक श्रेष्ठ आणि महत्त्वपूर्ण असे महाकाव्य आहे. याची रचना प्रवरसेन राजाने केलेली आहे. या महाकाव्याचा मुख्य विषय रामायणातील असला तरीही वानरसेनेकडून समुद्रावर सेतू बांधून रावणाचा वध कसा करण्यात आला या विषयाचे वर्णन या ग्रंथात आलेले आहे. याचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे–

### ग्रंथकाराचा परिचय :

'सेतुबंध' या प्राकृत महाकाव्याची रचना कवी प्रवरसेन राजाने केली आहे. कवी प्रवरसेन म्हणजेच विदर्भातील वाकाटक राजघराण्यातील दुसरा प्रवरसेन राजा होय. कवी कालिदास हे या प्रवरसेन राजाचे राजकीय सल्लागार होते. त्यांच्या प्रेरणेनेच प्रवरसेनांनी या 'सेतुबंध' महाकाव्याची रचना केल्याचे मानले जाते. प्रवरसेन राजास प्राकृत भाषेविषयी आदर असल्यानेच प्राकृत भाषेला राजदरबाराची भाषा म्हणून सन्मानित केलेले होते. कालिदासासारख्या संस्कृत पंडिताच्या सान्निध्यात राहूनही 'सेतुबंधा'सारखे महाकाव्य प्राकृतभाषेत लिहिले हे प्रवरसेनांचे एक वेगळे वैशिष्ट्य स्पष्ट होते. साधारणपणे इ.स. 420 ते 450 मध्ये हे काव्य रचल्याचे मानले जाते.

### सेतुबंध महाकाव्याचा परिचय : →

'सेतुबंध' हे प्राकृत साहित्यातील एक श्रेष्ठ महाकाव्य असून यामध्ये 1299 गाथा 15 अश्वासामध्ये (अध्यायांमध्ये) विभागलेल्या आहेत. यामध्ये वाल्मिकी, रामायणातीलच विषय असला तरीही समुद्रावर सेतू बांधून रावणाचा वध कसा केला एवढा मर्यादित विषय घेतलेला आहे. यातील 1247 गाथा या आर्या वृत्तातील असून बाकीच्या 44 गाथा या वेगवेगळ्या वृत्तातील आहेत. शिवाय या ग्रंथातील भाषा ही महाराष्ट्री प्राकृत आहे.

### सेतुबंध ग्रंथातील विषय :

'सेतुबंध' या महाकाव्याचा विषय वाल्मिकी रामायणातीलच असला तरीही वाल्मिकी रामायणाप्रमाणे संपूर्ण रामकथेचे वर्णन केलेले नसून वानरांच्याकडून समुद्रावर सेतू बांधून रामाने रावणाचा वध कसा केला एवढा मर्यादितच विषय असलेला दिसून येतो.

हनुमानाकडून सीतेच्या शोधाचा वृत्तांत समजल्यानंतर समुद्र पार करून लंकेस कसे जावयाचे? या चिंतेने राम चिंताग्रस्त झालेला असताना स्वतः समुद्रदेवता रामासमोर येऊन सेतू बांधून समुद्र ओलांडून जाण्याचा सल्ला देते. त्याप्रमाणे हनुमानाच्या मार्गदर्शनाखाली समुद्रावर सेतू बांधला जातो त्याचे सविस्तर वर्णन या 'सेतुबंध' महाकाव्यात आलेले आहे. म्हणूनच या महाकाव्यास 'सेतुबंध' हे शीर्षक देण्यात आलेले आहे.

राम हा या काव्याचा नायक असून त्यास देवाचा अवतारी पुरुष न मानता एक आदर्श, धीरोदात्त पुरुष मानून त्यास सामान्य माणसाप्रमाणे सुखदुःखाच्या भावना असल्याचे वर्णन केले आहे. तर रावण हा प्रतिनायक असून त्याने सीतेचे अपहरण केले असले तरीही तो अत्याचारी

नसून तो मनाने उदार, पराक्रमी, कुशल प्रशासक होता. अशाप्रकारे वाल्मिकी रामायणापेक्षा वेगळा विषय या ग्रंथात वर्णिलेला दिसून येतो.

## 2) लीलावई :

### प्रस्तावना :

'लीलावई' हे प्राकृत भाषेतील एक श्रेष्ठ महाकाव्य होय. याची रचना कोउहल (कुतूहल) या कविंनी केलेली आहे. काव्याच्या नायिकेचेच या ग्रंथास शीर्षक दिलेले दिसून येते. या ग्रंथामध्ये सातवाहन वंशातील 'हाल राजा आणि सिंहल-द्वीपाची (श्रीलंकेची) राजकन्या लीलावई' यांच्या प्रेमाची कथा वर्णिलेली आहे.

### ग्रंथकारांचा परिचय :

कवी कोउहलांनी आपल्या 'लीलावई' या ग्रंथाच्या प्रारंभीच्या 18 ते 42 गाथांमध्ये स्वतःविषयी थोडीफार माहिती दिलेली आहे. त्यामुळे कवी कोउहलांचा संक्षिप्त परिचय होण्यास मदत होते. ती पुढीलप्रमाणे-

कवी कोउहल हे वैष्णवपंथी ब्राम्हण होते. त्यांच्या कुळात विद्वत्तेची मोठी परंपरा होती. त्यांचे वडील भूषणभट्ट हे वेदविद्येमध्ये अत्यंत पारंगत होते. त्यांचे चारही वेद तोंडपाठ होते. त्यांचे आजोबा बहुलादित्य हे यज्ञातील जाणकार होते.

कुतूहल हे त्याचे खरे नाव नसून त्यांनी ते टोपणनाव धारण केलेले असावे. तसेच 'लीलावई' हा ग्रंथ खासकरून पत्नीच्या प्रेमाचे व आदराचे प्रतीक म्हणून लिहिल्याचे ग्रंथात स्पष्ट केले आहे. त्यांचा काळ साधारणपणे 7-8 व्या शतकाचा मानला जातो.

### ग्रंथाचा परिचय :

'लीलावई' या ग्रंथाची रचना कोउहलाने केली आहे. या काव्यग्रंथामध्ये 1350 गाथा आहेत. यामध्ये लीलावती आणि हाल राजा यांच्या प्रेमाची कथा वर्णिलेली आहे. या प्रेमकथेबरोबर महानुमती आणि सिद्धकुमार माधवानिल तसेच कुवलयावली-चित्रांगद यांच्याही प्रेमाच्या दोन उपकथा आलेल्या आहेत. या काव्यग्रंथाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे मानवी आणि दैवी पात्रांचा सुरेख संगम साधलेला आहे. या ग्रंथाचे संपादन डॉ. ए.एन. उपाध्ये यांनी केले असून भारतीय ज्ञानपीठामार्फत याचे प्रथम प्रकाशनही केलेले आहे.

### ग्रंथाचा विषय :

सातवाहन वंशातील हाल राजा आणि सिंहल-द्वीपाची राजकन्या लीलावती यांच्या प्रेमाची कथा हा या ग्रंथाचा प्रमुखविषय आहे.

'लीलावती' ही सिंहलद्वीपाच्या (श्रीलंकेच्या) शिलामेघ राजाची (शरदश्री राणीपासून झालेली) कन्या होय. लीलावती तारुण्यात आल्यानंतर तिचा विवाह करण्याचे ठरवून तिला विविध राजांची व राजकुमारांची चित्रे दाखविते. तेव्हा सातवाहन वंशीय हाल राजाचे चित्र पाहून लीलावती मोहित होते. एवढेच नव्हेतर स्वतः एकटीच होडीत बसून समुद्रमार्गे गोदावरीच्या किनारी असलेल्या पैठण नगराकडे जाऊ लागते.

योगायोगाने हाल राजाचा सेनापती विजयानंद यांच्याशी तिची भेट होते. लीलावती आपला सर्व वृत्तांत विजयानंदास सांगते. विजयानंद सेनापती पैठण नगरात येऊन लीलावतीचा वृत्तांत राजास सांगतो. त्यानंतर हाल राजा लीलावतीशी विवाह करतो. असे या काव्याचे कथानक आहे.

हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृत भाषेतील एक श्रेष्ठ ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे.

## 3) गौडवध (गउडवहो) :

### प्रस्तावना :

'गौडवध' हा प्राकृत महाकाव्यग्रंथातील एक प्रमुख ग्रंथ होय. याची रचना 'वाक्पतिराज' यांनी केली आहे. कनोजच्या यशोवर्मा राजाने गौड देशाच्या राजाचा युद्धात कसा वध केला याचे वर्णन, या महाकाव्यात केलेले आहे. या ग्रंथास 'यशोवर्मा विजयगाथा' या नावानेही संबोधले जाते. या ग्रंथाचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे-

### ग्रंथकाराचा परिचय :

'गौडवध' या महाकाव्याची रचना कवी वाक्पतिराज यांनी केली. वाक्पतिराज हे कनोजच्या यशोवर्मा राजांच्या दरबारात कविराज म्हणून प्रसिद्ध होते. आपल्या स्वामींच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी कदाचित त्यांनी या काव्यग्रंथाची रचना केलेली असावी.

कविंनी ‘गौडवध’ या महाकाव्याची रचना करण्यापूर्वी ‘मधुमय विडय’ नावाचा एक काव्यग्रंथ लिहिल्याचा उल्लेख मिळतो; परंतु आज तो कोठेही उपलब्ध होत नाही. वाक्पतिराज यांचा काळ साधारणपणे इ.स. 700 ते 740 चा मानला जातो.

## ग्रंथाचा परिचय :

‘गौडवध’ या काव्यामध्ये कनोजच्या यशोवर्मा राजाने गौड देशाच्या राजाचा युद्धात कसा पराभव किंवा कसा वध केला ते 1209 गाथामध्ये वर्णन केलेले आहे. या ग्रंथातील विभागास ‘कुलक’ म्हणून संबोधलेले आहे. ह्या ग्रंथात राजकीय स्थितीचे वर्णन असले तरी तत्कालीन समाजातील विविध चालीरीतींचेही वर्णन आलेले दिसून येते.

## ग्रंथाचा विषय :

या ग्रंथात गौड राजाच्या वधाचे वर्णन आणि यशोवर्मा राजाच्या विजयाचे वर्णन हा प्रमुख विषय आहे. 1 ते 61 गाथांमध्ये मंगलाचरण आहे 62 ते 98 मध्ये कवीची माहिती दिली आहे. 99 ते 191 मध्ये काव्याच्या प्रमुख विषयास प्रारंभ होऊन यशोवर्मा राजाची स्तुती केलेली आहे. 192 ते 413 मध्ये युद्धयात्रा वर्णन व गौड राजाच्या वधाचे वर्णन आहे. त्यानंतर यशोवर्मा राजाची स्तुती आलेली आहे.

हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृत भाषेत लिहिला आहे. हाल राजाच्या ‘गाथासप्तशती’ प्रमाणे या ग्रंथात ग्रामीण जीवनाचे वर्णनही अत्यंत सुरेख असलेले दिसून येते. याशिवाय ग्रंथाच्या शेवटी उत्तमोत्तम सुभाषितेही आलेली आहेत.

# 2. खंडकाव्य

प्राकृत भाषेत महाकाव्याप्रमाणे खंडकाव्य हाही एक काव्यप्रकार असलेला दिसून येतो. खंडकाव्याची संख्या अत्यंत कमी असली तरीही प्राकृत साहित्यात खंडकाव्य हा एक प्रकार अस्तित्वात असलेला दिसून येतो. प्राकृत साहित्यात (i) कंसवध (ii) उषानिरुद्ध (उसाणिरूद्ध) असे दोनच खंडकाव्य ग्रंथ उपलब्ध असलेले दिसून येतात. बाकीचे ग्रंथ कदाचित काळाच्या प्रवाहात नष्टही झालेले असतील.

### खंडकाव्याची वैशिष्ट्ये :

प्राकृत साहित्यातील महाकाव्याची जशी वैशिष्ट्ये आहेत. त्याप्रमाणे विद्वानांनी खंडकाव्याचीही काही वैशिष्ट्ये (लक्षणे) सांगितलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे–

(i) महाकाव्यामध्ये नायकाच्या संपूर्ण जीवनाचे वर्णन केलेले असते, परंतु खंडकाव्यात मुख्य कथेतील कोणत्याही एका घटनेचे, एका भागाचे, एका खंडाचे वर्णन केलेले असते, म्हणून त्या काव्यास **खंडकाव्य** म्हटले जाते.

(ii) खंडकाव्य 2 ते 4 सर्गामध्ये (भागामध्ये) विभागलेले असते.

(iii) खंडकाव्याचा नायक हा पौराणिक किंवा ऐतिहासिक असतो.

(iv) मुख्य कथानकासमवेत एक–दोन उपकथानकांचाही खंडकाव्यात समावेश केलेला असतो.

(v) महाकाव्याप्रमाणे खंडकाव्यातही लोकजीवनाचे वर्णन असते.

(vi) खंडकाव्यात नायकाच्या शौर्याचे विशेष वर्णन असल्याने खंडकाव्यात वीररसाचे प्राबल्य अधिक असते.

(vii) प्राकृतातील खंडकाव्याचा विकास हळूहळू होत गेलेला दिसून येतो.

वरीलप्रमाणे प्राकृत खंडकाव्याची वैशिष्ट्ये दिसून येतात. तेव्हा प्राकृतातील खंडकाव्याचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे–

### (1) कंसवध (कंसवहो) :

कंसवध (कंसवहो) हे प्राकृत साहित्यातील एक महत्त्वपूर्ण खंडकाव्य आहे. कृष्णाने कंसाचा वध का व कसा केला याचे कथानक यामध्ये दिलेले आहे. याची रचना रामपाणिवाद यांनी केलेली आहे.

### ग्रंथकारांचा परिचय :

कंसवध आणि उषानिरुद्ध या दोन्ही प्राकृत खंडकाव्याची रचना रामपाणिवाद यांनी केलेली आहे. रामपाणिवाद हे केरळ राज्यातील दक्षिण मलबारातील मंगलग्राम गावातील ब्राह्मण कुटुंबात जन्मले होते. त्यांचे वडील शिवमंदिरात पुरोहिताचे काम वंशपरंपरेने करत होते. संस्कृत नाटकात काम करणाऱ्या नटांना सहकार्य म्हणून ते पडघम वाजविण्याचे काम करत असल्याने पाणिवाद (हाताने वाद्य वाजविणारे) या नावाने त्यांना ओळखले जाऊ लागले. रामपाणिवादांचे वडील संस्कृत भाषा जाणकार होते. त्यामुळे त्यांनाही वडिलांच्याकडून संस्कृत भाषेचे ज्ञान मिळाले होते. रामपाणिवाद हे कृष्णाचे परमभक्त होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या दोन्ही खंडकाव्यातून कृष्णाचे श्रेष्ठत्व वर्णिलेले दिसून येते.

### ग्रंथाचा परिचय :

'कंसवध' या खंडकाव्याच्या शीर्षकावरूनच ग्रंथाचा परिचय होण्यास मदत होते. या खंडकाव्यात एकूण 233 गाथा असून त्या चार सर्गात (विभागात) विभागलेल्या दिसून येतात. प्रथम विभागात 64 गाथा, दुसऱ्या विभागात 60, तिसऱ्या विभागात 59 आणि चौथ्या सर्गात 60 गाथा आहेत. कंसाच्या वधाचेच केवळ वर्णन या काव्यात असल्याने या काव्यास खंडकाव्य म्हणून ओळखले जाते.

### ग्रंथाचा विषय :

'कंसवध' या नावावरून ग्रंथाचे स्वरूप आणि ग्रंथाचा विषय समजण्यास मदत होते. कृष्ण गोकुळातून निघाल्यापासून ते कंसाचा वध होईपर्यंतच्या विविध घटनांचे वर्णन या ग्रंथात केलेले आहे.

**पहिल्या सर्गात (विभागात)** प्रारंभी विष्णू व इतर देवदेवतांना वंदन करून कंसाने आरंभलेल्या धनुष्य उत्सवाचे निमंत्रण घेऊन आलेल्या अक्रुराच्या आगमनाचे वर्णन तसेच त्या निमंत्रणानुसार कृष्ण आणि बलराम यांचे मथुरेकडे प्रयाण, गोपिकांचा शोक इत्यादी घटनांचे वर्णन आलेले आहे.

**दुसऱ्या सर्गात (विभागात)** रजकाचे उपकथानक, कुब्जेस सौंदर्य प्राप्ती, मथुरानगरीचे व चापघराचे वर्णन इत्यादी घटना आलेल्या आहेत.

**तिसऱ्या सर्गात (विभागात)** कृष्णभक्ताकडून कृष्णाची स्तुती, उन्मत्त हत्तीचा नाश, मल्लयुद्धाचे वर्णन आणि कंसवध इत्यादी प्रमुख घटनांचे वर्णन आलेले आहे.

**चौथ्या सर्गात (विभागात)** अक्रुराकडून कंसाच्या वधाचे कथन, कृष्णाच्या पूर्वजन्माचे वर्णन इत्यादी घटनांचे वर्णन करून कृष्णाचे श्रेष्ठत्व वर्णन केलेले आहे.

अशाप्रकारे कंसाच्या वधाचे वर्णन या खंडकाव्यात आलेले आहे. हा ग्रंथ महाराष्ट्रीय प्राकृत भाषेत लिहिलेला असला तरीही काही ठिकाणी शौरसेनी आणि मागधी प्राकृत भाषांचेही अस्तित्व दिसून येते. तसेच या ग्रंथात संस्कृत भाषेचाही प्रभाव दिसून येतो. **एका संस्कृत पंडिताकडून प्राकृत भाषेत दोन खंडकाव्ये लिहिली जातात हे प्राकृत भाषेच्या दृष्टीने अत्यंत गौरवास्पदच आहे.**

## (2) उषानिरूद्‌ध (उसाणिरूद्‌धं) :

उषानिरूद्‌ध (उसाणिरूद्‌धं) हे एक प्राकृत साहित्यातील एक उत्कृष्ट खंडकाव्य होय. याची रचना कवी रामपाणिवाद यांनी केलेली असून यामध्ये बाणासूराची कन्या उषा आणि श्रीकृष्णाचा नातू अनिरूद्‌ध यांच्या प्रेमाची आणि विवाहाची कथा वर्णिलेली आहे.

### ग्रंथकाराचा परिचय :

ग्रंथकाराच्या परिचयासाठी 'कंसवध' ग्रंथातील ग्रंथकारांचा परिचय पाहणे (कारण दोन्हीही ग्रंथाचे निर्माते रामपाणिवाद आहेत.)

### ग्रंथाचा परिचय :

उषा आणि अनिरूद्‌ध यांच्या प्रेमाची सरस कथा या ग्रंथात वर्णिलेली आहे. या कथेचा प्रमुख आधार श्रीमद्‌भागवत आहे. हा ग्रंथ दोन सर्गामध्ये (विभागामध्ये) विभागलेला आहे.

### ग्रंथाचा विषय :

रामपाणिवाद हे कृष्णभक्त असल्याने कृष्णाचे श्रेष्ठत्व वर्णन करण्यासाठी उषा आणि अनिरूद्‌ध यांच्या प्रेमाच्या कथानकाचा आधार घेऊन 'उषानिरूद्‌ध' या खंडकाव्याची रचना केलेली दिसून येते.

बाणासुर राक्षसाची कन्या उषा आणि कृष्णाचा नातू अनिरूद्‌ध हे परस्परांवर आकर्षित होतात; परंतु कृष्णाचे आणि बाणासुराचे शत्रुत्वाचे संबंध असल्याने बाणासुर उषा आणि अनिरूद्‌ध यांच्या प्रेमास विरोध करतो. एवढेच नव्हेतर रात्री गुप्तपणे भेटीसाठी आलेल्या अनिरूद्‌धास बाणासुर आपल्या सेवकांच्या मदतीने कैद करतो. ही बातमी कृष्णास समजते तेव्हा कृष्ण बाणासुरास आपल्या अनिरूद्‌ध नातवास सोडण्याची विनंती करतो, परंतु बाणासुर ऐकत नाही. तेव्हा कृष्ण बाणासुराशी युद्‌ध करून अनिरूद्‌धाची सुटका करतो. शिवाय उषा आणि अनिरूद्‌ध यांचा विवाहही करून देतो.

या खंडकाव्यात उषानिरुद्‌ध यांची प्रेमकथा असल्याने शृंगाररस यातील प्रमुख रस असलेला दिसून येतो तर कृष्ण आणि बाणासुर यांच्यातील युद्‌ध प्रसंगाने वीररसही आलेला दिसून येतो. याशिवाय इतरही काव्य वैशिष्ट्यांनीही युक्त असे हे खंडकाव्य असलेले दिसून येते.

# 3. मुक्तक काव्य

प्राकृत साहित्यात प्राचीन काळापासून म्हणजेच आगमग्रंथ रचनेपासूनच मुक्तक काव्य लिहिले जात असलेले दिसून येते, कारण आगम साहित्यात अनेक ठिकाणी उपदेश, नैतिकता इत्यादीचे वर्णन करण्यासाठी रसयुक्त पद्याचा उपयोग केला जात असलेला दिसून येतो. त्यातूनच मुक्तक काव्यरचना करण्याची पद्धत अस्तित्वात आलेली असावी. इ.स. दुसऱ्या, तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या सातवाहन वंशीय राजा 'हाल' यांनी 'गाहासत्तसई' नावाचे प्रथम मुक्तक काव्याचे संपादन केले. त्यानंतर जयवल्लभांनी 'वज्जालग्गं नावाचे मुक्तक काव्य लिहिले.

मुक्तक काव्य म्हणजे संस्काराचा, संस्कृतीचा एक मौल्यवान ठेवाच होय. यामध्ये सुवचनांचा, उपदेशांचा, मार्गदर्शनांचा, संत-सत्पुरुषांच्या आचार विचारांचा, नीतिमूल्यांचा संग्रह असतो. त्यामुळे कोणत्याही साहित्यात मुक्तक काव्याचे महत्त्व अधिक असलेले दिसून येते. या मुक्तक काव्याची काही वैशिष्ट्ये (लक्षणे) पुढीलप्रमाणे-

### मुक्तक काव्याची वैशिष्ट्ये :

ज्या काव्यातून किंवा गाथांतून स्वतंत्र विचार प्रकट होतात किंवा ज्या काव्यातून इतर गाथांचा आधार न घेता अर्थ स्पष्ट होतो त्या काव्याला **मुक्तक काव्य** म्हणून संबोधले जाते.

(i) मुक्तक काव्यामध्ये धार्मिक तत्त्वावर अधिक भर दिलेला असतो.

(ii) मुक्तक काव्यातून शृंगाररसाप्रमाणे वीर रसाचाही प्रभाव स्पष्ट होतो.

(iii) सज्जन-सत्पुरुषांच्या गुणवर्णनातून शांत रसही स्पष्ट होतो.

(iv) रौद्र, अद्‌भूत, चमत्कार इत्यादींचा अभाव असतो.

(v) मुक्तक काव्यातून करूणरसही स्पष्ट होतो.

(vi) मुक्तक काव्यातून एकाच कथानकाचे किंवा एका व्यक्तीचे व्यक्तिचित्रण न करता विविध विषयांवरील गाथांचा संग्रह केलेला असतो.

(vii) मुक्तक काव्यातील गाथा या विविध ग्रंथातून संग्रहित केलेल्या असतात.

प्राकृत साहित्यात 'गाथासप्तशती' आणि 'वज्जालग्गं' हे दोन ग्रंथ मुक्तक काव्य ग्रंथ म्हणून ओळखले जातात. त्यांचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे-

### (1) गाहासत्तसई (गाथासप्तशती) :

'गाहासत्तसई' (गाथासप्तशती) हा प्राकृत साहित्यातील एक श्रेष्ठ मुक्तक काव्य ग्रंथ होय. सातवाहन वंशीय हाल राजाने या ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ म्हणजे प्राचीन महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारा पहिला ग्रंथ होय. त्याचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे-

#### (i) ग्रंथकाराचा परिचय :

'गाहासत्तसई' या ग्रंथाची रचना कवी हालाने केली. कवी हाल हे सातवाहन वंशीय राजांमधील सतरावे राजे होते. हालराजा जसा पराक्रमी राजा होता तसा तो प्राकृतभाषा प्रेमीही होता. त्याच्या दरबारात जवळजवळ 112 प्राकृत भाषा विद्वान होते. त्यामुळेच हाल राजास 'कवी वत्सलराजा' म्हणून सन्मानित केले गेले होते. विविध कवींनी आणि विद्वानांनी लिहिलेल्या विविध ग्रंथातील निवडक गाथा घेऊन 700 गाथांनी युक्त 'गाहासत्तसई' या श्रेष्ठ ग्रंथाची रचना केली. **हाल राजास पराक्रमी राजा म्हणून जेवढी प्रसिद्धी मिळाली असेल त्याच्या कितीतरी अधिक पटीने प्रसिद्धी 'गाथासप्तशती' या ग्रंथरचनेमुळे मिळाली.**

#### (ii) गाहासत्तसई ग्रंथाचा परिचय :

'गाहासत्तसई' या ग्रंथाची रचना कवी हालाने केली. तत्कालिन शेकडो प्राकृत ग्रंथातील एक कोटी गाथामधून 700 निवडक गाथांचा संग्रह करून गाहासत्तसईची रचना केली. 100 गाथांचे एक शतक (एक विभाग) याप्रमाणे हा ग्रंथ सात शतकांमध्ये (विभागात) विभागलेला आहे. प्रारंभी

या ग्रंथास 'गाथाकोश' या नावानेही ओळखले जात होते, परंतु ग्रंथात 700 गाथांचा समावेश असल्याने या ग्रंथास 'गाथासप्तशती' (गाहासत्तसई) या नावाने संबोधले जाते. प्रत्येक शतकाच्या शेवटी हा ग्रंथ कवी हालाने रचल्याचे म्हटले आहे. यातील प्रत्येक गाथा ही एक स्वतंत्र विषय मांडत असल्याने या ग्रंथाचा समावेश मुक्तक काव्यग्रंथ म्हणून केला जातो.

## (2) वज्जालग्गं :

'वज्जालग्गं' हा प्राकृत साहित्यातील एक सुभाषित ग्रंथ होय. याची रचना जयवल्लभ यांनी केली. हा ग्रंथ म्हणजे कवी हाल राजाच्या गाथासप्तशती या ग्रंथाची सुधारित आवृत्ती म्हटले तर अयोग्य होणार नाही. गाथासप्तशतीप्रमाणे या ग्रंथातही विविध विषयावरील गाथांचा संग्रह केलेला दिसून येतो. त्याचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे–

### (i) ग्रंथकाराचा परिचय :

'वज्जालग्गं' या सुभाषित ग्रंथाची रचना जयवल्लभांनी केलेली असली तरीही त्यांनी या ग्रंथात स्वतःविषयी किंचितही माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्याविषयी अधिक माहिती मिळत नाही. तरीही जी काही माहिती मिळते ती पुढीलप्रमाणे–

जयवल्लभ हे श्वेतांबर पंथीय जैन होते. जयवल्लभ किंवा जगवल्लभ या नावाने त्यांना संबोधले जात होते. आचार्य धर्मचंद्र यांच्या विनंतीवरून त्यांनी 'वज्जालग्गं' या ग्रंथाची रचना केल्याचे मानले जाते. 'वज्जालग्गं' या ग्रंथाची रचना त्यांनी केलेली असली तरीही त्यामध्ये त्यांची स्वतःची एकही गाथा नाही. त्यांचा काळ साधारणपणे दहाव्या शतकाचा मानला जातो.

### (ii) ग्रंथाचा परिचय :


'वज्जालग्गं' हा प्राकृत साहित्यातील अत्यंत सूत्रबद्ध आणि श्रेष्ठ मुक्तक काव्य ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे. 'वज्जा' म्हणजे एकाच विषयावरील गाथांचा समूह. 'वज्जा' म्हणजे रांगा, मालिका, जोड होय. वज्जा म्हणजे सुवचन, पद्धत, पाठ, प्रकरण, अधिकार, विभाग असे विविध अर्थ होतात.

या ग्रंथात विविध विषयांवरील 995 गाथा असून सर्वसाधारणपणे 94-95 विभागात, वज्जामध्ये त्या विभागलेल्या आहेत. या ग्रंथाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे **भारतीय साहित्यातील सर्वांत पहिला आणि सुसूत्रबद्ध सुभाषित ग्रंथ म्हणून सर्वत्र या ग्रंथाची ओळख आहे.** त्यानंतर विविध भाषेत सुभाषित रचना झाल्या त्या 'वज्जालग्गं' ग्रंथास आदर्श मानूनच.

### (iii) वज्जालग्गं ग्रंथाचा विषय :


विविध विषयांवरील सुभाषित गाथांचे संकलन करून निर्माण केलेला हा ग्रंथ प्राकृत साहित्यातील श्रेष्ठ ग्रंथ होय. कवी जयवल्लभांनी व्यक्तिगत हितापेक्षाही सामाजिक हितावर भर देऊन या ग्रंथाची रचना केलेली दिसून येते. मानवतावादी जीवनमूल्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी परोपकार, मित्रता, नैतिकता, सज्जन स्तुती आणि दुर्जनांची निंदा, धैर्य, प्रेम, स्नेह, उदारता, कृतज्ञता, विनय, क्षमा, काव्य, श्रोत्यांचे महत्त्व आदी विविध विषयांच्या विभागवार गाथा या ग्रंथात दिलेल्या दिसून येतात. त्यामुळे वाचकास एक प्रकारचा आनंद मिळत राहातो. तसेच काही गाथा हृदयास स्पर्श करणाऱ्या असल्याने वाचकाच्या आचार-विचारात परिवर्तन घडविणाऱ्या असल्याचे दिसून येते.


हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृत भाषेत रचलेला दिसून येतो. त्यामुळे मराठी वाचकासही सहज स्पष्ट होणारा हा ग्रंथ आहे.


































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – 411004

अर्धमागधी – प्राकृत, इयत्ता बारावी

₹ 102.00